सात मैल चार फर्लांग रस्ता

प्रा. श्रीराम काळे



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

सात मैल चार फर्लांग रस्ता

कथासंग्रह

प्रा. श्रीराम विनायक काळे

सात मैल चार फर्लांग रस्ता

लेखक: प्रा. श्रीराम विनायक काळे

मूळ गाव- पडेल,ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.
सध्याचा निवास- 3रुद्रप्रिया अपार्टमेंट, रेशनशॉप समोर,
वारजे, पुणे 411058
(Mob 8766764641)
Email – shriramkale.sk@gmail.com

•टंकलेखन व पेज सेटींग - सौ.शर्वरी समीर काटदरे, कर्वे नगर पुणे
9404167338

मुखपृष्ठ- स्वयम आर्टस् ॲण्ड ग्राफिक्स

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २९ जून २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. ३००/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- प्रा. श्रीराम काळे - ९८३३३९९७९४

©esahity Pratishthan®2026

•विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

•आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

•हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पण पत्रिका

माझ्या बालपणी आम्हा पोराना गोष्टींमध्ये गुंगवून ठेवणारी, चुलत आज्जी रुक्मिणी विठ्ठल काळे जिला आम्ही सगळी पोर टोरे 'खालची काकू' म्हणायचो, तिचे रूप माझ्या अंत:चक्षूं समोर आजही स्वच्छ दिसते आहे, आणि तिचे ते गोड शब्द आजही माझ्या कानात सतत रुंजी घालीत आहेत, तिच्या स्मृतीना सविनय समर्पण !

‘सात मैल चार फर्लांग रस्ता’ कथासंग्रहावरील सुजाण वाचकाची प्रतिक्रिया

कथासंग्रह संपूर्ण वाचून झाला. मला आवडला. अर्थवाही शब्दात केलेले तपशीलवार वर्णन हे लेखकाची या विषयातील जाणकारी दाखवते. त्याची मांडणीही सुयोग्य असल्याने वाचनीय झाली आहे. घटना आणि घटीते यांना या पध्दतीच्या लेखनात गौण महत्त्व असते, फक्त संबंधितांवर एकंदर परीणाम काय झाला हे संक्षिप्त रीतीने दिलेले असते. ललित लेख आणि कथा यांची एकत्रित सरमिसळ जेव्हा अशा रीतीने समोर येते, तेव्हा ज्ञान / माहिती आणि रंजकता यांचा मनोज्ञ संगम वाचनीयच होतो.

लेखनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'व्हिजुअलायझेशन'. कथा वाचताना डोळ्यासमोर त्या काळातील कोकण उभे राहते. मग तो घाटे यांनी बांधलेला रस्ता असो, झिलू पातल्याची बैलगाडी असो किंवा मुंबईतील चाकरमान्यांची चाळ असो; तुम्ही प्रसंगांचे वर्णन इतके जिवंत करता की वाचक त्या वातावरणात सहज शिरतो. या कथांतून ६०-७० च्या दशकातील कोकणचे सामाजिक जीवन, तिथल्या प्रथा, रस्ते आणि वाहतुकीच्या समस्या आणि मुंबई-कोकण हे अतूट नाते प्रभावीपणे अधोरेखित झाले आहे. हा केवळ कथासंग्रह नसून एका कालखंडाचा दस्तऐवज वाटतो. या कथांतून ६०-७० च्या दशकातील कोकणचे सामाजिक जीवन, तिथल्या प्रथा, रस्ते आणि वाहतुकीच्या समस्या आणि मुंबई-कोकण हे अतूट नाते

प्रभावीपणे अधोरेखित झाले आहे. हा केवळ कथासंग्रह नसून एका कालखंडाचा दस्तऐवज वाटतो.

कथेचा शेवट करताना लेखकाने साधलेला समतोल त्याच्या प्रदीर्घ लेखनाचा अनुभव दर्शवतो. कुठेही पाल्हाळ न लावता मुद्द्याला धरून केलेली मांडणी वाचकाला खिळवून ठेवते.हा संग्रह कोकणी मातीचा सुगंध देणारा आणि मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडणारा आहे. लेखकाची मांडणी 'पुराण' सांगणारी नसून 'अनुभव' देणारी आहे, हे या लेखनाचे यश आहे. एका ज्येष्ठ लेखकाकडून अपेक्षित असलेली परिपक्वता आणि भाषेवरचे प्रभुत्व या संग्रहात पावलोपावली जाणवते.

आत्मश्लाघेचा दोष पत्करूनही असे म्हणावेसे वाटते की या प्रकारचे दर्जेदार लेखन वाचण्यासाठी वाचकाची अभिरुची थोडी वरच्या दर्जाची असायला हवी, माझ्यापुरतं सांगायचं तर खरोखरच फारच उच्च दर्जाचा कथासंग्रह वाचायला मिळाला, एवढं मात्र नक्की .

श्री. विनायक उकिडवे. 9869314865

लेखकाचे मनोगत

ई साहित्य प्रतिष्ठानवर प्रसिद्ध होणारे हे माझे **१०वे** ई पुस्तक. अती दुर्गम ग्रामीण भागातल्या माझ्या वास्तव्याने मला जीवनाकडे सर्जनशील दृष्टीने पहावयाची नजर दिली. माझे अनुभव विष्व खऱ्या अर्थाने समृद्ध झाले ते त्या काळात.स्मृतीची चाळता पाने.....माझ्या उमेदवारीच्या काळात दुर्गम भागात केलेल्या सेवाकाळात मला ज्वलंत जीवनानूभुती देणारे अनुभव घेता आले. जानपद समाजाच्या श्रद्धा, समज यांचे यथार्थ दर्शन मला उमेदवारीच्या काळात झाले. त्यावेळी अनुभवलेला तो थरार लिहायला बसलं की अगदी अनाहूतपणे लेखणीतून असा काही उतरायला लागतो की वाचक देहभान विसरून त्या अद्भुतात रमून जातात. माझ्या असंख्य वाचकानी फोन संभाषणातून अशा आशयाच्या प्रतिक्रिया व्यक्त करून मला लेखनाला प्रोत्साहीत केले आहे.

माझे प्रकाशक मित्र सुनीळ सामंत यांचे माझ्या पुस्तकांवरील समीक्षा वजा केलेले भाष्य हे माझे श्रेय आहे असे मी मानतो.

ई साहित्य या नव्या माध्यमात पदार्पण करून फेस बुक, ई साहित्य प्रतिष्ठान, मातृभारती वेब पोर्टल या माध्यमांवर लेखन प्रसिद्ध करायला लागल्यावर मला खऱ्या अर्थाने साहित्यिक म्हणून अपार प्रसिद्धी आणि

प्रतिष्ठा मिळाली. प्रस्तुत संग्रहातल्या उगवतची आज्जी, सात मैल चार फर्लांग आणि उगवतची आज्जी या कथाना मातृभारती वेब पोर्टलवर हजारो वाचक प्रतिसाद देत आहेत. डिजीटल माध्यमांचे संयोजक आणि या माध्यमांवरील माझे असंख्य वाचक यांचा मी शतश: ऋणी आहे! माझ्या या " सात मैल आठ फर्लांग़ " कथा संग्रहाचे भरभरून स्वागत होईल याचा विश्वास आहे.

प्रा. श्रीराम काळे

एम्. ए. एम्.एड्. एम्. फिल्.

अनुक्रमणिका

०१. दादा काळे यास फसविले ११

०२. उगवतची आज्जी १९

०३. पातल्याची गाडी ३१

०४. सात मैल चार फर्लांग रस्ता ३९

०५. नाडे घोरिप १०९

०६.चाकरमानी १२३

०७.मुजोर संस्था चालक १३५

१. दादा काळे यास फसविले

उन्हे कलंडली आणि दादा काळे देवगडातून घरी यायला निघाले. आज बाहेर पडायला अंमळ उशिरच झाला. आता वाडा तरीवर होडीसाठी तिष्ठंती. मग त्या पुढे घरापर्यंत तंगड तोद करायची म्हणजे दिवे लागण होवून जाणार असा हिशोब मनाशी करीत दादा चालसूर झाले. ते वाडातरीवर पोहोचले तेंव्हा नशिबाने होडी सुटायची होती. आज दैव बलवत्तर म्हणण्या सारखी वेळ कारण दादा होडीतून खाली उतरतात तोच विठूशेठ "दादानूं" अशी हाक मारीत पुढे आला आणि त्यांच्या हातातली पिशवी घेत म्हणाला, "आज पावण्याकडेन मिरश्यांग्यो पोचवूक इलं हुतय. थयसून भायर पडलय तवसर सांजावत इला. तवा माजो अंदाज हुतो की भवतेक शेवटच्या होडयेन

तुमी येशा म्हणून वाट बगीत थांबॉया. चला बसा गाडयेत. " विठूशेट त्यांच्या वाडीतलाच. त्याने बैलगाडीचा धंदा सुरू केला तेंव्हा त्याला दादानी उसनवार पैसे दिले होते. ती जाण ठेवून तो कधी तरीवर खेप झाली तर येता जाता दादांना हटकीत असे. खुळ्ळुम खुळ्ळुम करीत बैल चौकावर पळायला लागले. त्या दशक्रोशीत त्याची गाडी प्रख्यात..... 'खाडेत बाऊ मुसलमान होडीवालो नी गडावर (विजयदुर्ग) विठूशेट तानावडो गाडीवालो असा ल्वॉक म्हंतत' असं विठू अभिमानाने सांगायचा. विठूशेटीची गाडी मिळाली म्हणून दादा दिवस सकळ घरी पोहोचले.

पाटणेवाडीत एका टोकाला दादांचं घर होतं. घरापर्यंत गाडी रस्ता नव्हता. म्हणून त्याना वाडीतच मांडाजवळ उतरून विठू निघून गेला. दादा रांबाड भग्याच्या घराजवळ पोचले. 'थांबा थांबा' म्हणत खज्या तुक्या पुढे आला. " दादानूं ..... रागा जाव नुको..... कानूच्या भिंतीवर कोनी काय लिवोन ठेवलान हा तेच्यार जरा नदर करा....." तो अजीजीने म्हणाला. मग दादा कानूच्या घराकडे वळले. त्यानी अंगणात पाय ठेवले आणि भंतीवर कोळशाने लिहीलेली अक्षरे ते किलकिले डोळे करून वाचायला लागले. मजकूर वाचताच त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. मजकूर असा होता,''दादा काळे यास फसविले हिमंत माजी '' लिहीणारा अल्पशिक्षित होता म्हणून त्याने हिंमत शब्द लिहीताना चुकून 'म'वर टिंब देले होते. दादा मनात म्हणाले, ''मला? या दादा काळ्याला फसवणार? पत्की वकिलाला कैफीयत लिहून देणाऱ्या,कोर्ट कचेरी खेळून केस पांढरे झालेल्या ह्या दादा काळ्याला फसवणारा कोण हा गब्रू? '' राग अनावर झालेल्या दादानी जरबेच्या आवाजात हाकारणी केली, '' कानू ..... आदी भायर् ये.....'' त्या सरशी लटा लटा कापतच कानू बाहेर आला.

वास्तविक कामधंदा सोडून रिकामपणी उंडगणे हा कानूचा आवडता धंदा. म्हणून लोक त्याला 'रांबाड ' (उंडगा) कानू म्हणत. पण भिंतीवर कोणी कोळशाने लिहीलेला मजकूर काय आहे हे कळल्यावर दादा येणार ही अटकळ धरून तो दुपारपासून त्यांची वाट पहात ओट्यावर बसून राहिलेला होता. दादानी पुढे काही पृच्छा करण्याआधीच पुढे होवून त्यांचे पाय धरीत कानू बोलला, '' दादानूं, भगवतीच्यान माका काय म्हायत नाय. कल राती कोनीतरी ह्या लिवलेला आसनार..... आमका उसरा(उशिरा) समाजलां.आमका कोणाकय लिवाक येयत् नाय नी वाचूक येयत् नाय. आमका काय पत्त्या नाय.''

कानूचा म्हातारा नी बायको सुद्धा दादांच्या हाता पाया पडून, शपथा घेवून गयावया करीत विनवू लागली की, हे कोणी लिहीले ते कळलेही नाही.....मग दादांचा पारा जरा उतरला. त्यानी विचारले, '' ह्यां लिवलेला तुमका कदी समाजला? '' मग तिघानीहीअशाला असे झाले न्हणून अगदी बयाजवार सांगितले. उजाडता उजाडता भुर्के मास्तर त्या वाटेने शाळेत जायला आले तेंव्हा त्यानी तो मजकूर प्रथम वाचला. ते गर्भगळित झाले. वाडीतल्या चार जाणत्याना बोलावून त्यानी काय मजकूर आहे तो सांगितला. ते गेल्यावर जाणत्यानी शोध चौकश्या सुरू केल्या. वाडीत सगळे आंगठे बहाद्दूर. पाचसहा पोरं एकदोन यत्ता शिकलेली होती. पण मजकूर उंचावर लिहीलेला. इतक्या उंच पोरांचा हात पोचण्या सारखा नव्हता. बरेच लोक अडीनडीला दादांकडून कर्जावू पैसे घेत.ते दादांचे मिंधे. तशात दादा देवगडात पत्की वकिलाकडे कारकून होते म्हणून त्यांचा गावात मोठा दबदबा होता. त्यांची वाडीत सोडाच पण उभ्या गावातही कोणाशी लक्षात येण्या सारखी दुष्मनी नव्हती. त्यांच्या विरूद्ध लिहायची ही

आगळीक कोणी बरे केली असेल ? कोणाचाच काही तर्क चालेना. शेवटी संध्याकाळी दादा कोर्टातून आले की विषय त्यांच्या कानावर घालायचा असे ठरवून माणसे फारकाफारक झाली.

थोडावेळ विचार करून दादा म्हणाले, ''आता शेणाच्या बोळ्यान भिंत सारवून टाका. दादा काळ्याच्या वार्तेक जाणारो ह्यो कोण शेटकोजी हा ता मी सोदून काडीन नी तेका चांगली अद्दल घडवीन तरच मी नावाचो दादा काळो..... माका फसवणारो आजून जल्माक येवचो हा. तेची हिंमत नाय म्हनू माज्या मागारी चोरा सारका भिंतीवर लिवलान तेच्यारसून तेचा धाडस किती हा कळला..... '' नी दादा घराकडे निघाले. ते घरी गेले तर सगळी जाणती माणसं चेहरे पाडून ओसरीवर बसलेली. दादा आल्यावर बायका माणसं भराभरा आत गेली. त्यांचे भाऊ आण्णा नी बापू माना खाली घालून बसलेले. दादानी मुंडासे, सदरा काढून खुंटीवर लटकवला. अर्धा तांब्या पाणी पिवून धोतराच्या सोग्याने तोंड पुसले आणि रांडावडा सोडला. थोरली वहिनी चहाची कथली घेवून आल्यावर दादा थांबले. त्यांचा चहा पिवून झाल्यावर भावाभावांचे तर्क वितर्क सुरू झाले. पुऱ्या वाडीत चार अक्षरे लिहीणारा कोणी आहे असे ऐकिवातही नव्हते. गावातही ब्राह्मण मंडळीची चार टकली वगळता इतर समाजात कोणी लिहीणारा नव्हता. जेमतेम सही येणारे चार दोन लोक होते. बरे भल्या पहाटेच एकवशी असलेल्या कानूच्या घरा पर्यंत येवून भिंतीवर लिहीण्याची ही उचापत कोण कशाला करील? कोणाला काहीच उलगडा होईना.

हा कोणा पोराचा फाजीलपणा म्हणावे तर भुर्के मास्तर नी फडके मास्तर दोघानीही शाळेतल्या वरच्या वर्गातल्या पोरांची हडसून खडसून, एका दोघाना रूळाने प्रसाद देवून चौकशी केली पण काही

धागादोरा मिळेना. सगळे रामायण ऐकल्यावर चर्चेचा उपोदघात करीत दादा म्हणाले, ''हा आगावूपणा करणारा कोण गब्रू आहे त्याची शोध चौकशी करून नाय त्याचे तुणतुणे वाजवले तर मी काळ्यांच्या वंशात फुकट जलमलो असें समजा. '' दादा वरकरणी शांत असले तरी त्यांच्या डोक्यात एकच विचार थैमान घालीत होता की, ही आगळीक करणारा हरामखोर कोण असेल? खूप उशिरा उत्तररात्री त्यांचा जरा डोळा लागला. सकाळी उठून तोंड धुताना बापूकाका म्हणाले, ''मी आख्खी रात्र जागा राहून विचार करतोहे..... हे काम नक्की वाडीतल्याच माणसाचे आहे. हे काम एकतर त्याने स्वत: केलेले असेल किंवा कोणा लिहीणाराला हाताशी धरून करून घेतलेले असेल. गेल्या एक दोन दिवसात वाडीत कोणाकडे लिहीता वाचता येणारा कोण पाव्हणा सोयरा येवून गेला की काय याची बारीक चौकशी व्ह्यायला हवी. मी नी आण्णा चारदोन दिवसात अगदी बारीक शोध घेतो. '' त्यावर दादा म्हणाले, '' तुझा अंदाज हजार हिश्शाने खरा आहे. अणखी एक लक्षात घ्या अलिकडच्या काही दिवसात वाडीतला कोणी बापया नव्याने लिहा वाचायला शिखलेला आहे की काय ? हे पण जरा सोधायला हवे..... नव्याने शिखलेला माणूस जरा अती उतावळा असतो. कधी एकदा आपली हुषारी पाजळतो या नादात तो असले काम करू धजावतो. तसेच लिहीणारा माझ्याशी कर्जव्यामाचा संबंध असलेल्या पैकी असावा असेही मला वाटते.....''

आठवडाबर लोटला नी झाली गोष्ट सगळे विसरले. अण्णा- बापूनी अगदी शिकस्त केली. पण काही थांग पत्ता लागला नाही. झाली गोष्ट दादांच्या एवढी जिव्हारी लागली की हल्ली त्यांचे अन्न तुटले. चारदोन दिवसानी गावातल्या दिक्षीत, सोमण, मराठे यांच्याकडे

गप्पाष्टकाना जायचा गेल्या वीस वर्षांचा त्यांचा रिवाजही बंद पडला. नाय म्हटले तरी ही गोष्ट गावभर झालीच. झाला प्रकार आपली नाचक्की करणारा आहे म्हणून कोणाकडे उजळ माथ्याने जायचे धारिष्ट्य दादाना होईना. गावताले काही अध्वर्यू राजरोस टायल्या मारणारे. आपल्या तोंडावर आपल्या खेकट्या पिटायला कमी करणार नाहीत हे ओळखून दिवसा उजेडी गावात फिरणेही दादानी बंद केले. पाऊण महिन्यानंतर अगदी अकल्पितपणे धागादोरा जुळला. त्याचे असे झाले की , अगदी उजाडता उजाडता धकल्या बाणे दादांकडे सल्ला घ्यायला आला. त्याच्या भावकीतल्या कोणीतरी दंडेलीने हद्दीवरचा आंबा तोडला त्याची तक्रार धकल्याला करायची होती. दादानी त्याला तोडलेल्या झाडाचा पंचनामा करायला सांगितला. त्यानी मसुदा लिहून दिला. त्यात झाडाची गोलाई, लांबी व इतर किरकोळ तपशिल भरून त्यावर पोलिस पाटिल आणि गावातल्या दोन पंचांची साक्ष घालून आंगठे घ्यायचा सल्ला दिला.

दुसरे दिवशी पंचनाम्याचा कागद घेवून धकल्या आला. दादानी कागदावर नजर टाकली. कागदावर पोलिसपाटलाची सही, एका पंचाचा आंगठा आणि दुसऱ्या पंचाची रावजी भिकाजी पाटणे अशी सही होती. रावजीची सही बघून दादा चाट झाले.''अरे धकल्या, ही सय (सही) रावजी पाटण्यान केलान? '' त्यावर मान डोलावीत धकल्या म्हणाला, ''व्हय व्हय, रावजी पाटण्याचीच सय हा ती. मदी त्येचो दमो चाळावलो त्या वक्ती तो दवो घेवक् हुंबैक भाच्याकडे तीन म्हैने ऱ्हवलो हुतो तवा तेच्या भाच्यान तेका लिवूक वाचूक शिकवलान. तुमी पंचनामो लिवोन दिलास ना? तो तेनाच पोलिस पाटलाक वाचून दाकवलान.''

धकल्याचं बोलणं ऐकल्यावर दादांच्या डोक्यात लख्ख उजेड पडला. आता सगळे धागेदोरे जुळले. भिंतीवरचे लिखाण रावजीनेच केलेले आहे. ते करण्यामागे



त्याचा काय मनसुबा असणार हेही दादानी ताडले. वर्षभरापूर्वी दादानी त्याला पन्नास रुपये उसनवार देवून प्रॉमिसरी नोट लिहून घेतली होती. त्यावर रावजीचा आंगठा निशाणी होती. प्रॉमिसरी नोटेची मुदत आठवडाभरात संपायला आली होती. मुदत संपल्यावर दादानी रकमेची मागणी केली की, प्रॉमिसरी नोटेवरचा आंग़ठा आपला नाही, आपण सही करतो असं सांगून दादाना फसवायचा त्याचा बेत असणार हे दादाना अचूक उमगले. आता त्याला अद्दल घडवणे फारसे कठिण नव्हते.

प्रॉमिसरी नोटेची मुदत उलटवल्यावर दादानी रावजीला वकिलामार्फत नोटिस धाडली. दादानी अंदाज केला होता त्या प्रमाणे लेखावरचा आंगठा आपण केलेला नाही, मी सही करतो असे म्हणून रावजीने रक्कमेची परतफेड करायला नकार दिला. मग दादानी रितसर तक्रार दाखल करून त्याच्या आंगठ्याचा ठसा घेवून प्रॉमिसरी नोटेवरच्या ठशाशी ताडून बघितल्यावर दोन्ही ठसे तंतोतंत जुळले. आता बाजू रावजीच्या अंगावर उलटली होती. दादानी पाटणे वाडीतले दोन जाणते

आणि पोलिसपाटला समोर रावजीला बोलावून घेतले. प्रॉमिसरी नोटेवरचा ठसा रावजीच्या आंगठ्याच्या ठशाशी तंतोतंत जुळत असल्याचा रिपोर्ट आल्यामुळे बाजू रावजीवर उलटलेली असून त्याला रक्कम तर भरावीच लागेल. त्याही पुढे शपथ घेवून खोटी जबानी दिल्याबद्दल कैद होवून दंड शिक्षा होईल . हे स्पष्ट केल्यावर रावजी रडायला नी हातापाया पडायला लागला. जाणत्यानी ही गोष्ट आपापसात मिटवायची गळ घातली. त्यावर संपूर्ण वाडीसमोर रावजीने आपली चूक कबूल करून दादा सांगतील ती शिक्षा भोगायच्या अटीवर प्रकरण आपापसात समजूतीने मिटवण्याची तयारी दर्शवली.

दुसरे दिवशी वाडीत मांडावर सगळी मंडळी जमली. सर्वांसमक्ष रावजीने कानूच्या भिंतीवर आपण लिहील्याचे कबूल केले. तसेच दादांकडून घेतलेली रक्कम ठरावा प्रमाणे सर्वांसमक्ष पोच केली. त्यानंतर त्याच्या कृतीमागे त्याचा काय हेतू होता आणि खोटेपणा त्याच्या कसा अंगलट आली हे दादानी सांगितले. त्याच्या लबाडीबद्दल काय शिक्षा करायची हेही दादानी स्पष्ट केले. ''ह्येका एकच शिक्षा , ह्येना रांबाड कानूच्या भिंतीवर मी सांगान तो मजकूर लिवोन खाली आपली सही करूची.'' सगळे लटांबर कानूच्या घराकडे निघाले. तिथे गेल्यावर दादानी पंच्याच्या शेवाला बांधलेला खडू काढून तो रावजीच्या हाती दिला. रावजीने बिनबोलत 'दादा काळे याची हिम्मत पाहिली' असा मजकूर लिहून त्याखाली आपली सही केली. लोक टाळ्या वाजवीत दादांच्या हुषारीची तारीफ करीत घरी गेले.

****

०२. उगवतची आज्जी

लहुतटू लहुतटू फुल कोण तोडतय
पिता तोडतोय.....
मधुराणी मधुराणी पान कोण तोडतय
चाण्डाळीण तोडतेय.....

गोष्ट अगदी रंगात आलेली. आम्ही पोरं आजीच्या तोंडाकडे एकटक बघत जीवाचा कान करून ऐकत होतो. राजाने देखणेपणाला भुलून दुसरं लग्न केलन. आवडत्या राणीची कुस काय उजवली नाय. पण पहिल्या नावडत्या राणीलाच जुळी मुलं झाली. राजपुत्राचं नाव होतं लहुतटू नी राजकन्येचं नाव होतं मधुराणी. आता मुलांच्या ओढीने नावडत्या राणीच्या महालात राजाच्या खेपा वाढल्या. आता कदाचित आपल्याला मुलगा झालाच तरी सवतीच्या मुलाला लहूतटूला राज्य मिळणार म्हणून दुष्ट आवडती राणी नुसती पिचत रहायची. तिच्या दासीनी सवतीची मुलं पळवून त्याना मारून टाकायचा बेत दुष्ट राणीला सांगितला. हे काम झालं तर एक हजार सोन्याच्या मोहरा देण्याच वचन तिने दिलं . दासी संधीची वाट पहायला लागल्या.

राजा शिकारीसाठी बाहेर गेल्याची संधी साधून दुष्ट राणीच्या दासीनी महालाच्या सौधावर खेळणाऱ्या नावडतीच्या मुलाना पळवून नेलं. नावडत्या राणीकडे ना दासी ना बटकी..... बिचारी नावडती राणी मुलाना सौधावर खेळायला सोडून आपली कामं उरकायची. बराच

वेळ मुलांचा आवाज येत नाही म्हणताना नावडती राणी मुलांची दखल घ्यायला सौधात गेली. पण मुलं दिसेनात. तिने महालाबाहेरच्या पहारेकऱ्याना विचारलं . पण कोणच काही सांगेना. तिने आपल्या माहेरच्या कुलदेवीला - वनराणीला साकडं घातलं. "हे वनराणी माते, माझ्या मुलांचं रक्षण तू कर. माझी मुलं सापडेपर्यंत मी अन्नपाणी घेणार नाही. "

दुष्ट राणीच्या दासीनी राज उद्यानात एका पुष्प वाटिकेच्या दोन बाजूना दोन खड्डे खणून त्यात लहुतटू नी मधुराणीला ढकलून खड्ड्यात माती लोटून खड्डे बुजवून टाकले. ही आनंदची वार्ता त्यानी दुष्ट राणीला सांगून तिच्याकडे बक्षिसाची मागणी केली. तिने कोषाध्यक्षाना बोलावून एक हजार सुवर्णमुद्रा मागवून घेवून दासीना बक्षिस दिल्या. आपल्या महालात अत्तराचे दिवे दिवे लावून रोषणाई करायचं फर्मान काढलं. तिकडे नावडत्या राणीची प्रार्थना ऐकल्यावर वनराणीने उद्यानातल्या लता वृक्षांना लहुतटूना जिवंत ठेवायची आज्ञा दिली. खड्ड्यात मुलं सुरक्षित राहतील अशा कपारी तयार झाल्या. लता वृक्षांची मुळं लहुतटूना प्राणवायु नी अन्नपाणी पुरवायला लागली.

रात्री नावडत्या राणीला स्वप्न दृष्टान्त झाला. वनराणी म्हणाली, " मुली तू काळजी करू नको. तुझी मुलं सुरक्षीत आहेत. महिनाभरानंतर योग्य वेळी ती तुला भेटतील. ते सग़ळं मी जुळवून आणीपर्यंत तू निश्चिंत रहा." शिकारीला गेलेला राजा दोन दिवसानी परत आला. मुलं नाहिशी झाल्याचं वृत्त कळताच त्याच्या काळजात चर्र झालं. आवडत्या राणीच्या हट्टापायी आपण नावडतीकडे दुर्लक्ष केल्याचा त्याला पश्चात्ताप झाला. मुलांच्या शोधार्थ त्याने आठ दिशाना सैनिक रवाना केले.

चार दिवस सर्वत्र शोध घेवूनही मुल सापडली नाहीत. पंधराव्या दिवशी एक अद्भूत घडलं. लहुतटू नी मधुराणीला ना पुरण्यात आलं होत त्या जागेवर दोन दिव्य रोपं उगवली नी त्यांच्यावर सप्त रंगी फुलं उमलली. त्यांचा मोहक गंध

दशदिशाना पसरू लागला. आवडती राणी तर त्या गंधाने पुरती मोहूनच गेली आणि तिने आपल्या दासीना उद्यानातून ही मोहक वासाची फुलं तोडून आणायला पाठवलं.

दासी वासाच्या रोखाने दिव्य रोपट्यांजवळ गेल्या नी त्यानी फुलं खुडायला हात लावताच रोपांचा मुळातून शब्द उमटले, "खबरदार .... खबरदार.... ही फुलं खुडण्याचा अधिकार फक्त ज्येष्ट राणी अन् महाराजानाच आहे.... तुम्ही स्पर्श कराल तर यांच्या रक्षणार्थ असलेला भुजंग तुम्हाला दंश करील.... चालत्या व्हा इथून." दासी घाबरून पळत सुटल्या. दरम्याने ही वार्ता षटकर्णी होवून सगळा राजपरिवार आणि रक्षक

उद्यानाकडे निघाले. महाराज लहूतटूना पुरलेलं होतं त्या खड्ड्यावर असलेल्या रोपाच्या दिशेने पुढे येवून फुल खुडू लागताच हवेतून आवाज आला. **"लहुतटू लहुतटू फुल कोण तोडतं? "** त्यावर उत्तरादाखल शब्द आले, **" पिता तोडतो".** राजा मागे झाला नी दुसऱ्या रोपाकडे जावून फुल खुडायला लागताच शब्द उमटले,

"**मधुराणी मधुराणी फुल कोण तोडतय्**?"
त्यावर उत्तरादाखल शब्द आले , "**पिता तोडतोय्**...."

मग आवडती राणी फुल खुडायला पुढे आली. ती फुलाला स्पर्श करण्यापूर्वी शब्द आले,**" मधुराणी मधुराणी चांडाळीण आली, सावध हो."** आणि त्याचवेळी पुष्पवाटिकेच्या बाजूने सर्पाचा फुत्कार ऐकू आला. दुष्ट राणी माघारी वळत असता आवाज आला,**" लहुतटू लहुतटू चाण्डाळीण भ्याली.... चाण्डाळीण भ्याली "**

मग नावडती राणी पुढे झाली. तिने एका रोपाला मायेने स्पर्श केल्यावर शब्द उमटले,**" मधुराणी मधुराणी ही कोण आली.... ही कोण आली ?"** त्यावर उत्तर आलं,**" लहुतटू लहुतटू ही तर आपली माता आली.... "** दु:खावेग अनावर होवून नावडती राणी चक्कर येवून खाली कोसळली**.....** हवेतून शब्द आले,**"महाराज, या रोपांच्या सभोवती खोदून मुलाना बाहेर काढा."** कामगारानी सावधपणे खोदकाम करून लहुतटू नी मधुराणी दोघानाही अलगद बाहेर काढलं. कोषाध्यक्षांकडून सुवर्णमुद्रा घेतल्याचं दुष्ट राणीचं बिंग फुटलं. तिला नी लहु तटूना पुरणाऱ्**या**

दासीना सुळावर चढवण्यात आलं. गोष्ट संपली नी आम्ही झोपी गेलो. त्यानंतर रोज रात्री अंथरुणावर पडल्यावर कुणीतरी म्हणायचा," लहुतटू लहुतटू गोष्ट कोण सांगतय्?" त्यावर सगळे एकसुरात म्हणायचे. "आजी सांगतेय्...."

उगवतची आजी ही आमची चुलत चुलत आजी. तिचं घर आमच्या वाड्याच्या पलिकडच्या पडणात, पूर्व दिशेला. म्हणून ती उगवतची आज्जी. तसं गावातसुद्धा आम्हाला वडाखालचे साने नी विठू आजोबाना उगवतचे साने म्हणत. विठू आजोबा नी रुक्मिणी आज्जी दोघंही अतिशय प्रेमळ. उगवत नी मावळत सान्यांमध्ये खरंतर इष्टेटी वरून तीन पिढ्यांची भाऊबंदकी नी वैर. पण आमची सख्खी आज्जी सांगायची," रुक्मीण आली नी उगवत मावळत सान्यांची गोडी झाली! " (हो.... आमची आज्जी मोठी म्हणून ती धकट्या जावेला नाव घेवून रुक्मीण म्हणायची). तिचे वडिल विष्णुपंत उकिडवे आमच्या पणजोबांचे स्नेही. ते मुलगी सांगायला आले तेव्हा आमच्याकडेच दाखवण्याचा कार्यक्रम झालेला. आमची भाऊबंदकी असली तरी आमच्या पणजोबानी विठू आजोबांच्या लग्नात खोडा घातला नाही. उलट " विठूची नी आमची वाकडीक असली तरी मुलग़ा कष्टाळू नी कर्तबगार आहे. खातं पितं घर आहे खुशाल मुलगी द्या....." असा सल्ला दिला. त्या कार्यात आमची गोडी झाली नी एकामेकांकडे उठणं बसणं सुरू झालं.

उगवतच्या आज्जीला पाच मुली नी तीन मुलगे झाले. मोठा मुलगा जन्मत: देवाघरी गेला. त्या नंतर चार मुलींच्या पाठीवर उगवतच्या आज्जीला मुलगा झाला. पण तो पाच वर्षाचा असतानाच प्लेगची साथ आली त्यात तो दगावला. धाकट्या सुधा आत्तेच्या पाठीवर आज्जीला परत

एक मुलगा झाला होता. पण तो ही पाऊण महिन्याच्या भरीला दगावला. त्याच्या मृत्युच्या धसक्याने आजोबाना श्वासावरोध व्हायची व्याधी जडली. अमावास्येच्या सम्याला दोन तीन दिवस आजोबाना हावशी लागे. पेटीच्या भात्यासारख़ा त्यांच्या श्वासोच्छवासाचा 'घर्र घर्र' असा मोठा आवाज यायचा. दोन तीन दिवस उगवतची आज्जी नी तिच्या मुली आळी पाळीने आजोबांजवळ पहारा देत थांबत. त्यांच्या छातीला तेल- बाम लावीत. उकळत्या पाण्यात पंचाचा पिळा बुडवून शेक देत. मध- एरंडेल तेलाचं चाटण चाटवीत. दोन तीन दिवसानी मग जरा उतार पडे.

उगवतच्या आज्जी आजोबाना मुला बाळांचं भारी कौतुक. माझा जन्म गोकुळाष्टमीला झाला. तेव्हा आईचं बाळंतपण आज्जीनेच केलेलं. आजोबा सुद्धा महिम्न म्हणत आमच्या झोपाळ्यावर बसून राहिलेले. माझं रडणं ऐकल्यावर ते आमच्या बापूना म्हणाले, "बव्हतेक बोढयो (मुलग़ा) से , खणखणीत रड्यावरठी आपलो माझो अंदाज से....." त्यांचा अंदाज खरा ठरला. थोड्या वेळात आजी बाहेर जावून म्हणाली, "बोढयो से हो..... हो बाळकृष्ण आयलोसे." बारश्याच्या दिवशी विठू आजोबांनी कान टोचताना मला आपल्या मांडीवर घेतलेनी होता. कान टोचल्यावर बाळं ठो ऽऽ ठो रडतात. मी मात्र केवळ एकदाच 'ट्यॅऽहां 'केल होतं म्हणे..... आजोबा लाडाने म्हणाले," पोर मोठो चांबट नी बाजिंदो से..... "

आजी आजोबाना माझा भारीच लळा होता. मी दिवसभर उगवतच्या घरातच असे. उगवतची आज्जी निरक्षर होती. पण तिला असंख्य गीतं मुखोद्गत होती. तिचा आवाजही भारी गोड. तिच्या माहेरी रामनवमीचा उत्सव व्हायचा. तिच्या मामांच हनुमंताचं देवूळ होतं. हनुमंत

जन्मोत्सवाचा चार पाच दिवस उत्सव असे. त्या काळी कुणीतरी अल्पशिक्षित स्त्रीने जन्मोत्सवावर एक गीत रचलेलं होतं.

वाडे या गावामध्ये मैदान नाक्यावरी
देवूळ हनुमंताचे बांधियेले उंच जागी.....

उत्सवाचं वर्णन करणारं दहाबारा कडव्यांचं ते गाणं मला त्यावेळी तोंडपाठ झालेलं होतं. त्यात काही ओळी अशा होत्या.

मथी नायकीण गायन करी कृष्णा वाजवी सारंगी
पेटीवाले बाबुराव जोशी बंडू गुरव ठेका धरी

माझंही नाव कृष्णा असल्यामुळे हे कडवं मी जोर जोराने म्हणत असे. आज्जी द्रौपदी वस्त्रहरणावर रचलेलं एक सुंदर गीत म्हणे. त्यात त्या काळच्या प्रसिद्ध लुगड्याच्या वाणांची नी पेठांची नावं असत.

नाशिकची ती मग्ममुराणी कोल्हापुरची पदर फुटाणी
येवल्याची ती लाल पैठणी इंदूरीचे हिरवेगार
अहमदाबादीबहू सुकुमार काळु काजळी काश्मिरीचे
बुट्टेदारही जरी पदराचे बहु अमोलिक बेळगावीचे

टोप पदरी ते धनवडीचे जाडे दणगट मालेगावचे
वस्त्रावरती वस्त्रे लेई सोडिता मग झाली घाई
कृष्णाची ती बहु चतुराई
पितांबर पिवळा की दिसतो भगवान सगळ्याना
भक्तासाठी तो जगजेठी माधव अवतरला
सभेसी येवोनी वस्त्र पुरविले सोडवी भगिनीला

कोकिळा व्रताच्या वर्णनाचंही एक गीत ती म्हणे त्यातली फक्त एक ओळ माझ्या स्मरणात आहे. पार्वतीचा पिता दक्ष प्रजापती यज्ञाला शंकराला बोलावण्या ऐवजी **"म्हणे मी पाहीन ना मुख दिगंबर जोग़डा"**अशा शब्दात शिवाची निर्घत्सना करतो. शंकराला निमंत्रण केले नाही म्हणून रागावून पार्वतीने यज्ञकुंडात आत्मसमर्पण केल्यावर शंकर त्याचा शिरच्छेद करतात. पुढे त्याला अजाचे मुंडके जोडून जिवंत केल्यावर तो शिवाची क्षमा याचना कशी करतो त्याची 'ब्लँ ब्लँ ब्लँ 'करून खुमासदार नक्कल आजी करून दाखवायची.

सुधाआत्तेचे लग्न होण्या आधीच उगवतचे आजोबा निवर्तले. मृत्युच्या आदल्या दिवशी बापुनी त्याना मघई पान नी सुपारीचा चुरा तळहातावर चांगला मळून दोन तंबाखुची पानं टाकून ते भरवलं. पानाचा रस गळ्यातून उतरल्यावर "कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने " हा श्लोक आजोबानी म्हटला नी 'श्रीकृष्ण गोविंद हर मुरारे हे नाथ नारायण वासुदेव' हा जप सुरू केला. दुसरे दिवशी पहाटे सुधा आत्तेच्या हाका ऐकून बापू नी आई उगवतच्या घरी गेले. तेंव्हा आजोबांच प्राणोत्क्रमण झालेलं होतं. ते

गेल्यावर सहा महिन्यानी सुधा आत्तेचं लग्न झालं नी आज्जी एकटीच राहिली. मग आम्ही भावंडं रोज रात्री तिच्या सोबतीला जात असू. गाणी गोष्टी यांचा जणु नित्यनेम खुराकच सुरू झाला.

भाऊ परदेशी गेल्यावर अवघड कामे सांगून लहानग्या सोन साखळीचा छळ करणारी दुष्ट भावजय, दुसऱ्या एका कथेतला राणीला तलम वस्त्रे विणून देवून त्या बदल्यात तिचा बाळ हिरावू पाहणारा अगडम बगडम आणि अशाच एका वेगळ्या कथेत नवरा पुराण ऐकायला देवळात गेल्यावर त्याला फसवून गोड धोड करून खाणारी त्याची लबाड बायको ही पात्रे अजूनही माझ्या भावविश्वात शाबूत आहेत. भिकंभट अर्थार्जन करायला शेजारच्या नगरात गेल्यावर वेशीवरचा ब्रह्म समंध भिकंभट बनून त्याच्या घरात ठाण मांडून बसतो. पुढे काही दिवसानी खरा भिकंभट आल्यावर बायको मुले त्याला ओळखीत नाहीत. तो निराश होवून रडत बसला असता गुराख्यांच्या खेळात राजा बनलेला रामा गोवारी त्याचे गाऱ्हाणे ऐकून घेतो. मग राजाच्या दरबारात न्यायाधिशाच्या सिंहासनावर बसून न्याय देताना चतुर रामा गोवारी एक अट घालतो. खरा भिकंभट असेल त्याने या बाटलीत शिरून दाखवावे. ब्रह्मसमंध फसतो नी बाटलीत शिरतो. त्याबरोबर रामा गोवारी बाटलीचे बूच लावून ब्रह्म समंधाला बाटलीत कोंडून टाकतो नी भिकंभटाला न्याय मिळतो.

अशाच एका भुताखेताच्या गोष्टीत शंभर रेशमी शेले विणण्याचे काम मुदतीत पूर्ण होत नाही म्हणून रडणाऱ्या विणकराला मदत करायच्या मिषाने मुलींचे रूप घेतलेली पिशाच्चे विणकराच्या घरात शिरतात. त्याना खाणे घेवून येण्यासाठी विणकर घरात गेल्यावर पिशाचिनी सगळे माग उलटे करून क्षणार्धात विणकाम पुरे करतात . विणकर खाणे घेवून आल्यावर

पहातो तर सगळे माग उलटे केलेले. ही विपरित करणी करणाऱ्या मुली म्हणजे पिशाच्चे आहेत. हे ओळखून तो त्याना निघून जायला सांगतो पण पिशाच्चे ऐकत नाहीत. "आम्ही उजाडेपर्यंत इथेच राहणार. पहिला कोंबडा आरवला की मग आम्ही डोंगरावरच्या राईत परत जाऊ. " असे सांगतात. मग त्यांच्या भूत चेष्टा सुरू होतात. ती घरातली एकेक वस्तू उलटी करून ठेवायला लागतात. हे पाहिल्यावर विणकराची हुषार मुलगी एक युक्ती करते. ती मागिलदाराने बाहेर पडून थोड्या अंतरावर जावून जोराने बोंबा मारू लागते. "डोंगराला लागली आग .... धावा हो धावा....." ही बोंब ऐकल्यावर घाबरलेली पिशाच्चे पटापट घराबाहेर पडून सैरावैरा धावत सुटतात.

जवळ जवळ दोन अडिच वर्षे आम्ही दररोज आज्जीच्या सोबतीला जात असू. त्या मुदतीत रामायण, महाभारत, पंचतंत्र आणि असंख्य लोककथा आजीने आम्हाला रंगवून रंगवून सांगितल्या. इतकी प्रदीर्घ काळात तिचा गोष्टीचा खजिना कसा काय संपला नाही? याचे मला आजही आश्चर्य वाटते. तिने शिकवलेलं.....

मला कल्याणला जायचं तिकीट काढून कां हो द्याना
आला लोणव्याचा पूल तिथे रडत होते मूल
त्याच्या कानात होते डूल आणि हातात होते फुल
मला कल्याणला जायचं तिकीट काढून कां हो द्याना
आला खंडाळ्याचा घाट तिथे गाडी झाली खाट
बोगद्यातून गाडी कां हो जाई ना ?

हे गाणं आणि त्या काळी गाजलेली **‘ रंगात रंगल छंदा मधी दंगल गुंगूनि मन हे आनंदलं’, ‘मन सुद्द तुजं गोस्ट हाई प्रुथीवी मोलाची’, ‘तुझ्या गळा माझ्या गळा गुंफु मोत्यांच्या माळा’,** अशी असंख्य गाणी आज्जीला तोंड पाठ होती. त्या शिवाय लग्नात म्हणायची विहिणीची गाणी, हरितालिका, मंग़ळा गौरीच्या आरती आणि असंख़्य देवदेवतांच्या त्यावेळच्या आरतीच्या पुस्तकातही नसलेल्या आरत्या म्हणून दाखवून आज्जी आम्हाला थक्क करून सोडीत असे. पुढे ती रहातं घर बंद करून आपल्या माहेरी भावांच्या आश्रयाला गेली. मात्र आज्जी स्वाभिमानी होती.ती माहेरघरी न राहता त्याच गावातल्या महाजनांच्या वाड्यात भाड्याने खोली घेवून रहायची.

मग शनिवार रविवार धरून मी तिच्या गावी जात असे. ‘दुपारी तुला वाड्यात आज्जीकडे जायच आहे’ अशी वर्दी शाळेतून आल्या आल्या आईने दिली की मी आठवडाभर वापरून मळलेले कपडे धुवायला मागिलदारी दोणीवर जात असे. पायरहाट ओढून दोण व्हावेपर्यंत भरली की मग रहाट खळवून मी कपडे धुवायला सुरुवात करी. सीझन सुरू असला तर आगरात रिंग़ीच्या झाडाखाली पडलेली ताजी रिंग्ये मिळत. चड्डी नी सदरा दोन कपड्याना मिळून आठ रिंग्ये खूप होत. कपडे भिजवल्यावर रिंग्ये कुस्करून त्यांचा थलक नारळाच्या किशीचा बोथा घेवून त्याने मळलेल्या भागावर लावून घासले की धुळीचे डाग हळू हाळू नाहिसे होत नी सदरा लख्ख पांढरा दिसू लाग़े. नीट अरतून परतून बघून मग चुबकून बादलीत खळबळावून काढीत असे. चार पाच वेळा पाणी बदलून टाकल्या शिवाय रींग्याचा फेस जात नसे. मग़ कपडे घट्ट पिळून वईवर उन्हात सुकत टाकी. दुपारी जेवणातही माझे लक्ष नसे. कधी एकदा अडीच वाजतात नी ‘

निघ रे आता " अशी वर्दी येते ह्याची मी आतुरतेने वाट बघित असे. अडीच वाजले की चहा पिवून रिंगी घालून धुतल्यामुळे चुरचुरीत झालेले कपडे घालून मी चालत आज्जीच्या माहेर गावी वाड्याला जाई.

पुढे महाविद्यालयीन शिक्षणानिमित्त मी रत्नागिरीला गेलो . मात्र सुटीत गावी आल्यानंतर महिनाभराच्या मुक्कामात आज्जीच्या गावी दोन तीन तरी खेपा व्हायच्या. वार्षिक महापुरुषाची समाराधना असे त्या दिवशी आणि चतुर्थीला ती आपले वार्षिक चालवायला आपल्या मूळ घरी यायची. चतुर्थीच्या दिवशी दुपारी गणेशाची प्राणप्रतिष्ठापना करून, मोदकांचा नैवेद्य दाखवून सायंकाळी गणेशाचे विसर्जन करून ती माहेरगावी जायची. ती कायम बालगणेशाची मुर्ती तिच्या गणपतीची दोन्ही वेळची पूजा मीच करीत असे. आणायची. सायंकाळी मूर्तीचे विसर्जन करताना करताना तिच्या गणेशमूर्तीच्या चेहेऱ्यावर मला नेहेमी अवकळा आलेली भासायची आणि रडवी छटा दिसायची.

※ ※ ※ ※ ※ ※ ※

०३. पातल्याची गाडी

झिलू पातल्याला बैलगाडीसाठी मुरातून गावठी पाडे आणायचे होते. मुरात दरडी नी चढणीच्या भागात वहिवाटलेली जनावरं घाटी बैलांपेक्षाही कामाला नंबरबाज निघायची. घाटी बैल म्हणजे इमारत मोठी पण कोकणातल्या धुवांधार पावसाला सरावलेले नसल्यामुळे मळे वटीत चिखलडीच्या कामाला कंडम ठरत. तसेच घाटी बैल बारमाही ओला हिरवा चारा खाणारे. कोकणात जेमतेम पावसाळी चार महिने ओला हिरवा चारा मिळाला तर. नाहीतर बारा महिने बत्तीस काळ करडण, पुतयाण आणि सरला, नाचण्याची काड नाहीतर उडीद नी कुळथाचं , उडदा- मुगाचं सुकं 'गुळी' म्हणजे कुळथाच्या शेंगांची सालं , असं सुकं खाणं मिळे. त्यामुळे बारमास हिरव्या चाऱ्यावर पोसलेली घाटी जनावरं कोकणात आंग धरीत नसत. त्यांच्या किमतीही गगनाला भिडणाऱ्या, पैसेवाल्याना परवडणाऱ्या. मुरातल्या पाड्यांच तसं नव्हतं, ओल्या सुक्या दोन्ही प्रकारच्या चाऱ्याची त्यांना सवय असे. त्यांच्या किंमती गोरगरीबाला परवडणाऱ्या, बाताबेताने असत. घाटी बैल बारा-चौदा वर्षानंतर टेकीला येत. पण मुरातले बैल वीस बावीस वर्षं डगत नसत.

झिलूने आपल्या सोबत गुराढोरातला जाणकार म्हणून वाडीतल्या जाणत्या विठबाला सोबत घेऊन मुरात जायचा बेत योजलेला होता. विठबा दर्दी होता आणि दुसरं म्हणजे मुरापासून जरा अलीकडे रायपाटण गावात त्याच्या मावळणीचे चेडू भागू दिलेले होते. तिच्याकडे वसतीला राहून दुसरे

दिवशी तासाभरात मुरात जाता येत असे. एखादा दिवस कमीजास्त राहण्याची वेळ आली तरी धास्ती नव्हती. झिलू दुपारी वाटेत खायला पाच भाकऱ्या नी सुक्या मिरचीची लसणीची चटणी घेऊन, अठरा रुपयाचा खुर्दा फडक्यात गाठ मारून बंडीच्या खिशात टाकून विठबा बरोबर बाहेर पडला. ते सकाळी अगदी भिणभिणताना घराबाहेर पडून मार्गस्थ झाले. शिरशातून कातळी, गोठिवरे, चवानवाडी, डोंगर मार्गे राजापूर गाठल्यावर जरावेळ थांबून भाकरी खाल्ली. मग मात्र वाटेत कुठेही न थांबता ओणी मागे दोघे जण काळवं पडताना रायपाटणला भागूच्या घरी जाऊन पोचले.

दुसरे दिवशी भागूचा दीर नी सासऱ्याला सोबत घेवून विठबा नी झिलू मुरात पोचले. पाव्हण्यानी मुरात ओळखीच्या दोघा चौघांकडे चौकशी केली. जनावरं पहायला सगळे जण सड्यावर गेले. तिथे अशीच पद्धत असायची. दोन तीन पाडे उमगले पण उंची जुळणारी नव्हती. बैलगाडीसाठी चौदा मुठी उंच पाडे लागत. पाड्याची उंची जमिनीपासून तो कोळ्यापर्यंत (वशिंड) मुठीच्या मापाने मोजीत. त्यात परत गाडी जोडीचे दोन्ही पाडे समान उंचीचे लागत. विठबाने सोबत मापाची काठी घेतलेली होती. प्राय: बहुसंख्य पाडे बारा मुठी भरायचे. मग शोध चौकशी करताना दरेकराकडे चार दाती उंच नींच पाडे असल्याची मागाडी लागली. सोबत असलेल्या लोकांनी त्याला बोलावून घेतले. त्याच्या जांग़ळात एक काळा कसरा नी एक पांढरा असे दोन पाडे चौदा मुठी भरले. पांढरा सरळ शिंगोटीचा, नी दुसरा मात्र अर्ध चंद्राकृती सुरेख कोचाऱ्या शिंगोटीचा होता. झिलूला जोड पसंत होता. मग विठबा नी पाव्हणा व्यवहार ठरवायला बसले. दरेकराने अठरा रुपये लावून धरले..... तो कसाच खाली उतरेना. शिकस्त करून सोळा रुपयाची बोली विठबाने फोडली. पण दरेकर ऐकेना म्हणताना मंडळी

व्यवहार मोडून उठली. भागूच्या दीराने झिलू ला डोळा मारून संकेत केला होता. सगळे बिन बोलत माघारी गेले.

भागूच्या घरी जाताना तिचा सासरा बोलला, "पाव्हण्यानूं तुमी वांयच दम धरा, सांजवान पुन्ना येवया, खय नाय खय चांगलो जोड भेटात." घरी जाऊन बापये जेवण करून लोट्यावर टेकलेले असताना दरेकराचा भाऊ नी म्हातारा पाडे घेऊन येताना दिसले. भागूच्या दारात अंबाड्याच्या खुंटाला पाडे बांधून म्हातारा दरेकर लोट्यावर येऊन टेकला. "माज्या झिलाक दुनयेचो अनभव म्हनशा तर नाय..... पैसो काय आज हा नी उद्या नाय ... उद्या काय होयत् देव जाणां..... पोरासारकी बाळगलेली वासरां देवची हत .... घेणारो त्ये लायकीचे व्हयो..... उद्या जनावरानी मालकाच्या नावान शाप

देता उपेग नाय..... आता दोगावांचाय ऱ्हावने... रुपाये अठरा द्येवा नी आपली वासरा ताब्यात घ्येवा..... " मग पुन्हा व्यवहाराचं गुऱ्हाळ लावून साडेसोळा रुपयाला सौदा तुटला. विठबाने रक्कम मोजून दिल्यावर म्हाताऱ्याने खुरसोडवणी म्हणून 'अधेली'परत दिली. त्याकाळी असा रिवाज होता की विकलेल्या जनावराची आबाळ झाली तर त्याचे शाप बाधू नयेत म्हणून विकणारा त्याला मोबदल्यात मिळणाऱ्या रकमेतून चवली - दोन आणे पावली अशी रक्कम विकलेल्या जनावराला गवत पेंड घालायला म्हणून खरेदीदाराला देवून जबाबदारीतून आंग सोडवून घेत असे. झिलूने अधेली खिशात टाकून आपल्याकडच्या काढण्या लावल्या नी पाडे ताब्यात घेतले.

दुसरे दिवशी पाडे घेऊन विठबा नी झिलू बाहेर पडल्यावर भागूच्या सासऱ्याने दृष्टीचा उतारा म्हणून नारळाच्या दोन बेलट्या अंबाड्याच्या दोरीत ओवून पाड्यांच्या गळ्यात बांधल्या. भागूचा नवरा नी दीर ओणीपर्यंत सोबत आले. पाडे सड्या शिवराला वहिवाटलेले. रोज सुटार फिरायची सवय, आता बराच वेळ रशी लावल्यामुळे मध्येच ओढण घेऊन धाव मारीत. ओणी गाठतो चौघेही बापये हरंबळून गेले. पाव्हणे तिथून माघारी गेले. आता झिलू नी विठू पाड्यांच्या मोरकीला दुशा बाजूला दोन काढण्या लावून पाड्याना मध्ये घालून एकजण पुढे नी दुसरा मागच्या बाजूला अशी चाल मारीत सुटले. राजापुरात पिराजवळ जाईतो पाडे नरम आले होते. तिथे रस्त्यालगत घरा जवळ थांबून दोघांनी भाकरी खाल्ली. पाड्याना पाणी दाखवले. घरमालक पाडे बघून खुष झालेला होता, त्याने सरल्याची पेंढी (भाताची रोपे) पाड्यांच्या पुढ्यात सोडून टाकली. पाड्यानी चार काड्या उचलल्या सारख्या केल्या.

घर गाठीपर्यंत पाडे चालसूर होते. त्यांच्या बरोबर चालून चालून विठबा नी झिलूच्या पोटरीत गोळे आले. गावात बातमी फुटल्यावर दोन चार दिवस पाडे बघायला माणसांची नुसती रीघ लागायची. झिलूने गाडीसाठी लाकडांची जम केलेली होती. कातळीवरचा गोपी सुतार त्या भागात कसबी सुतार म्हणून ओळखला जायचा. झिलूने बैलगाडीचे काम त्याला दिलेले होते. आपल्या घरासमोर उघड्या कातळावर मांडव घालून तो त्याचा भाऊ बाबल्या नी त्यांचे पोरगे असे चार जण मिळून गाडीचे काम करायचे.भादव्यात तोडलेल्या आईन,किंदळ नी सागवानाच्या जुस्त मापाच्या बारदार टवण्या (तुकडे) मारून महिनाभरा पूर्वीच चवाळ्याने गोपीच्या घराजवळ आणून टाकलेल्या होत्या. तिथेच चिरकामी लावून फळ्या नी जाडे लफ्फे चिरून घेतलेले होते. झिलू सकाळी भाकरी बांधून सुताराना मदत करायला कातळीवर जायचा. रंधा ओढायला नी धरा सवरायला तो मदत करी.

पंधरवडा भरात बरंच काम जवळ आलं. चाकाचं जोडकाम झाल्यावर लोखंडी धावा बसवण्यासाठी गोपीने मांडवातच भाता आणून जोडला. लोखंडी पट्टी गोल वळवून दोन चाकाच्या दोन धावा बनवायला दोन पोती कोळसे सोपले नी दोन दिवस मोडले. सुतारांचे पोरगे नी झिलू घण मारून मारून पुरते हैराण झाले. मग एकेक धाव लाल होईपर्यंत तापवून चाकाच्या भोवती ठोकून ठोकून बसवल्यावर घागरीने पाणी ओतून ती फीट करण्यात आली. धावा बसवण्याचे काम त्याकाळी राधानगरीतले घिसाडी करीत. गाडीवाले चाकाचे लाकूडकाम करून झाल्यावर दोन्ही चाके बैलगाडीत टाकून राधानगरी गाठीत नी तिथे घिसाड्याकडून धावा बसवून झाल्यावर वापस येत. गोपी सुतार रुखाडी नी जिगरबाज

असल्यामुळे झिलूला हा द्राविडी प्राणायाम करायला लागला नाही. दोन्ही धावा उजू झाल्यावर कडेच्या गोलाकार वाकांवर आणि आऱ्यांवर दर्शनी बाजूला देखणी वेलबुट्टी नक्षी कोरायचे काम गोपी स्वतः करायला बसला. तोपर्यंत बाकीच्या तिघांनी हौद्याचा सट जोडायचे काम सुरू केले.

आता दिसामाजी गाडी आकाराला यायला लागली. चार सुतार नी पाचवा बिगारी म्हणून झिलू, यांचा पाऊण महिना मोडला. पण गोपीने मन लावून चोख काम केले. चाकांच्या आऱ्या, गोल वाके नी हौद्याच्या कडणी याच्यावरचे नक्षीकाम नजर लागण्यासारखे झाले होते. काम पुरे झाले नी भिडे भटजींनी मुहूर्ताच्या दिवशी गाडीची पूजा केल्यावर नवे पाडे जुंपून कात्रादेवीच्या मेखळ्यापर्यंत गाडी नेऊन आणली. मुहूर्ताचे राजापूरचे भाडे गाडी जोडायला पैसे देणाऱ्या दादा कुलकर्णींचेच मिळाले. झिलूची गाडी होईपर्यंत गावात फक्त दोनच गाड्या होत्या. त्यापैकी शिर्सेकराचा दारवेचा धंदा असल्यामुळे स्वतःचे काम सांभाळून तो क्वचित कधीतरी फावेल तेव्हा भाडी मारी. दुसरा गाडीवाला कातळीवरचाच सखाराम तेली... तोही मोठा पैसेवाला..... त्याची मोठी शेतीभाती..... त्याचीही गाडी हुकमी मिळेल याचा नेम नसे.

झिलूला कायम राजापूर हातीवले कोंडये अशी लांबीची भाडी मिळत. एखादा दिवसही भाड्यापुढे सवड मिळेना. घरच्या शेतीभातीचे काम असे त्यावेळी आपला चुलत भाऊ नायतर पाडे आणायला सोबत नेलेला विठबा पातले दोघांपैकी कोणाला तरी पाठवी. आठवड्यातून किमान तीन वेळा राजापूर नी हातीवल्यात मुसलमान मच्छीवाल्यांचे भाडे मिळत असे. सीजनभरच्या कमाईतून सवाईच्या बट्ट्याने काढलेले पुरे पैसे फेडून तीस रुपये उरले. झिलूचे गाडी नी बैल जोडी अख्ख्या तालुक्यात

नावाजीत. पाड्याना वेसण घातलेली नव्हती. चाबूक, काठी तर चुकून सुद्धा लागत नसे. राजापूर भाड्यासाठी झिलू पहाटेच घराबाहेर पडे. डोंगरतिठ्यावरून राजापूरची दिशा दिली की दस्तुरी नाका येईतो झिलू निसूर आडवा होई. अरुंद रस्त्यावरून समोरून वाहन आले की शहाणी जनावरे साईड धरून उभी रहात. दस्तुरी नाका जवळ आला की जनावरे गती वाढवीत नी मग झिलूला जाग येत असे.

गाडी जुंपताना कधीच मालकाला जू उचलून त्यांच्या मानेवर ठेवावे लागत नसे. पाडे माना वाकवून शिंगं तिरपी करून अच्चळ जुवाखाली घालून जू मानेवर घेत. झिलूला ओळखणारे बाजारातले लोक तो गाडी जुंपायला निघाला की मुद्दाम थांबून पाडे आपण होऊन जू कसे उचलतात हा नजारा कौतुकाने पहात असत. झिलू गाडीत भरवण करीतो पाडे बांधल्या जागेवर सावलीला बसून रवंथ करीत असत. भरताड झाल्यावर पाड्याना न्यायला तो येताना दिसला की शहाणी जनावरे आपण होऊन उभी रहात.काही वेळा माडबन, साखर, उपळे , तारळ, नाणार, कुंभवड्याकडच्या बैलगाड्या रस्त्यात गाठ पडत. अशावेळी झिलूचे पाडे साईड काढून पुढे जात नी मग मुक्काम येईतो कोणालाच आपल्या पुढे

जाऊ देत नसत. बऱ्याच गाडीवाल्याना या गोष्टीचे खूप वैषम्य वाटे. वाटे तिटेत झिलूची गाडी येताना दिसली की काही जण छमक्या ओढून बैलाना धावडवायला सुरुवात करीत.

अशावेळी झिलूचे बैलही चौक लावून पळत. त्यांच्या पुढे धावणारे बैल दमगीर होऊन त्यांची गती कमी झाली की झिलूचे पाडे वेग वाढवून साईड मारीत पुढे जात. अशावेळी काही जण आपल्या बैलाना चाबकाने अक्षरशः फोडून काढीत. पण त्यांचा दम झटकत नसे. विशेषतः घाटावरच्या खिल्लारी जोडीची घमेंड असलेले गाडीवाले इरेसरीने शिकस्त करीत. पण दहा-बारा वर्षाच्या कारकिर्दीत त्याच्या बैलाना मागे टाकून जाणारी एकही गाडी भेटली नाही असे झिलू मोठ्या अभिमानाने सांगे. खरे तर गाडीचा धंदा सुरू केल्यावर मेळातून जाताना आपली गाडी पुढे काढायचा प्रयत्न उमेदवारीच्या काळातही झिलूने केलेला नव्हता. पण ही जिगर त्या पाड्यांमध्ये कशी नी कुठून उद्भवली हे एक कोडेच आहे.

४.सात मैल चार फर्लांग रस्ता

नावळे दस्तुरीनाका ते चिवारी चवाठा सात मैल चार फर्लांग रस्त्या बांधायचं कंत्राट चिवारीतल्या भाऊ घाट्याने घेतलं ही वार्ता पसरल्यावर जानशी, कुवेशी, नावळे, चिवेली आणि हरचली या पाच गावातल्या पैसेवाल्या असामीना अगदी पोटशूळ उठला. हरचलीचा बळी भंडारी, कुवेशीतला बाबुराव देसाई आणि नावळे मुसलमान वाडीतला इद्रूस कोळशेकर हे सिलीपाट आणि खुटवळाचा धंदा करीत. देसायाचा पावसाळी काठ्या- बांबू चा मोठा धंदा होता. तो खाडी काठच्या सहा सात गावानी फिरून आगाऊ बयाणा देवून गावागावानी मुख्य रस्त्याच्या कडेला आवती, मलकी काठ्यांचे थप माऊन ठेवीत असे. पाऊस सुरू झाल्यावर साधारण महिनाभरात बेटांची तोड होत असे. काठीची लांबी किती भरते त्या प्रमाणात नऊ हाती तीन तोडे आणि चवथा तोडा सात किंवा सहा हाती भरेल तसा मारून वीस वीस तोड्यांची बंडलं काठीच्या बेळाने बांधून वाडी वाडीवार रस्त्याच्या कडेला एकत्र करून थप मारलेले असत.

गावातले मोठे ठिकाण वतन वाले लोक देसायाकडे थेट व्यवहार करीत. किरकोळ गिऱ्हाईकं त्यांचा माल आपल्याच ठिकाणात ठेवीत आणि माल न्यायला ट्रक आला की , देसायाचा कोण कारभारी ट्रकासोबत असेल त्याला भेटून माल देत. गावा गावानी काही मध्यस्त अडले नडलेल्या किरकोळ गिऱ्हाईकांकडून कमी दराने माल

खरेदी करून देसायाला घालीत. नावळ्यातला इद्रूस मोमीन खुटवळाचे कोळसे पाडून ते मुंबई, कोल्हापूर, सांगली कडच्या ठोक व्यापाऱ्याना घालीत असे. दसरा झाल्यापासून ते अगदी शिमग्यापर्यंत गावोगाव सडा माळावर कलम लागवडीसाठी प्लॉट मधल्या आंजणी, करवंदी, उक्षी, पंचकोळीच्या झाळी, चारणी, कुंबये, गोडे कांदळ, अष्ट, असये आणि इतर बारबंडी झाडांची मुळकंडं (त्याना मुळवा किंवा खुटवळ म्हटलं जात असे) खणून काढून त्याच्या ढिगोळ्या करून त्या कवळाने (जंगली आंजणी पंचकोळीच्या झाळी बेटातील ओल्या डहाळ्या) झाकून त्यावर मातीचं लिंपण करून मग आग घालण्यात येई. त्यामुळे ढिगोळ्यांमधली लाकडं अर्धवट जळून त्यांचा कोळसा पडत असे.

कलम लागवडीसाठी ठिकाणांमधला मुळवा- खुटवळ काढायचं काम सुरू झालं की इद्रूस आणि त्याच्याकडे कोळसा पाडायचं काम करणाऱ्या फैलातले कामदार टेळ ठेवून फिरत असत आणि खुटवळाची खरेदी करीत असत. मग तो खुटवळ जाळून त्याचा कोळसा पाडून झाला की तो वाहतूकी योग्य जागी एकत्र केला जात असे. नावळ्यासह आजू बाजूच्या गावानी सडा माळावर इद्रूसचे कोळशाचे डेपो मारलेले असत. ट्रकाचं भरवण होईल इतपत माल साठल्यावर ट्रकात भरून कोल्हापूर सांगली शहरात ठोक व्यापाऱ्यांना घातला जात असे.

हरचलीतल्या बळी भंडाऱ्याचा सिलीपाटाचा धंदा होता. तो गावोगावी इमारती लाकूड खरेदी करून ते मुंबई. कोल्हापूर, पुणे अशा शहरानी लाकूड व्यापाऱ्याना घालीत असे. १९२० ते १९८० या चाळीस वर्षाच्या काळात कोकण किनारपट्टीवर खाडी काठच्या

गावानी कलम लागवडीसाठी प्रचंड प्रमाणात झाडांची तोड झाली. त्याकाळात सिलीपाट आणि कोळसा व्यापाऱ्यानी गबरगंड कमाई केली, बळी भंडारी सिलीपाटाच्या जोडीला हापूस आंबा व्यापार आणि सावकारीही करायचा. भाऊ घाटे हा चिवारीतला मोठा जमिनदार. तो दरवर्षी स्वत:ची दोन अडीज हजार काठी घालीत असे. गेली चार पाच वर्षं तो कलम लागवड करणाराना मुळवा- खुटवळ काढून देण्याची कंत्राटं घेई.

नावळे ते चिवारी रस्त्याच्या कामाचा मक्ता तो भाग आडवळणी दुर्गम असल्यामुळे कोणी घ्यायला तयार होईना. दोन तीन वर्षं ते काम रेंगाळलेलं होतं. चिवारीतले दादा खोतांचे लहान भाऊ शानुकाका सचिवालयात मोठ्या पदावर होते. त्यानी या रस्त्याच्या कामाचा पाठपुरावा चालवलेला होता.रस्त्याचा सर्वे करून प्रारंभिक सोपस्कार चुटकीसरशी पुरे झाले पण काम करायला कोणी कंत्राटदार पुढे येईना. वरून नेट लागला की जिल्हाबोर्डातले अधिकारी राजापूर भागात सरकारी कंत्राटं घेणाराना हे रस्त्याच्या कामाची गळ घालीत. असाच एक कंत्राटदार- बापू पवार, याला अगदी अकल्पित भाऊ घाट्याचं नाव सुचलं. हा माणूस खटपट्या आहे. म्हणून त्याने भाऊची भेट घेतली. काम मोठ्या खर्चाचं, भाऊच्या आवाक्या बाहेरचं होतं. पण काहीतरी उलाढाली करून थोडीशी जम करून कामाला सुरुवात केली असती तर पहिला टप्पा पार केल्यावर पहिला हप्ता मिळाला असता आणि मग पुढची जुळणी करणं फारसं अवघड गेलं नसतं.

गावात दगडी बंधाऱ्याचं बांधकाम करणारी पाच मोठी फैलं होती. त्याना हाताशी धरून सीझन झाल्यावर हिशोब देण्याच्या

बोलीवर काम करून घेता येणारं होतं. बापू पवाराचं सांगणं भाऊ घाट्याने मनावर घेतलं. त्याच्यासोबत रत्नागिरीला जावून सायबाला भेटून भाऊने कामाची पूर्ण माहिती घेतली. परत आल्यावर राजापुर मामलेदार ऑफिस मधले अव्वल कारकून नाना जठार आणि बापू पवार यांच्या सोबत आपल्या फैलातले जाणकार गडी घेवून त्याने निर्धारीत रस्त्याच्या एरियाची पहाणी केली. पूर्ण रस्त्याचा भाग़ खुणेचे दगड पुरून आखलेला होता. दुसरे दिवशी आपल्या फैलातले गडी घेवून भाऊ घाट्याने कामाचे बजेट ठरवण्याच्या दृष्टीने कामाचा तपशीलवार आडाखा घेतला. नावळे दस्तुरी नाका ते बानखिंडीपर्यंत साधारण एकतृतियांश अंतरापर्यंत सपाटीचा भाग होता. तिथलं काम फार अवघड नव्हतं. त्या भागात कातळी भाग फार कमी पण प्रचंड झाळी - झाडी होती. चालचलावू अंदाजाने साठ सत्तर लोड खुटवळ त्या भागात सहजपणे मिळणारा होता. त्या खुटवळातूनच गडी मजूरी भागून थोडीफार रक्कम शिलकी पडली असती. त्या नंतरचा बानखिंडीचा साधारण दीडशे वाव लांबीचा भाग सडावळी कडून गावदरीकडे गेलेला उतरणीचा भाग होता. त्या भागात आरंभी छातीभर उंच भराव टाकून रस्ता उठवावा लागला असता. त्यापुढे क्रमा क्रमाने उंची कमी होत गेलेली होती.

बानखिंडीचा दुसरा टेणा संपून गावदर सुरू झाल्यावर बाणेवाडी जवळचा बेताचा चढ आणि ताम्हनकराच्या घाटीचा मोठा टोणा चढल्यावर चवाठ्यापर्यंत सगळी सपाटी होती.कामातला भारी नी खर्चिक टप्पा बान खिंडीतला भराव घालून करायचा भाग हाच होता. भाऊचे गडी कामात मुरलेले आणि कसबी होते. त्यानी आजूबाजूला

फिरून भराव घालण्या साठी पुरेसा घडघड्या-अनगळ धोंड्याचा (बोल्डर) माल मिळेल की नाही याचा पक्का अंदाज घेतला. आपापसात चर्चा केल्यावर बाबल्या येरम म्हणाला, "भाऊनु, शे- दीडशे सुरुंग घालुचे पडती. पण भरावाचा काम हयच्या हय भागात. आमच्या वांगडा बानेवाडकरांचा फैल आसला तर दोन म्हयन्यात उतारा पावतचा मकण पुरा व्हयत. बापयांच्या फैलातले निम्मे गडी सुरुंग घालूक पाव हिश्शान गडी मोट्यो धोंडी फोडुच्ये कामार नी उरलेले गडी नी बायल मान्सा भर घालुक ठेवायाची. माजो अंदाज दोन आणे दुकू चुकणार नाय. बाबल्याच्या अंदाजावर भाऊचा पूर्ण विश्वास होता. तो हातातल्या चोपडीत गड्यानी केलेल्या अंदाजाप्रमाणे नोंदी करीत होता. ही चर्चा होईतो साडेबारा होवून गेले होते. लांबून जेवणकरी येताना दिसला.कामाचा अंदाज घेईतो संध्याकाळ होणार याची कल्पना असल्यामुळे घरून गड्यांसह सात जणांच जेवण घेवून गडी पाठवायची आगावू व्यवस्था भाऊने केलेली होती.

आंब्याच्या सावलीत बसून तांदुळाच्या भाकऱ्या काळ्या वाटाण्याची उसळ, खारातल्या मिरच्या नी दही खाल्ल्यावर सगळ्यानी पान जुळवून जरा आराम केला. घटकाभर इस्वाटा घेतल्यावर धाकू थोटम म्हणाला. " चला , लय लोळलास. काम बेगुन पुरा झाल्यार येळी लौकर घरा जांव.... तां परवडला ..... रिक्यामा बसोन येळ मोडूचो नाय." मंडळी उतरणाला लागली. सूर्य मावळण्यापूर्वी चवाठ्यापर्यंतच्या भागाची पहाणी करून अंदाज बांधायचं काम पुरं झालं. बानघाटीच्या निम्मे उतारापासून गोडे कांदळ, सारिवले, अष्ट, कळंब अशी सव्वाशे झाडं होती. शेवटच्या घसारीच्या भागात चार ते पाच ट्रकच लोड

होईल एवढी आईन, कांदळ नी किंजळीची झाडं होती. गावदरीत मळ्याच्या कडणीला गड्याच्या वेंगेत मिळणार नाहीत एवढी पन्नासेक उंडलीची झाडं होती. रात्री जेवून खावून झाल्यावर भाऊने सगळी मांडावळ नजरेखाली घालून जमा खर्चाचा अंदाज बांधला. दोन दिवसानी बाबल्या नी धाकु याना सोबत घेवून भाऊ पुन्हा एकदा कामाचा संपूर्ण भाग फिरून मांडावळी प्रमाणे ताळमेळ घेवून आला.

बापू पवाराना भेटून भाऊ घाट्यानी आपला खर्चाचा अंदाज दिल्यावर बापूनी त्याना इतर खर्चाची कल्पना दिली. मुख्य साहेब एकूण बजेटच्या १०% त्याचं कमिशन घेणार, त्या बाहेर काम पुरं होईल तसतसा पहाणी अहवाल देण्यासाठी येणाऱ्यांचे हात ओले करायचे असे कामाबाहेरचे खर्चाचे तपशिल त्यानी सांगितले. या शिवाय सरकारी हिशोब मिळेपर्यंत कामगारांची मजूरी नी अन्य खर्च भागवण्यासाठी प्रसंगी व्याजाने पैसे घेवून व्यवहार पुरे करावे लागतात ती बाबही खर्चाचा अंदाज देताना गृहित धरावी लागते. या गोष्टी भाऊना नव्यानेच कळल्या. या व्यवहारात मोठी जमेची बाजू होती ती म्हणजे लाकूड वहातूक करणे, बोल्डर वहातूक हे परवाने बिन बोभाट नी विना खर्चात मिळणार होते. कंत्राट मंजूरीची ऑर्डर मिळेल ती सोबत असली की महाराष्ट्रभर कुठेही अडचण आळी नसती. तसेच बोल्डर फोडण्यासाठी लागणारे सुरूंगाचे सामान म्हणजेदारू-वाती यांचाही परवाना विनासायास मिळणार असल्या मुळे या साठी जादा पैसे द्यावे लागणार नव्हते. सगळा अंदाज घेवून पक्के टेंडर तयार करून दोघेही रत्नागिरीला जावून जिल्ह्यातल्या सायबाला भेटले.

टेंडर दिल्यावर साहेबाने त्याना संध्याकाळी आपल्या बंगल्यावर येवून भेटायला सांगितले. संध्याकाळी साहेबाला भेटल्यावर अव्वल कारकूनाने भाऊच्या टेंडरमध्ये काही बदल सुचवले होते. खर्चाचे बजेट दहा हजाराने वाढवलेले होते. भाऊ या व्यवसायात नव्यानेच पडत असल्यामूळे वरचा हप्ता आगावू रोख देण्याची आपली ऐपत नसल्याचे भाऊने स्पष्टच सांगितल्यावर त्यातले निम्मे कामाच्या मोबदल्याचा पहिला हप्ता मिळाल्यावर आणि उरलेले पैसे दुसरा हप्ता मिळाल्यावर द्यायचे ठरले. व्यवहार पक्का करून ते बाहेर पडले. दुसरे दिवशी सरकारी नियमाप्रमाणे विहीत नमुन्यात प्रस्ताव करून तयार होता. त्यावर सह्याकरून तो सादर केल्यावर "आठवडाभराने खेप करून बयाण्याची रक्कम भरून वर्किंग ऑर्डर घेवून जावा. " असं साहेब म्हणाले आणि भाऊ नी बापू पवार राजापूरला निघाले.

अगदी अकल्पितपणे भाऊंचे नशिब उघडले होते. त्यानी घरचे देव, ग्रामदेव याना अभिषेक केले. आता बाबल्या नी धाकू यांची रोज संध्याकाळी हुकमी फेरी व्हायची नी पुढचे पक्के बेत योजून त्याची चर्चा व्हायची. काम तीन सीझनमध्ये पूर्ण करायचे होते. रस्त्याची रुंदी निर्धारित केल्यापमाणे ठेवायची होती. पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी पूर्ण लांबीला एकाबाजूने दीड बाय दीड फूट चर मारायचा होता. पहिला टप्पा दोन मैल चार फर्लांगाचा नी त्या पुढचे दोन्ही टप्पे दोन दोन मैलाचे ठरवून दिलेले होते. संबंधित विभाग ते टप्पे पूर्ण झाल्यावर पहाणी करून मंजूरी देणार होता आणि त्यानंतर टप्प्या टप्प्याने उरलेल्या रक्कमा मिळायच्या होत्या. पहिल्या टप्प्याच्या कामाचा अंदाज घेतल्यावर बाणे वाडीचे फैल आणि कुंभारांचे फैल

जोडीला घ्यायचे ठरले. त्या फैलातल्या म्होरक्याना बोलावून व्यवहाराची बोलणी सुरू झाली. थोटम, येरम, बाणे आणि कुंभार या चारही फैलातले मिळून अठ्ठेचाळीस गडी नी तीसेक बायल माणसे एवढी जमात ठरवलेली होती. गडी पैऱ्याना आठवड्याला निम्मे मजूरी आणि गणेश चतुर्थीला उरलेला हिशोब द्यायची बोली झाली . सगळी जम करून फायनल ऑर्डर आणायला भाऊ रत्नागिरीला गेले. अव्वल कारकूनाने शब्द दिल्याप्रमाणे वर्किंग ऑर्डर तयार होती. बयाण्याची रक्कम भरणा करून साहेबाला हजार रुपये देवून भाऊ परत आले.

मुहूर्ताच्या दिवशी मामलेदार साहेब, तालुका बोर्डाचे अध्यक्ष आलेले होते. मुहुर्ताचा नारळ फोडून मंडळी रवाना झाली आणि कामाला सुरूवात झाली. निर्धारित अटीप्रमाणे रुंदी ठेवणे आवश्यक होते म्हणून फूटभर सरस माप घेवून चिव्याच्या काठीचे तुकडे करून त्याप्रमाणे लाईन दोरा ताणून रस्त्याचा भाग उंचवटे खणून आणि डबऱ्यामध्ये दगड मातीची भर टाकून ती धुमसाने ठोकून पृष्टभाग सवथळ करण्यात येत होता. कडेला पाण्याचा निचरा होण्यासाठी चर आखून घेवून खणकाम करायचे काम एकमार्गी कुंभारांच्या फैलाला दिलेले होते. थोटमांचे फैल रस्ता सवथळ करण्यासाठी लागणारे लहान मोठ्या साईजचे दगड फोडायचे काम करीत होते. रस्त्याचे लेव्हलिंग आणि कडा बांधण्यावर धाकूला मुक्रर केलेला होता . बाबल्याचे फैल खुटवळ काढायला ठेवलेले होते. काम सुरू झाल्यावर दुसऱ्याच दिवशी धोंडे फोडायला छिन्या नी मोठ्या धोंडी फोडायला सुरूंगाचे सामान आणायला खारेपाटणला बंदरावरच्या दादा गाडांच्या दुकानात भाऊ स्वत: गेले. सुरूंगाच्या सामानाचा रितसर परवाना होता. दादा गाडानी

भाऊशी बोलणे केल्यावर हे चांगले पतवान आणि मोठे गिऱ्हाईक आहे हे ओळखले. गाडांचा पिढीजात धंदा होता. ब्राह्मण माणूस सहसा लबाडी करून देणं बुडवणार नाही असा त्यांचा पक्का विश्वास होता. तसं त्यानी बोलूनही दाखवलं. लक्ष्मी पुजनापर्यंत जमेल तेवढी तरी बाकी पुरी करण्याच्या अटीवर लागणारा माल उधारीवर देण्याची बोली ठरली. यादीप्रमाणे सामान ताब्यात घेवून भाऊ परतीला लागले.

धाकू नी बाबल्या हे इमानी होते. कामगारांवर त्यांचा चांगलाच वचक होता. जरा कोणी दुर्लक्ष हलगर्जीपणा करताना आढळला तर दोघेहीजण त्याला फैलावर घेत. "तीन सीजन पुरणारा ह्या काम भाऊंच्या म्हेरबानीन मिळालेला हा. ह्या काम चांगला झाला तर भाऊंची पत वाढात नी आणकी आणकी कामा तेंका मिळती. ते तगले तर आपल्याक कायमचे रोजमुरो मिळात. तवा आपल्या घरचा समजून आंग मोडून काम करूक व्हया..... भाऊ काय सदी आमच्यार नदर करूक ऱ्हवणार नाय. पन आमी तेचे मुखत्यारी आसंव ... इला काय नी ग्येला काय असला हलगर्जीपान आमका खपणार नाय. आमका ह्या सांग़ॉची येळच येवक् देव नुको..... " हे त्यांचं सांगणं असे. येण्या जाण्याच्या वेळा दुपारी जेवणं नी विश्रांतीची वेळ अगदी वक्तशीरपणे पाळली जाई. कामाचा झपाटा बघून भाऊ भलताच खूश होता. जेवताना तोंडी लावण्यासाठी अधून मधून फोडणीच्या मिरच्या, दोन तीन दिवसानी मडकी भरून ताक दिलं जायचं. पंधरवडा झाल्यावर आयतवारी कोंबड्याचं मटण देण्याचा भाऊचा विचार होता. तसं धाकू बाबल्याकडे बोलल्यावर त्यानी भाऊला चांगलंच सुनावलं. "गडी पैरी काम करतहत ती काय म्हेरबानी नाय. खरा म्हणशा तर ह्येंका कायमचा

काम खंय मिळणार हा ? आता म्हणशा तर निक्ती सुरवाती झालेली हा. आमी दोगव् जण बारीक लक्ष ठेवन् ऱ्हवला हाव म्हणून गडी नी पैरी आंग मोडून काम करतंत ..... नायतर ह्येंच्या गांडीत म्हनशा तर लय मोडी हत..... ”

तोंडात साठलेली पानाची गुळणी थुकून बाबल्या पुढे बोलायला लागला. “ ह्ये हरामी तुमका कदी डबऱ्यात घालती तां कळनार पन नाय... ह्या रंगावर तुमी भुलो नुको नी अर्द्या हळकुंडान पिवळे होव नुको. मजुरीच्या भायर् येक तांबडे पैसो दुकू द्येव नुको..... येकदा फुकट खावची तीच व्हैवाट पडात..... अर्दा आदिक तरी काम मार्गी लागॉने..... सरकारात्सून तुमचे हिसाब येवने ..... मग्ये लय थोडा बगुया.... ” धाकू म्हणाला, “ तुमी गणेश चवतीच्या टायमाक बिनबूड हिसाब दिलास ना तरी सगळे खुस व्हती.... तुमी लोन्चा मिर्ची नी ताक पानी द्येतास ना ताच लय हा.... पन ह्येच्या फुडे आनकी काय जादाचा द्येव नुको..... तेना वायट् पायंडो पडता..... मान्साक जादा खावक् मिळाला ना की तेची चरबी नी गांड मस्ती वाडता..... काम नाय वाडणार तां उलटा कमी होयत्..... भाऊ तुमी आपले पाय जमिनीर घट ठेवन् ऱ्हवा..... तुमका परचित्व घेवची असात तर फुडचे पंदरा दिवस मिरचीचा फासूक पन दाकवू नुको..... मग्ये ह्येच कामगार कसे टोमने मारतात तां बगा, आज पावत खालानी त्येचो हगॉन गू झालो..... तेची याद नाय ऱ्हवनार ... ह्ये उल्टा आयकवती..... आमची मिर्ची लोन्चा बंद केलानी हा..... आता येवड्या चाळीस पन्नास माणसांक दोन फाका द्येवची म्हटली तरी दीड पायली मिरशांग लागता नी त्येच्या भायेर तेल मीठ म्होवरीचो सराजम लागता...पन खाणारो काय म्हननार....

मिरचीची दो दोन फाका देयत् ती पन बंद केलानी..... " त्या जानपद कुळवाड्यांचे भावरथी नी दूर गामी विचार ऐकल्यावर भाऊ अक्षरश: सर्द झाले. त्यानी कान उघाडणी केल्यावर भाऊना वास्तवाचे भान झाले. एकेक दिवस पाठी पडतो आहे तसतसा खर्चाचा आकडा वाढत चाललेला आहे. पहिला टप्पा पुरा होवून खर्चाची रक्कम हाती येईतो खर्चाची नवीन त्रैराशीके मांडायची नाहीत नी धाकुच्या म्हणण्याप्रमाणे जमिनीवर पाय घट्ट रोवून रहायचं. असा पक्का निर्धार भाऊनी केला.

आत्तापर्यंत चाललेलं काम बजेट प्रमाणे आणि चोख पार पडत होते. जमेची बाजू म्हणजे कवळ दोनशे पेक्षा अधिक भारे आणि खुटवळ फुल्ल तीन ट्रक एवढे ढीग झाले होते. रस्त्याची रुंदी, कडेच्या चराची मापे भाऊ अधून मधून जातीनिशी मोजून बघीत असत. मुळात मापाची कांडी सरस असल्यामूळे खोट काढण्या सारखे काहीच नव्हते. काम उठायला लागले तस तसे भाऊना हुरूप यायला लागला होता. दीडेक महिन्यान काहीच हासभास नसताना बळी भंडाऱ्याने भेटायला बोलावणं पाठवलं. नेहमीच्या प्रघातानुसार धाकू आणि बाबल्या याना सोबत घेवून संध्याकाळी काम उरकल्यावर भाऊ बळीला भेटायला गेले. "येवा भाऊनु...." बळीने खड्या आवाजात हाकारले. मग होवऱ्याच्या दिशेने मोहरा वळवून त्याने आवाज दिला, "ग्ये धकट्ये, आयकल...? घाटे भाऊ इलेहत , तेंका वयच् साकार टाकून दूद हान बगू...."भाऊ ओशाळं हसत म्हणाले," बळी नाना, दूद कशाक..... फकस पानाची चंची द्येवा..... " त्यावर गडगडाटी हसत बळी म्हणाला, "असा कसा, तिनसानच्या येळेक भटजी काका दारात इले..... तेच्यात तुमी म्हंजे आता सादेसुदे असामी ऱ्हवलेले नाय, तुमी मोटे

कंट्रक्टर... मामलेदारापासून अंमलदारापावत तुमची वट.... मी आपलो फाटको भंडारी.... तुमी भटगडी, तुमका काय देयाचा? दारात चार दुबत्यो म्हशी हत, वंयच दुदाचो घोट घ्येवा नी गोड तोंडान घरी जावा....."

भाऊंसाठी चांदीच्या मोठ्या ग्लासातून गरम दूध घेवून बळीची दुसरेपणाची मागारीण आली. गोरीपान, उंच आणि भरल्या अंगाची दागिन्यानी मढलेल्या रखमा भंडारणीला बघून भाऊ चक्रावूनच गेले. ती कायम सुपभर दागिने घालून वावरते असं ते ऐकून होते आज प्रत्यक्ष नजरेला आलं. गळ्यात बेंबटापर्यंत लोंबणारी पुतळ्यांची माळ. त्यातली एकेक पुतळी त्याकाळी असलेल्या ढबू पैशाच्या आकाराची नी दीड तोळ्याच्या भरीची सहज होती. जाडजूड गंथन , चौपदरी मोहनमाळ, तासाच्या भरीव मण्यांचा पूर्वकाळी राजेरजवाडे घालीत तसला पाचपदरी सर. दोन्ही दंडात सोन्याच्या वाकी, दोन्ही हातांमध्ये मनगटा पर्यंत सोन्याच्या बांगड्या पाटल्या . दोन्ही हातांच्या चारही बोटात आंगठ्या नी वळी आणि कमरेला चार आंगळं रूंद चांदीचा कमरपट्टा.....

देवादिकांच्या चित्रात दागिन्यानी मढलेली लक्ष्मी दाखवतात तशी पन्नास -साठ तोळे सोनं अंगावर वागवणारी रखमा समोर उभी राहताच अकल्पितपणे "नमस्कार हो वहिनी.... "असे शब्द भाऊंच्या तोंडातून बाहेर पडले. त्यावर लाजून , "ग्ये बायमाज्ये.... भावजीनूं तुमी भट , आमी तुमच्या पाया पडायचा....." असं म्हणत ग्लास ठेवलेली थाटली तिने भाऊंच्या हाती दिली. भाऊ हसत म्हणाले, "तिनसानच्या येळेक तुमी लक्षुमी सारक्यो सजोन सामनी इलास..... घरातली बाईल ही लक्षुमीच आसता..... "

मनोमन सुखावत रखमा माघारी वळली. गरमा गरम दूध पिवून भाऊ पान जमवायला लागल्यावर कसलीही लांबण न लावता बळीने थेट मुद्द्याला हात घातला. रस्त्याचं काम हे भाऊच्या आहारा बाहेरचं. तो काय पैशाची मोट बांधून बसलेला सावकार गडी थोडाच होता? एवढी मोठी गडी पैऱ्यांची फैलं सांभाळायची म्हणजे काय चेष्टा नव्हे. महिना दोन महिने गेल्यावर कामगार मजुरीला हात पगळणार. सरकारी पैसा काय झटपट थोडाच मिळणार? सरकारी काम नी सहा महिने थांब अशी लांबड लागणार. एकदा पत गेली विषय संपला. म्हणून ह्या व्यवहारात भाऊने चार आणे ? आठ आणे भागीदारी आपल्याला द्यावी. खर्च सगळा आपण उचलू. मात्र या कामात खुटवळ नी सिलीपाट असेल तो सगळा बळीला द्यायचा. ती रक्कम वजा करून राहिलेली रक्कम जेंव्हा कधी सरकारी पैसा येईल तेंव्हा सावकाश मिळाली तरी चालेल. असा प्रस्ताव बळीने दिला.

तीन्ही टप्प्यात साधारण किती खुटवळ नी सिलीपाट किती मिळेल याचा बळीने सांगितलेला अंदाज एवढा अचूक होता की भाऊ अक्षरश: थक्क झाले. सगळं सांगून झाल्यावर बळी म्हणाला, "तुमी नीट इचार करा नी हप्त्याभरात काय तां येवजून माका सांगा..... आता तुमी माज्या दारात खेटे घालू नुको माका निरोप द्येवा मी येयन्...." बळीची मागणी ऐकून भाऊ पुरते चक्रावून गेले. ही म्हणजे नस्ती आफतच होती. परत जाताना बाबल्या आणि धाकू दोघानीही बळीची संगत बिलकूल करू नये असा सल्ला दिला. धाकू म्हणाला "ह्येच्यो भंडार बढायो फकस आयकोच्यो..... ह्येचे येक येवार धड नाय..... आदी रुपयाची वस्तू दर पाडून चार पैशाक घ्येनार. तरी दुकू येवार

पधड पुरो करनार नाय..... ह्येका काट्यो घालनारे ल्वॉक सांगतत ना..... आवंदाचो माल दिलास तर ग्येल्या शिजनचो हिसाब भागवनार, तेका म्हाल नाय दिलास तर पैशे डुबले..... तेच्याशी येवार करणारांचो अडकून शिताराम म्हंतत तशी गत झालेली हा."



त्यावर बाबल्या बोलला, "धाकू म्हंताहा तां अगदी हजार हिश्श्यान बरोबर हा. बळी म्हंजे येक नंबरचो लोळगो..... बाता मोट्यो मोट्यो सांगॉन आयकणाराक अगदी गार करीत. पन तांबडो पैसो सोडताना दुकू

धा येळा इचार करनार. ह्येच्ये येवार धड्या गांडीन पुरे व्हनार नाय. माका अनबव हा..... नवेदरात ह्येचो अडीज हज्जार हात गडगो आमी घालून दिलाव. बोली करताना ठरलेलो दर येवार तोडताना कापलान..... ह्या काम माज्या आंगाभायर् ग्येला..... दोनव बायकांचे डागिने नी मंगळसुता इकून तुमचे पैशे भागवूची पाळी माज्यार इली अशी रड लावलान, आज आदी मी फुडे करतय ते पैशे घेवा..... दिवाळी झाल्यार काटयो नी खुटवळाचे हिशोब इलो मग्ये बाकीची रक्कम बगुया. आमचा हातार प्वॉट.अशी रडखड करून आमका फसवलान. नाविलाजान तेना दिलान ते पैशे घेवन् गप बसोची पाता इली..... खरा सांगोचा तर आमची आंग मजूरी दुकू पुरी भागली नाय..... नुकसान चौघात्री वाटून घ्येवन आमी गप बसलाव.....”

भाऊनी आठवडाभराने बळीला बोलावून घेतले. थेट नाही म्हणून सांगून त्याचे शत्रूत्व पत्करणे परवडणारे नव्हते. भाऊनी नाही न म्हणता त्याला आशेवर ठेवायचे असा डाव खेळला. “ आता बानखिंडी पावत ह्यो पयलो टप्पो हा ह्यो काय माका भारी नाय. तेची लय कमी जोडणी मी केलेली हा. अगदी पंदरा दिवसापूर्वी मजूरीचो हिसाब करूच्या वक्ती माका पैशाची जरूरी हुती म्हंताना खुटवळ नी शिलीपाट देवच्या बोलीवर मी बाबुराव देसायाकडना रक्कम उकललेली हा. आता ते काय सवता खुटवळाचो धंदो करीत नाय पन ते आपल्या वगीतल्या कोनाक तरी फुडे करनार..... तुमची माजी काय लय सवगव नाय म्हंताना त्ये टायमाक तुमका शिलीपाट घालुची बोली करून पैशे उकलूची बात माका काय सुचली नाय.....तुमी गैरसमज करून घेव नुको.....” त्याने मग़ सिलीपाटाचा नी खुटवळाचा काय दर ठरला ह्याची

चौकशी केली. भाऊनी बळीच्या दरादामाची चौकशी केलेली होती. त्याच्या दरापेक्षा अधिक पण अवास्तव वाटणार नाही इतपत वाढीव दर सांगितला.

भाऊंची मात्रा वर्मी लागू पडली होती. निदान तोंडावर तरी बळी नाराजी दाखवू शकत नव्हता. धंद्यातल्या अंतर्गत वैरामुळे बाबुराव देसायाना भेटून सांगितल्या गोष्टीची खातरजमाही बळी करू शकला नसता. भाऊनी त्याला हलकेसे मधाचे बोट लावले. "आता तू अगदी मोक्याच्या येळी मदतीचो हात फुडे करतहस त्येची जाण मी ठ्येवीन.... त्येंचो हिसाब भागवून लय थोडो शिलीपाट मी तुमका घालीन...." बळी मनोमन पुरता खट्टू झालेला होता. पण भाऊ हा काही धंद्यात मुरलेला बेरकी माणूस नाही. तो साधा सरळ भटगडी आहे अशी बळीची धारणा होती. त्यामुळे भाऊबद्दल काही किल्मिष न ठेवता बळी उठून निघून गेला. त्यानंतर अधून मधून कामाच्या ठिकाणी येवून बळी फेरी मारून जायचा.

तो काम करणाऱ्या गडी पैऱ्यांना चढ्या आवाजात खडसावायचा,"अरे अक्करमाशानु, रेंगत न ऱ्हवता सोयन् कामा करा..... तुमी ग़ांड आळशीपान क्येलास तर बिचाऱ्या भटाक रखेत बसवशा..... त्येका जगवलास तर तुमचो रोज शाबूत ऱ्ह्वात ह्या समजून काम करा." भाऊ हसून म्हणायचे , "बळीदा, आता हत त्येतू तरी लबाडी करणारो कोण नाय..... त्येंका कामाची अगत हा....." त्यावर बळी म्हणायचा, "तुमी झालास तरी भटगडी, मी अनभव खाल्लेलो मानूस हय..... ह्या कुळवाड्याचो भरवसो बर्मद्येव देव शकणार नाय. ह्या भडव्यांची शिक (शिंक) दुकु खोटी आसता. कुळवाडी म्हंज्ये

त्येच्या गांडीत छपन्न मोडी..... ही जात म्हंज्ये खाल्लेल्या जाग्यार हगणार नी अन्न खाल्ला त्या इस्टारीक (पत्रावळीला) ढुंगण फुसणार..... ह्येंच्या मानेर पाय हा तंवसर चीप ऱ्हवणार..... त्येतू ढिलाय क्येलास तर कदी तुका खड्ड्यात घालती त्येचो प्त्याबी लागणार नाय....."

माघी पौर्णिमा उलटून दोन दिवस झाले नी पहिल्या टप्प्याचं काम पुरतावलं. अंदाजा बाहेर आठदहा दिवस जादा लागले होते. तोडलेला खुटवळ नी कवळाचे भारे यांची निर्गत लावायची होती. खुटवळाचे ४७ डेपो मारलेले होते. सिलिपाट वासे - सरीच्या भरीचे म्हणजे साधारण मांडी एवढ्या जाडीचे नग , त्याचे पाच थप नी दोन हाता पासून ते चार हाती वेढ असलेल्या अनगळ गंडोऱ्यांचे तीन थप होते. कवळाचा उपयोग शेत जमिनींची भाजावळ करण्या परता आणखी काहीच होणारा नव्हता. तोडपाच्या मजूरीचा अंदाज करून पंचवीस भारे दोन रुपये किंवा अर्धामण भात या दराने द्यायला हरकत नाही असा बाबल्या नी धाकू यांनी दर केला. काम सुरू होते तिथे आजू बाजुला धवडाचं काटं , मोंड्यांची खरी आणि बाणे , येरम यांच्या खरी होत्या. (खरी म्हणजे खोलगट कातळी भागात ४/५आंगूळे ते वीतभर उंच मातीची भर घालून केलेले शेत मळे) कवळाच्या भाऱ्यांची निर्गत लावायची जबाबदारी भाऊनी धाकू नी बाबल्या यांच्यावर सोपवली.

चार दिवसानी रत्नागिरी गाठून त्यानी पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्याचे वर्दी दिली. साहेब त्यावेळी रजेवर होते. पण अव्वल कारकूनाने प्रोसिजर प्रमाणे विहीत नमुन्यात कम्प्लायन्स रिपोर्ट तयार करून त्यावर भाऊंच्या सह्या घेवून तो दाखल करून घेतला. प्रोसिजर

प्रमाणे केलेल्या कामाची पाहाणे करून ते कंत्राटात दिलेल्या अटीशर्थी प्रमाणे झाले आहे की नाही याची पडताळणी करून त्याचा फेव्हरेबल व्हेरिफिकेशन रिपोर्ट आल्यावर पहिला हप्ता रिलीज होणार होता. मार्च एंडिंगला महिनाभर अवधी होता आणि सचिवालयातून शानू काका खोत यांचाही दट्ट्या होता. तसेच साहेबाच्या पर्सेण्टेजची रक्कम त्यातून वळती करायची बोली असल्यामुळे अधिक विलंब न होता , पहिला हप्ता मिळणार होता.

भाऊ कम्प्लायन्स रिपोर्ट देवून आल्यावर दहा दिवसात वर्दी आली. साहेब समक्षच व्हेरिफिकेशनला आलेले होते. साताठ लोकांच्या टीम साठी काजूगराची उसळ आणि सोलीव बटाटा भाजी , वरण ,आमटी, भात, पुऱ्या, डावीकडे लोणचं , मिर्ची, आंबेडाळ आणि बासुंदी असा जेवणाचा शाही बेत केलेला होता. लोकाना आराम करण्यासाठी सावलीची जागा धरून मांडव घातलेला होता. टीम आदल्या रात्री वसतीला राजापूरला डाक बंगल्यात मुक्कामाला थांबलेली होती. ठरलेल्या सकाळी अगदी लौकर मोजमापं घ्यायची कामं सुरू झाली. भाऊंचे सात गडी मदतीला आलेले होते. कामाला सुरवात झाली तेंव्हा आख़णी करताना बनवलेली मापाच्या काठ्यांचे तुकडे भाऊनी साहेबाना दाखवले.

रस्त्याच्या रुंदीचे माप फूटभर सरसच आहे हे मोजून बघितल्यावर साहेबांची खात्री पटली होती. आलेल्या पैकी दोघेजण सोबत भाऊंचे चार गडी घेवून लांबी मोजायच्या कामाला लागले. दुसरी टीम घेवून स्वत: साहेब वीस पंचवीस कदम चालीच्या अंतरावर थांबून टेप टाकून रुंदी मापीत होते. अधून मधून गटारासाठी मारलेल्या चराची

रुंदी नी खोली मोजीन बघितली जात होती. मध्येच रस्त्याची शार बांधलेली होती ती पिकावाचे टोक मारून तिथला दगड चाळवून कितपत मजबूत आहे याचीही पारख केली जात होती. चार पाच ठिकाणी स्वत: खात्री करून घेतल्यावर साहेबानी उरलेले काम सोबतच्या लोकांवर सोपवून ते मांडवात आराम करायला गेले.

साडेबारा वाजताच जेवणं आलेली होती. पण सगळं काम पुरतावल्यावर जेवण असं साहेब म्हणाले. सगळी मोजमापं घेवून तपासणी पुरी होईतो दोन वाजले.संपूर्ण भागात कुठेच चालढकल , त्रुटी आढळली नाही. साहेब खुश होवून म्हणाले, “जिल्हाभर इतके प्रोजेक्ट सुरू आहेत पण या प्रोजेक्ट एतकं बिनखोट काम कुठेच बघायला मिळालं नाही. आता आठदहा दिवसात तुम्हाला मोकळ करू.” हातपाय धुवून तोंडावर पाण्याचे हाबके मारून मंडळी जेवायला बसली. मांडवाच्या तीन्ही बाजुना मोठी झाडं असल्यामुळे उन्हाचा कडाका जाणवत नव्हता. साहेब लोकांची जेवणं झाल्यावर झटपट आवरून मंडळी उठली. अव्वल कारकूनाने मला बाजुला घेवून वीस मार्चच्या दरम्याने पेमेंट घ्यायला या म्हणून सांगितलं.कामात काहीच खोट नसल्यामुळे भाऊना काही काटछाट न होता संपूर्ण रक्कम मिळणार होती. मात्र त्यावेळी साहेबांचा हप्ता आधी पुरा करायचा होता. तशी तजवीज करायची सुचना त्यानी भाऊना दिली. भाऊना सरकारी कामांचा काहीच अनुभव नव्हता. आपलं पेमेंट मिळालं की मग त्यातून साहेबांच्या हप्त्याचे पैसे देवून व्यवहार पुरा करायचा असं त्याना वाटलं होतं. पण सरकारी अधिकारी सर्वप्रथम स्वत:ची सुरक्षितता पहात असतात.

भाऊना हो नाही म्हणायची सवडच मिळाली नाही.

भाऊनी कंत्राट घेतलं त्या दरम्याने चिवारीतल्या दादा खोतांचे सचिवालयातले भाऊ शानुकाका गावी आले होते. त्यानी भाऊना भेटायला बोलावलं होतं. त्यावेळी त्यानी सरकारी कामाची पद्धत कशी काय असते त्याची कल्पना भाऊना दिली होती. मक्त्याप्रमाणे यच्चयावत सगळं काम पूर्ण होवून पुरी शहानिशा होईतो कंत्राटदाराला तांबडा पैसाही सरकार कडून सुटत नाही. भाऊंची आमदनी किती याची त्याना कल्पना होती. त्यानी कच खावू नये म्हणून कधी गरज पडली तर त्याला दोन चार हजाराची मदत करायला दादा खोताना सांगितलं होतं. भाऊना त्या गोष्टीची आठवण झाली. भाऊंची गरज तेवढीच होती. भाऊ दुसऱ्याच दिवशी दादा खोताना भेटायला गेले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मला जरा खाजगी विषय बोलायचा आहे असं भाऊनी सांगितल्यावर दादा खोत त्याना माडीवर घेवून गेले . संपूर्ण विषय ऐकून घेतल्यावर दादा खोत म्हणाले “ठीक ठीक , ह्या जगदुनियेचा काम करताहास तुमी. शानून आमच्या ह्या रस्त्यासाटी लय जिगजिग केल्यान पण कोण कंत्राटच घेवक् मागयना. तुमी जिद क्येलास म्हनान सगळ्यांची सोय होवची हा.... आमी तुमका मागे वडणार नाय.....” म्हणत दादा उठले.

जानव्यात अडकवलेल्या चावीने कपाट उघडून दादा खोतानी तांबड्या आलवणात गुंडाळलेली लुकटी बाहेर काढली. आत शंभराच्या नोटांची पुडकी लोकरीच्या धाग्याने बांधलेली होती. त्यानी चार बंडलं काढून भाऊंच्या पुढ्यात टाकून , “धागो सोडून अवकासान नोटी नीट मोजून घी ” असं सांगून त्यानी लुकटी पुन्हा बांधली नी

कपाटात ठेवून कुलुप घातलं. एवढी मोठी रक्कम भाऊनी हयातीत प्रथमच बघितली नी हातात घेतली होती. नोटा मोजताना त्यांचे हात थरथरत होते. दादा खोत केवढी मातब्बर असामी आहे याचं त्याना अजाप वाटलं. पैसे मोजून हात पिशवीत ठेवक्यावर भाऊ हात जोडीत म्हणाले, "माझा मझ्यावरच विश्वास बसत नाहिये.... इतक्या झतपट काम होईल अशी मी स्वप्नात सुद्धा कल्पना केली नव्हती." दादा फक्त हसले. नी म्हणाले, " आता काम व्हयत् ह्येची तुमका कल्पना नवती म्हनान येकटे इलास तां ठीक हा पन खेच्याफुडे मोटी रक्कम आसताना वांगडान दोन गडी घेवन् फिरा. रत्नागिरीक जाशा तवा कोनतरी जानतो मानूस वांगडान ऱ्हवाने. तुमच्या साळेत बर्वे मास्तर हत ना ? तेंका नी एक गडी घेवन जाया. देन्या घेन्याचो विषय मास्तरांका साक्ष ठेवन् पुरो करा. आता दुकू आमच्या धकटू सडेकराक तुमच्या वांगडान धाडतय...." माडीवरून खाली उतरल्यावर त्यानी धकटूला हाक मारली नी भाऊना पोह्यांसाठी दोन कुडू लाल दोडयचा भात काड नी तेंच्या वांगडा घरापावत जावन पोच करून ये. असं फर्मान सोडून दादा झोपाळ्यावर टेकले.

घरी गेल्यावर भाऊनी पिशवी कपाटात ठेवून कुलुप घातलं. त्या पंच क्रोशीतली काही मंडळी पैसेवाली होती हे भाऊ ऐकून होते. दादा खोतानी बसल्या बैठकीत इतकी मोठी रक्कम आपल्या शब्दा सरशी कसलाही बियादा न सांगता कशी काय दिली हे भाऊना कोडंच वाटलं. जेवणं झाल्यावर भांडी घासायला आलेल्या काशी बाणणीला बाबल्याला भेटायला ये असा निरोप सांगायला पाठवली. बाबल्या आला. त्याला सोबत घेवून गोठ्यात जाताना ते

म्हणाले, " घरात जोकमीची वस्तू हा..... आता मी सांगासर तू चोवीस तास जेवणा खाण्यासकट माझ्या घरीच ऱ्हवायचा..... " संध्याकाळी ते बर्वे मास्तराना भेटायला गेले, त्याना सादिलात काय विषय आहे तो सांगितल्यावर त्यानी रत्नागिरीला जायचा दिवस ठरवला. भाऊ घरी गेले तेव्हा बाबल्याचा मुलगा कुत्र्याला घेवून आलेला होता. बाबल्याने त्याला दिंडी दरवाजा शेजारच्या खिडकीच्या गजाला टांगलवला. भाऊंची मुलं निमा नी सुरेश कुत्र्याशी खेळायला लागली. बाबल्या राहिल्या मुळे गोठ्यातल्या गवतपाणी , दूध काढणं यातून भाऊना सुटणूक मिळाली. बाबल्या सकाळी दुधाचे रतीब पोचवायला जाई तेंव्हा आपल्या घराकडे फेरी मारून येई. एरवी दिवसाडी गोठ्यातलं काम, आगरातल्या माडांचं शिंपण करणं , पावसाळी बेगमीसाठी लाकडं फोडणं पाळंद झाडणं अशी काहीना काही कामं योजून योजून करीत राही.

भाऊ बर्वे मास्तर आणि धाकूला घेवून रत्नागिरीला रवाना झाले. भाऊना बघितल्यावर अव्वल कारकून साहेबाना भेटायला गेला. सायबानी त्याला भाऊना घेवून दामल्याच्या वाड्यात जावून आप्पा दामल्यांकडे व्यवहार पुरा करायला सांगितला. व्यवहार पुराकरून आल्यावर पहिल्या हप्त्याच्या रकमेची ऑर्डर मिळाली. ट्रेझरीत जावून रक्कम ताब्यात घेतल्यावर परटवण्यावर बर्वे मास्तरांच्या बहिणी कडे वसतीला राहिले रात्री बर्वे मास्तरांची विचार विनियम करून दादा महाजनांकडून हातउसनी घेतलेली रक्कम नी त्याबाहेर ५०० रुपये ठेवून उरलेले पैसे राजापुरला पोस्टात ठेवायचे ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळी लौकर घराबाहेर पडल्यामुळे दुपारी राजापूरच्या पोस्टात रक्कम ठेवून

झाल्यावर भाऊनी रात्री ट्रक भरायला उजेडाची सोय म्हणून त्याकाळी प्रसिद्ध असलेली चार सेलची विंचेस्टरची ब्याटरी आणि बत्ती विकत घेतली. भाऊ बर्वे मास्तरानी केलेल्या मदतीच्या बदल्यात पाच रुपये देत होते पण मास्तरानी ठाम नकार दिला.

धाकू आणि बाबल्याच्या भावाला सोबत घेवून दोन दिवसानी भाऊ चिवारीत दादा खोताना रक्कम द्यायला गेले. भाऊनी पैसे दिल्यावर ते मोजूनही न बघता दादानी उचलून कपाटात ठेवले. मग भाऊनी मान खाली घालीत म्हटलं , "तुम्ही माझ्या शब्दासरशी इतकी मोठी रक्कम तात्काळ काढून दिलीत. तुमचे उपकार मी हयातभर विसरणार नाही. माझं काम झालं . देवदयेने कधि कल्पनाही केली नव्हती मोठी रक्कम आज माझ्या कडे आहे. तुम्ही काहीना काही व्याज घ्या. मी आजपावत व्याजबट्ट्याने पैसे घेतले नाहीत त्यामूळे मला दरादामाचा काय अंदाज नाही. पण तुम्ही सांगाल तेवढं व्याज मी देईन." त्यावर दादा म्हणाले, " रक्कम मोटी हुती ही गोष्ट खरीच पन तुमी म्हयनो पुरो होवच्या आत येवार पुरो क्येलास..... माका व्याज घेवचा आसता तर तुमका रक्कम देताना अट घतली आस्ती.

तुमच्या कडसून कर्जखत लिवून घितला असता. पण तुमच्यार माजो इस्वास हा..... थोडक्यादिसापुरती तुमची नड हुती.काम झाल्यार तुमी लगेच एका मुठीन येवार भागवलास तांच माजा व्याज. ह्येच्या नंतरही गरजेक कदीपन माज्याकडे येवा.....माज्याच्यान होणारी मदत मी करीन...." खुटवळ आणि सिलीपाटासाठी इद्रूस कोळसेकर भाऊना भेटायला आला. तो मोठा पैसेवाला असला तरी जात्या अत्यंत हिमटा आणि गिऱ्हायका पुढे रडी लावून पडत्या दराने खरेदी करणारा

म्हणून प्रसिद्ध होता. त्याचे व्यवहार लोळगे आहेत हे भाऊ ओळखून होते. बसल्या बसल्या दहा रुपयाच्या दोन नोटा नाचवीत तो भाऊना म्हणाला, " तुमी रस्त्याचा कंट्राट घितलास ह्या काम ब्येस केलास. पन सरकारी काम म्हंज्ये जादा पैसा मिलणार नाय. म्हनून ह्या काम किती वर्सा कोन घेयाला तयार नाय. आता तुमाला काय ह्या कामांचा अनभव नाय म्हंताना तुमी जोकमदारी घितलीव. बरां लय थोडो खुटवळ आशे. तेच्यात भरयाभरी कोलसो पडेल आशे दांडगे सगीन नग म्हणशा तर लाय कमती हायत. नी तुमच्या गडयानी ढिगोळ्यो घतल्यो त्योबी लय न्हान्यो आशेत."

इतका वेळ गप्प बसून ऐकणारा बाबल्या एकदम चवताळून म्हणाला, "काय रे इद्रूसा, तू काय आमका येडझये समाजलं कायरे..... माजो खुटवळाचू धंदो नाय पन खुटवळ काडून ढिग़ मारुची कामा करून माज्ये क्यास पिकले. जितकी वर्सां तू कोळसो पाडतस तितकी वर्सा मी दुकू मजूरी केलेली हा. चार साला मागे सुंदर खोताच्या नवेदरात सतरा एकरातलो खुटवळ तूच घितलस ना? त्यो ढिगोळ्यो काय तुज्या बापसान घतलेल्या हुत्यो काय रे चोरा? भाऊंच्या कामार बाण्यांचा फैल हुता, धाकूचा फैल हुता. सगळे गडी खुटवळाच्या कामात व्हैवाटलेले हत. आमच्या ठपा जवळ टरक लावन् भरताड करून बग..... टरकाक जर भरवान कमी पडला ना तर तुज्या ढेंगाखालसून जायन् मी ..... " ओशाळं हसत आपला मुद्दा न सोडता इद्रूस म्हणाला, " ह्यो बतावन्यो तू माज्यासामनी केरू नको..... तुमानला मजूरी भेटली म्हानताना तुमी गडी लोक मालकाला खूस करन्यासाटी लाकडाच्या

टवन्या उडगळ टाकून ढीग मोटा करून ठेवनार मी आमच्या सारक्या गरीबान्ला मारून घालनार.

बोलना सोपा हाय कारन कोन झालो तरी परतेक ढिगोली जवल टरकाचा भरवन करून मापून घेनार नाय. तेच्यात मी कोलशेवाला. मी तितेच खुटवल जालून कोलसा पाडनार. त्ये जावने..... खारी माती समजून मी हाय त्या परस्तीतीत म्हाल घ्येतो. तुमी सस्कार म्हनून ह्ये ईस रुपाये ठ्येवा नी होयस्कार द्यावा. कोलसा पाडल्यावर किती उतारा पडतो त्येच्या माफक मी तुमानला दर देईन. पिराच्या उरसाच्या आदी तुमची ऱ्हवलेली रक्कम मी पुरी करीन, अल्ला कसम माज्या शब्दात खोट येनार नाय. " त्यावर भाऊनी बाबुराव देसायांशी आपलं जुजबी बोलणं झालेलं असून आपल्याला पुढच्या कामासाठी मोठी रक्कम लागणार असल्याने रोख रक्कम घेतल्याशिवाय व्यवहार होणार नाही असं खडसावलं. बराच वेळ घोशाचं मळ घालून भाऊ बधत नाही म्हटल्यावर. "मंग कायनायच म्हंतीव काय तुमी..... आजून इचार करा.... ह्या खुटवळाच्या धंद्यात आता काय अर्ताची बाजू ऱ्हवलेली नाय. आनी दुसरा म्हनशा तर आवंदा जग दुनियेत लय बागांची कामा सुरू हायेत..... इतक्या सगल्यान्ला थोडाच गिराईक भेटनार हाय..... तिकडे गडा पासून (विजयदुर्ग) देवगड कुनकेसूर पावत बागांची लय कामा चल्लेली आशेत.... तकडे दो दोन वर्सा खुटवळ पडून आशे. तेनला गिराईक बी भेटत नाय..... तुमचे कमीच तरी वीसावर पाच लोड आशेत येवडा म्हाल उकलन्याची शामत आसनारा इकडच्या भागात तरी कोन येपारी माला दिसत नाय.....

तुमी इचार करा जुम्मादिन झाल्यावर मी खेप करीन तवा काय तां नक्की सांगा....” अशी भीती दाखवून इद्रूस उठून गेला.

ठोक व्यापाऱ्यांची व्यवहार करायची नीती आणि बोलण्याची ठराविक पद्धत होती. एकतर धंद्यात मुरलेले व्यापारी सर्व सामान्याला बेअक्कल समजून त्याच्या मालाची जमेल तेवढी केंड करून त्याला बुचकळ्यात पाडीत. माल कमी असेल तर तीन चार लोड साठी इतक्या लांब कोण येणार असं म्हणायचं..... मोठ्या प्रमाणात माल असेल तर हल्ली मालाला उठाव नाही..... असं उलटं तर्कट मांडायचं. मालक सहसा प्रत्यक्ष खेप घालून शहानिशा करीत नसे. कामदार जे सांगतील ते ही फार विश्वासाचं थोडच होतं? ह्याचा पुरेपूर फायदा व्यापारी घेत. इद्रूसने लोचटपणा करीत तीन चार खेटे मारले. पण एकदाही चुकूनसुद्धा त्याने दर मात्र फोडला नव्हता. कोळसा पडल्यावर उतारा किती पडतो त्यावर नंतर दर ठरवायचा हीच भाषा त्याने कायम ठेवलेली होती. पाऊस सुरू झाला आणि पंधरवडा भराने त्या गावाने नव्याने या धंद्यात पडलेले भुरटे व्यापारी भाऊंकडे खेटे मारायला लागले. अर्थात सगळ्यांनी थोड्याफार फरकाने अगदी पडत्या दराने आणि दिवाळी नंतर हिशोब करायच्या बोलीवर मागणी केलेली होती. त्या दरम्याने भाऊ बाबुराव देसायाना भेटले. माल किती काय याची चौकशी केल्यावर ते म्हणाले की, “इथला एकही व्यापारी रोखीने व्यवहार करणार नाही आणि वाजवी दरही देणार नाही. मी तुम्हाला कोल्हापूर , सांगली , साताऱ्या कडच्या काही व्यापाऱ्यांची माहिती देतो. तुम्ही समक्ष खेप करून भेटून या. तुम्हाला योग्य ट्रकवाले तेच गाठून देतील. तुमचा माल उचलायला सोपा आहे, जायला सोईचा रस्ता आहे. . फक्त भरताड

तुम्हाला करून द्यावी लागेल पण तुमचे बांधलेले गडी आहेत.त्यामूळे काय वांधा नाय..... ”

भाऊनी घरी आल्यावर धाकू,बाबल्या यांना बोलावून विचारलं. त्याना खुटवळ भरायच्या कामाची माहिती होती. त्यांची स्वत:ची फैलं होती. गडी मिळण्याचा सवालच नव्हता. शेतीचा हंगाम असल्यामुळे लोड भरायचं काम संध्याकाळ नंतर केलं जायचं. भाऊंची स्वत:ची बत्ती असल्यामुळे तोही प्रश्न नव्हता. मग भाऊ कोल्हापूर, सांगली, साताऱ्यापर्यंत जावून वखारवाल्याना भेटून आले. साताऱ्यातला बाबूराव लोणारी माळ धारी वारकरी भाऊना विश्वासार्ह वाटला.कोकणातून आलेला व्यापारी नी त्यात भटगडी म्हटल्यावर बाबूराव लोणाऱ्याने टाळी मारली. दीड हजार रुपये इसार घेवून ट्रक ठरवून दिवस मुक्रर करूनच भाऊ परत आले. ठरलेल्या दिवशी दुपारीच ट्रकवाला शामराव यड्रावकर उज्जू येरमवाडीत आला. तो त्या भागात पूर्वी येवून गेलेला होता. भाऊनी ड्रायव्हर नी त्याच्या दोन सोबत्याना जेवायला घातलं. गड्याना वर्दी गेली नी संध्याकाळी वेळेवर जोतं सोडून रात्रीची भाकरी चटणीची शिदोरी आणि उबवणासाठी घोंगडी घेवून पस्तीस गडी आलेले होते. पहिलीच वेळ असल्यामुळे भाऊनी घरच्या देवाला नारळ ठेवला. गावदेव आणि वेशीवरचं देण भागवायला दोन नारळ सोबत घेतले आणि ड्रायव्हरसकट आपला चौघांचा डबा घेवून भाऊही ट्रक भरणारांसोबत सड्यावर जायला निघाले.

नशिबाने पावसाचं धुंदरूक नव्हतं. दस्तुरी नाक्यावरून ट्रक नव्याने बांधलेल्या रस्त्याला लागला. ड्रायव्हर माहितगार आणि वहिवाटलेला होता. “ ह्यो रस्ता आनी कवा झाला म्हनायचा? कोन

क्वाण्ट्रॅक्टर हाय म्हने? लय भारी काम काम केल्यालं हाय की. " हे ऐकल्यावर भाऊनी आपणच हे काम केल्याचं सांगितलं.आता ड्रायव्हर भलताच चपापला. " आरं तिच्या... तुमीबी राव भारी मानूस निगालाय की.... दुपारधरनं येवड्या गप्पा मारलो की , पत्त्याबी लागूदेला न्हायकी तुमी क्वाण्ट्रॅक्टर हायसा ह्याचा. माला वाटलं काय की तुमी जळाव इकणारे येजण्ट हायसा.... तुमी मोटी असामी निगाला की राव." थोड्याच वेळात ट्रक खुटवळाच्या डेपोंजवळ पोचला. पाऊस पडून रस्त्यावर टाकलेली भर थोडी ओलसर असल्यामुळे ट्रकची चाकोरी स्पष्ट उमटलेली सिसत होती. ट्रक वळवून घेतल्यावर गडी झपाझप कामाला लागले. पाऊण हौदा भरून झाला तेंव्हा कामगार घामाने न्हाऊन निघालेले होते. नेहेमीच्या शिरस्त्या प्रमाणे जरा विसावा इस्वाटा घेवून भाकरी खाल्ल्यावर काम पुरं करायचं म्हणून गडी थांबले. डाव्या अंगाला स्वच्छ पाण्याने भरून वहाणाऱ्या खणीतून दोन कळशा भरून आणल्या. व्हावटीत हातपाय धुवून घोंगडी अंथरून सगळे जेवायला बसले.

जेवण उरकल्यावर तासाभरात ट्रक लोड करून झाला. थपात अजून लाकडं शिल्लक होती. " तेच्यो मारी मी इद्रूसाच्या ....." सणसणीत शिवी हासडीत बाबल्या पुढे म्हणाला, " खुटवळाच्ये डेपो ल्हान हत म्हणून रड करीत हुतो भडवो... आता भेटॉने माका.... तेका बरोबर सुनावतय..... सगळे डेपो भरल्यार मुदलात आजून दोन तीन लोड वाडतीच..... लय हरामी जात..... पंचवीशेक लोड होती असां खोटा बोलोन भाऊंक मथवूक बगी हुतो..... " भाऊंसकट सगळेच हसले. शामराव म्हणाला, "आनकी चार रोजानी दोन टरक घ्यून यायाचं

काय..... थोडी जमात वाडवून देशिला काय लोड करून?" कामगारानी होकार भरला आणि येत्या मंगळवारी आपण दुसऱ्या टरकवाल्याला डायरेक्ट जाग्याला थांबवून तुमास्नी न्ह्यायला गावात येतो. असं सांगून उदबत्ती लावून शामरावाने ट्रकाचा स्टार्टर मारला. गड्याना अटकळ नव्हती . भाऊनी लोड भरायच्या दराची चौकशी करून त्यावर पाच रुपये जादा रक्कम धाकूच्या हवाली केली. "आज भवानी हा म्हणून पाच रुपये जादा दिलेहत. पन फुडच्या पावटाक येवडे देणार नाय. पन मजूरी ज्या त्या येळची ज्या त्या येळी मिळात . माला ह्यो येवार लोळत ठेवायचे नाय. आनि येक कोन इलो नी म्हाल उकललान ह्येची बोलवा फोडू नुको नी मी सवता येवार क्येलो ह्यातर अजिबात फोडू नुको..... कोणतरी राजापूरचो एजंट असा सांगायचा." मग पाण्याच्या कळशा नी तांब्ये पुन्हाच्या खेपेला लागणार म्हणून तिथेच एका डेपोत ठेवून माणसं मधल्या वाडीच्या घाटीने जायला निघाले. भाऊनी रिस्टवॉच बघितलं .... फक्त नऊ वाजले होते. काम लौकर उरकलं होतं .

शामराव दुसऱ्या ट्रीपच्या वेळी पन्नास पोती कांदा घेवून आला. दर खूप कमी होता भरताड करणाऱ्या फैलातल्या गड्यानी हातोहात सगळी पोती संपवली. त्यानंतर दर तीन चार दिवसाआड दोन दोन लोड भरायचं काम शिस्तीत सुरू होतं. पुढचा सीझन भर कामाचा असाच धुमेपलास सुरू रहायचा होता. म्हणून कामगाराना अधून मधून देता यावं याबेताने पाच सहा काथोटल्या लोणचं घालून ठेवायची वर्दी भाऊनी दिली. येसू मिराशाचा लोणच्याचा आंबा घडानी ओथंबलेला होता. त्याचे तीन फाटी आंबे आणून पैरी करून भाऊंच्या मागारणीने लोणच्याची बेगमी करून ठेवली. तसेच दोन मोठ्या मातीच्या

घड्यांमध्ये खारातले आंबे घातले. दहा लोड घातल्यावर पुढच्या ट्रीपला बाबूरावाने दहा लोडचा हिशोब शामरावा बरोबर धाडून दिला. भाऊनी लोणाऱ्यासाठी भेट म्हणून बरणीभर लोणचं आणि खारातले आंबे धाडून दिले.

भाऊंचं काम सुरू असताना त्याना शह देण्यासाठी भंडारी नी इद्रूस यानी गड्याना जादा दराची लालूच दाखवून अडचण करायचे शिकस्तीचे प्रयत्न केके. पण किरकोळ अपवाद वगळता गडी फुटले नाहीत. जे थोडेफार मध्येच दपली मारीत त्यानी भंडाऱ्याकडून उचल घेतलेली असे त्यामूळे घाटे भाऊंकडे वर्दी असली तरी बळी भंडाऱ्याचा निरोप आल्यावर रोखीचं काम टाकून ते कमी मजूरीवर नाईलाजाने जात . इद्रूसकडे जाणाऱ्यांची मागची मजूरी इद्रूसकडून यायची असे. त्याच्याकडे नाही गेलं तर मागचा हिशोब मिळणार नाही असं तो धमकावीत असे. त्यामूळे त्याच्याकडेही घाट्यांपेक्षा कमी पैशावर काम करावं लागत असूनही झक् मारीत जावच लागे.

जुलै अखेर भाऊंचे खुटवळाचे डेपो भरून झाले. शेवटच्या ट्रीपला बाबुराव लोणाऱ्याने शामरावसोबत भाऊंचा संपूर्ण हिशोब चुकता केला. डेपो सरस असल्यामुळे एकूण हिशोबात सहा लोड जादा झाले. कामगाराना भाऊंच्या कामावर बिनखोट मजूरी मिळाली म्हणून गदी खुश होते. झालेल्या कामात इमारती लाकडाचा सिलीपाट आणि सालाबाद प्रमाणे भाऊंकडच्या काठ्या बाबुराव देसायानी उचलल्या. भाऊंचा खुटवळ कोणी उचलला? कीती दर दिला ? पुरा हिशोब मिळाला की नाही ? कशाचाच थांगपत्ता बळी भंडाऱ्याला आणि इद्रूस कोळशेकराला जंग जंग पछाडूनही लागेना.या धंद्यात बरीच वर्ष

घटवलेल्या माणसाच्या ठिकाणी रांड कमाईचा मुबलक पैसा आला की त्यांना आपल्या कार्यकर्तृत्वाचा एवढा अहंगंड होतो की आजूबाजूच्या सरळ साध्या माणसाना ते मोजीतच नाहीत. एकतर लांड्या लबाड्या, खोटेपणा, फसवणूक, पिळवणूक केल्याशिवाय धंद्यात वर यायला होत नाही अशी त्यांची पक्की धारणा झालेली असते.

सचोटीने, प्रामाणिक्पणे वागणाऱ्या माणसाना आणि सामधाम परिस्थितीत असलेल्याना ते कर्तृत्वशून्य आणि मूर्ख समजतात. गोरगरीबाना तर आपल्यासारख्यानी पायाखाली घालण्या साठीच देवाने जन्म दिला आहे एवढा त्याना माज असतो. सामान्य लोक गबरगंड पैसेवाल्यांच्या खिजगणतीतही नसतात. भाऊ साधे , जेमतेम चार यत्ता शिकलेले,भटांचा पिढीजात भिक्षुकीचा धंदा , पण भाऊकडे त्यातलेही कसबनव्हते. मात्र मळे जमीन भरपूर असल्यामुळे खंडाचे भात यायचे. मधली रास (धान्य/शेती उत्पन्न) पुरेशी असली तरी घाट्यांचं घराणं पैसेवाल्यात गणलं जात नसे. त्यानी जे रस्त्याचं कंत्राट घेतलं तेही फारसा फायदा होणारं मुळीच नव्हतं कारण आठ दहा वर्षात राजापूर पासून एतढे मोठे कॉन्ट्रॅक्टर असूनही एकही माईचा लाल ते काम घ्यायचं धाडस करू धजावला नाही याचा अर्थ त्यात मिळकत होणारी नव्हती असा एक सार्वत्रिक समज पसरलेला होता. त्यामूळे भाऊ अक्कल हुषारीने चार पैसे मिळवतील , त्यांच्याकडेही हुषारी, कर्तबगारी आहे यावरच बळी आणि इद्रूस यांचा विश्वास नव्हता. भाऊ कोणाच्या तरी कच्छपी लागून हे धंदे करतो आहे आणि यात त्याला मोठी खोट आज ना उद्या बसणार हेच त्यानी पक्कं गृहीत धरलेलं होतं. जर अंदरकी बात त्याना कळली असती तर त्यानी येन केन प्रकारेण

भाऊना त्राही भगवान म्हणायला लावलं असतं एवढी त्यांची वट आणि ताकदही होती.

रस्त्याचा बानघाटीतला टप्पा भराव घाऊन लेव्हल करायचा असल्यामुळे दिवाळी पूर्वी भरावासाठी वळीवे (एक ते दीड हात लांब- रुंद नी जाड दगड) आणि तोडे (लांबट आकाराचे जडशीळ दगड) यांची अगोदर जम करायला हवी असं बाबल्या नी धाकू यांच मत पडलं. ते भाऊनाही पटलं. काम मुदतीत पुरं करायचं बंधन होतं. सुरुवातीच्या टप्प्यात फक्त कडेला सिंगल दगड मांडायचा होता. पण बान घाटी पर्यंत चा भाग सखलवटीचा असल्याने भर घालून उठवायचा होता. एकाच वेळी सुरुंग घालून दगडाची जम करायची नी भर घालून लेव्हल करायची ही दोन्ही कामं करणं सध्याच्या कामगारांची संख्या पहाता आहाराबाहेर होतं. जादा कामगार जमवून एवढ्यांवर कंट्रोल ठेवणंही जिकीरीचं होतं. म्हणून सध्या वहिवाटलेले कामदार आहेत त्यातच काम भागवून घ्यायच्या दृष्टिने दोन महिने पाऊसकाळात धोंडे फोडायच काम सुरू झालं.

आता पाऊस असला तरी काढता ओढता असल्यामूळे एकमार्गी काम सुरू होतं. डाव्या अंगाला दरडीच्या भाग़ात मोठाल्या धोंडी भोवतालची माती खणून सुट्या करून गरजे प्रमाणे सुरूंग घालून नाहीतर छिन्नी घणाने फोडून वळीवं नी कमजास्त लांबीची तोडं भरून ती शिस्तीत रचायचं काम सुरू होतं. धडाधडा सुरुंग उडत होते. निम्मे मकण झाल्यावर गुडेकराच्या गोठणी पासून तीस चाळीश वाव लांब रुंद भागात कांदळाची राई होती. त्यात गोडे कांदळ, सारिवले, ओवळदोड्या (बकुळी)आणि नाटक नारीच्या मोठमोठ्या झाडांची

गचवड होती. राईच्या कडेला दोन दोन पुरुष उंच अनगळ धोंडी होत्या. राईत डुकराची बसल असायची. गड्यानी सोबत आलेल्या कुत्र्यानी घुशी केली असती म्हणून धोंडीना सुरूंग घालून होईतो त्याना सुरक्षित अंतरावर झाळीत बांधून ठेवलेलं होतं. सुरुंगाना बत्ती दिल्यावर खेपेने पाच सहा बारांचा धडाका झाला नी कांदळाच्या गचवणात बसलेली डुकरं उठून बाहेर पडली.

सुरुंग फुटल्यावर डुकर उठणार याचा अंदाज होता. गडी दांडे कुऱ्हाडी घेवून तयारीतच होते. सगळे सुरुंग झाल्यावर कुत्र्याना मोकळे केलेले होते. दहा बारा डुकरांच्या दोन जांगळी उठल्यावर कुत्रे भिडले. दहा पंधरा मिनीटं कुत्र्यांचं भुंकणं नी गड्यांचे आवाज यांचा कालवा सुरू होता. दोन ओझ्याचे तीन डुकर आणि पाच पिली सपाट्याला गावली होती. कुत्रे अजूनही मावळत बाजूला घुशी करीत भुंकत होते . थोड्या वेळाने दोन एकांडे डुकर बाहेर आले. जनावरं दांडगी , कुत्र्याना आटोपणारी नव्हती. पण तीन वाडीतले मिळून पंचवीसेक कुत्रे असल्यामुळे त्याना पळ काढता येत नव्हता. वाटेत आलेल्या लहान सहान झाळीत घुसून त्यांचा बचवाचा प्रयत्न सुरू होता. गडी जवळ गेल्यावर कुत्र्याना जोर आला . कुत्रे झाळीत घुसल्यावर एका डुकराला नाईलाजाने बाहेर पडावे लागले . आता ते गड्यांच्या वेढ्यातच गावले . दांडे कुऱ्हाडी घेवून गडी तूटून पडले. त्या गडबडीत दांड्याचा अवघाती फटका बसून एक कुत्रा कमरेतूनच मोडला. दुसरा डुकर मोहरा फिरवून पुन्हा राईच्या गचवणात रिगला. त्याच्या पाठोपाठ कुत्रेही रिगले. थोडसं आत गेल्यावर घोट्याच्या वेली , तोरणी याची गचवड होती त्यातून कुत्र्याना पुढे जाता येईना. तासभर रेंगाळून कुत्रे

परत आले. शिकार बरीच मिळाली होती. कमरेत मोडलेला कुत्रा वेदनानी तळमळत भीषण केकाटत होता. त्याला अती तळमळत ठेवण्यापेक्षा मारून टाकायचा सल्ला जाणत्यानी दिला.

सव्वा महिन्यात लेव्हल उठवायला पुरेशी वळीवं काढून झाली होती. भर टाकायला लहान मोठ्या साईझचा बोल्डर प्रतवारी प्रमाणे थप मारून डाळून झाला. कामाला प्रत्यक्ष सुरवात केल्यावर भर घालण्यासाठी दरडी खणल्या की पोटात लहान मोठे दगड धोंडी मिळणार होत्या. पुरेसं मटेरियल जमलं याची खात्री झाल्यावर काम बंद करण्यात आलं. त्याच दरम्याने बानघाटीतून रस्ता गावदरीत उतरायचा होता तिथे कुंभारांपैकी बारा एकर मळे जमीन , त्याला कुंभाराच भाटलं म्हणत , ते जठाराकडे गहाण होतं. येरमांकडे तिर्दलीने (तीन चतुर्थांशा उत्पन्न कसणाराला आणि एकचतुर्थांश मूळ मालकाला) कसायला दिलेले होते. गेली तीन चार वर्ष बळीची नी त्यांची सवगव होती. त्या संबंधातून त्यानी ते बळीला विकलं. निर्धारित रस्त्यासाठी त्यातली काही जमिन जायची होती. याचा बकवा करून बळीने बेताबातात व्यवहार मिटवला. ते खरेदीखत झालं आणि बळीने कोर्टात केस घालून रस्त्याचा कामाला मनाईची ऑर्डर मिळवली.

त्याचे नेवऱ्यातले पाहुणे सुदाम परकार त्यावेळी जिल्हा बोर्डाचे मेंबर होते . त्याना मध्यस्त घालून बळीने नियोजीत रस्ता बान घाटीतून गावदरीत उतरण्या ऐवजी तीन चार फर्लांग पुढे नेवून येरम वाडी जवळच्या घाटीतून भाऊ घाट्यांच्या ठिकाणाजवळून मुळवसा कडच्या व्हाळाकडे न्यायचा प्रस्ताव दिला. यामुळे येरम, मुळम आणि गुरववाडकरांची सोय होईल. येरमाच्या घाटीला घसारीही कमी

असल्यामुळे फार खर्च न होता काम होणार आहे अशीही मल्लीनाथी केली. मुंबई पर्यंत खेप घालून शानूकाका देसायाना भेटून बळीने हा प्रस्ताव त्यांच्याही गळी उतरवला . वरून फेरदुरुस्तीचे आदेश आल्यावर अगदी युद्ध पातळीवर सर्वे करून ताबडतोब रिपोर्टिंग करण्यात आलं.

महिनाभरात दुरुस्त प्रस्ताव मंजूर होवून आला. यादुरुस्ती मुळे मूळ सहा मैल तीन फर्लांग रस्ता सात मैल चार फर्लांग झाला. ही बातमी फुटल्यावर बळीची मखलाशी कोणाच्या लक्षातच आली नाही . उलट येरम, गुरव, मुळम वाडकराना आपली सोय होणार म्हणून भलताच आनंद झाला. भाऊही आपली सोय झाली म्हणून सुखावलेले होते. बानघाटी संपल्यानंतर गावदरीतलं उतरण ही खाईच होती. तिथलं काम करताना सडावळी वरून ट्रक लावून भर नी दगड वाहतूक करावी लागणार होती तो अव्वाच्या सव्वा खर्च वाचला असता. कारण येरमाच्या घाटीत घसारी अगदी सामसुमार असल्यामुळे पाचसहा टोणे मारून सिंगल दगडाचं बांधकाम करून भागणारं होतं. बानघाटीवरून पुढे राईच्या बाजूने न्यायच्या रस्त्याला मोठमोठे कांदळ,सारिवले, फणसुले नी मोठमोठे आवळ दोडीचे वृक्ष होते, तिथे मजबूत सिलीपाट गावणार होता.

लक्ष्मी पूजनापूर्वी भाऊनी गाडांचं पूर्ण बील भागवलं. दगडाचं फ़ोडकाम करतानाची मजूरी भागवून गड्याना समज दिली की पुढचा टप्पा मोठ्या खर्चाचा आहे. शिमग्यापर्यंत निम्मे मजूरी मिळेल नी उरलेली चतुर्थीला . तोपर्यंत कोणी गडबड बियादे लावायचे नाहीत. गडी तयार झाले. बारस झाली आणि रस्त्याचं काम सुरू झालं. खणकाम मोठं असल्यामुळे नवीन पिकावं, लोखंडी धुमस , दगड

वहाण्या साठी लोखंडी साखळ्या नी घमेली नव्याने खरेदी करून आणावी लागली. भरीसाठी लागणारी सकेर नी पृष्टभागावर माती घालायची यासाठी वाहतूक करायला बायका माणसं वाढवली. धूम धडाक्यात काम सुरू झालं. हा टप्पा जोखमीचा होता. बांधकाम केल्यावर गाडणी खबरदार होणं गरजेचं होतं. काही ठिकाणी कमरभर तर कुठे कुठे छातीअगळ बांधकाम उठवायचं होतं. तिथे गाडणी कच्ची झाली असती तर पावसात सडावळीचं पाणी नी दरडींमधून उमळं फुटून पाण्याच्या व्हावट्या सुरू झाल्या की बांधकाम ढगळलं असतं. या गोष्टीची साहेबानाही पूर्ण कल्पना होती.

शेवटी पापाचा धनी वाल्या कोळी या न्यायाने रस्ता ढासळीन काही अपघात वगैरे झाला असता तर त्याचं खापर सायबांच्या डोक्यावर फुटून त्याना बडतर्फ़ होवून घरी बसायची वेळ आली असती. म्हणून दर आठवड्यात जिल्ह्यावरून कुणी ना कुणी अधिकारी येवून कामाची कसून तपासणी केली जायची. बाबल्या नी धाकू यानी ऐन व्हाळात पाण्याचा मारा होतो अशा ठिकाणी बांधकामं केलेली होती. सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी पावसाळी पाण्याच्या व्हावट्या लक्षात घेवून त्या ठिकाणी पावसाळी पाणी साठून भर घातलेली माती फुगून बांधकामाला तडे जाऊ नयेत म्हणून टीचभर , वीत भर रुंद आरपार मुशी सोडलेल्या होत्या. साधारण हातभर उंच काम उठलं की पहिल्या मुशींच्या मध्यभागात पुन्हा आरपार मुशी सोडून काम उटवीत असत. खालची बाजू मारणीची तिथे प्रत्येक थपाला कैची टाकलेली असे. पाण्याचा निचरा होण्यासाठी खालच्या बाजूला तिरके तासलेले दगड बसवून फटी सोडलेल्या होत्या.भर घातल्यावर ती लोखंडी धुमसाने

पक्की ठोकूम शाबूत करायच्या कामावर खास गडी नेमलेले होते. बांधकामासाठी काढलेली वळीवं एवढी जडशीळ होती की तिकाटणी नी लोखंडी साखळीची लवंगणं वापरून दोन दोन तीन तीन गड्याना वाहू न्यावी लागत.

अगदी सुरुवातीला समक्ष साहेब पहाणी करायला आले होते तेंव्हा त्यानी वळिवं पहारीने परतून पाहिल्यावर ते निर्धास्त झाले होते. फार उलाल (उंच) बांधकाम असेल तिथे हयगय न करता असला माल वापरायची सक्त ताकीद त्यानी दिलेली होती. या कामातले म्होरके बाबल्या, धाकू नी गाडणी करणारे गडी यांची पाठ थोपटून तारीफ केली होती. कंत्राटात ठरलेलं नव्हतं तरीही कधी काळी मुसळधार पावसात व्हावटीला जोरदार पाणी आलं की ते तुंबून बांधकामाला धोका होवूनये म्हणूव वरच्या अंगाला मारलेल्या गटातलं पाणी पलिकडच्या अंगाने वाहून जावं म्हणून दर पंधरावीस हात अंतरावर बांधकामाच्या तळी आरपार हातभर रुंद मोठी मूस राखून त्यावर रुंद पाथरी टाकून झाकण घातलेलं होतं. हे काम तर एवढं शाश्वत झालेलं होतं की कितीही मोठा पाण्याचा प्रवाह आला असतातरी रस्ता शाबूत राहिला असता.

काम निम्मे झालं तेव्हा साहेबांची व्हीजीट झाली . त्यावेळी गटारातलं पाणी खालच्या अंगाने निचरा करायची ही युक्ती त्याना भलतीच आवडली. कोकणातल्या जानपद निरक्षर माणसांचं हे तांत्रिक कसब तज्ज्ञ इंजिनीअरलाही मागे टाकणारं आहे असे प्रशंसोद्गार त्यानी भाऊंसमोर काढले. नवीन बदलेल्या एस्टिमेट प्रमाणे पुढच्या कामाचा टप्पा बदलेला होता. काम सुरू असताना बळी नेहेमीप्रमाणे नजर करायला आली तेंव्हा तो भाऊना म्हणाला कि, " ह्या फुडचा वाडीव

काम तुमका माज्यामुळां मिळालेला हा. तवां तां काम तुमी माका द्येवचा. मागच्या येळी लय थोडो शिलीपाट तुमी माका देनार म्हणून कबूल करून माका टांग मारलास..... आता ह्या फुडच्या भागात राईच्या कडणीन लय शिलीपाट मिळणारो हा. तेच्यार म्हणशा तर माजोच हक हा..... तो दुसऱ्या कोणाक देवक् मिळनार नाय..... मी आदीच सांगॉन ठेवतय..... मी बरो तर ढुंग़णाची लंगटी सोडून द्येयन् पन वाकड्यात जायत तेका नागडो करून गावभर धिंड काढीन....आमी भंडारी म्हंज्ये बायको द्येव पण बढाय सोडणार नाय.... ह्या येळेक माका ढाक लावन् तिसऱ्याक शिलीपाट नी खुटवळ दिलस तर तू पण हस नी मी पण हय..... तुजे डेपो जाग्याक नाय कुसवले तर मी नावाचो बळी भंडारी नाय....."

ह्या टप्प्यातल्या कामात अंदाजाच्या बाहेर दिवस गेले नी मजूरीही वाढली होती. दरड खणताना पडलेल्या मुळव्यात चार हाती, पाच हाती सिलीपाटात जाणारा गोलटा भरपूर गावला होता. गोलटा पंधरा लोड नी खुटवळ जेमतेम वीसेक डेपो झाले . पण खुटवळाच्या दुप्पट तिप्पट दर सिलीपाटाला मिळे. त्यामुळे बऱ्यापैकी मिळकत झाली असती. पण मध्येच बळीचा कोलदांडा आला. दोन दिवसानी भाऊ बळीला भेटायला गेले. आपण खुटवळ नी सिलीपाट घालायच्या बोलीवर आगावू उचल घेतलेली असल्यामुळे आपला नाइलाज आहे असं त्यानी सांगून टाकलं. त्यावर तुमका पैशेच हवे हुते तर माका भेटायचा ना? माका काय भिकारी समाजलास?मागच्या येळेक मी तुमका सांगलं हुतय की कवापन जरवर पडली तर माका सांगा....त्यावर भाऊ बोलले की तुम्ही दर पाडून सांगितलात..... माझा

हात दगडाखाली गावलेला आहे मला चार पैसे जादा मिळाले तर माझी आंग वाटावणी होईल.....यात काय चूक आहे? हे बोलणं सुरू असताना रखमा दुधाचा ग्लास घेवून आली."मी इषय आयकतय....भाऊंचा कायपण चुकलेला नाय.....जो चार पैशे जादा देनार तेच्याशीच कोनव झालो तरी यवार करनार ना? तुमका हा ह्यो धंदो आवरताना मुस्कील... गेल्या वर्साचो निम्मी म्हाल पडोन हा आनी भाऊंच्या शिलीपाटार तुमचो डोळो ख्येका?म्हंतय मी...तेंचा ते कायव करूनेत....." रखमाने बळीला सुनावले. बळी जग दुनियेसमोर दादागिरी दाखवीत असला तरी ह्या मागारणी समोर नांगी टाकीत असे.

बळीने मग पुढच्या कंत्राटात भागीदारी द्यायचा विषय काढला, त्यावर भाऊ बोलले की, प्रत्येकाची कामाची पद्धत वेगळी. हे जोखीमदारीचे काम आहे. तुमचा हट्टच असेल तर ते काम नव्याने वाढवलेले आहे. ते साहेबाना सांगून माझ्या ऐवजी तुम्हाला द्यायला सांगा. माझी काही हरकत नाही. जिल्हाबोर्डावर तुमचे पाहुणे आहेत..... त्याना मध्यस्त घालून या वाढीव कामाचा मक्ता तुम्हाला द्यायला सांगा. माझी काही तक्रार नाही. आजपर्यंत केलेल्या कामाचा हिशोब मला देवून पुढचे संपूर्ण काम तुम्हाला दिलेनी तरी माझी काही हरकत नाही. मी तसं लिहून द्यायला तयार आहे. पण मला कोणाशीही भागीदारीत हे काम जमणार नाही. पाहिजे तर चार दिवसानी आपण दोघानीही रत्नागिरीला जावून साहेबाना समक्षच भेटूया नी काय तो सोक्षमोक्ष लावूया. मला तुमच्याशी दुष्मनी ठेवायची नाही. मी काय तुमच्या तोंडातला घास काढून घेतलेला नाही. हे ऐकल्यावर बळी वरमला. भाऊनी सुचवल्याप्रमाणे वाढीव कामाचा मक्ता आपल्याला

मिळण्यासाठी रत्नगिरीला जावून साहेबाना भेटायचा तोडगा त्याला मान्य झाला.

बळीशी बोलणं झाल्याप्रमाणे भाऊ नी तो दोघेही रत्नागिरीला गेले. बळीचे पाहुणे अनायासे ऑफिसमध्ये आलेले होते. त्यानी साहेबाना भेटून वाढीव कामाचे स्वतंत्र टेंडर काढून ते काम बळीला द्यायचा पर्याय सांगितला. त्यावर साहेबानी त्यातली कायदेशीर अडचण मांडली. मूळ कामात वाढघट झाली तरी मक्तेदार बदलता येत नाही. तसेच या रस्त्याच्या कामात फेरबदल झाला , त्याप्रमाणे नवीन प्लॅन एस्टीमेट करून त्याला वरून मंजुरीही आली. तसा प्रोग्रेसिव्ह्स रिपोर्टी देवून झाला. आता त्यात बदल करणं शक्य नाही. साहेबानी स्पष्टच सांगून टाकल्या मूळे तो विषय तिथेच मिटला. त्यानंतर चार दिवसानी बळीचा निरोप आला म्हणून भाऊ पुन्हा त्याला भेटायला गेले. "हयसून फुडचा काम कसा काय व्हणार ता माका सांगा. तेतुर माका चार आणे भागी द्येवा. मी तुमच्या कामात बिघे घालणार नाय ..... उलट तुमका आगाव खर्चाक मागशा तेवडी उचल मी द्येयन..... पन माका भायरो करू नुको..." अशी गळ तो घालायला लागला. त्यावर यातल्या अडचणी स्पष्ट करून भाऊनी नाही म्हटल्यावर बळी भडकला.

" ह्या वाडीव काम तुका माज्यामुळे मिळालेला हा..... ह्येतू किती मिळकत हा त्येचो माका अंदाज हा..... माज्या पावण्यान म्हायती काडलेली हा....तुका फायदो होव साटना शानु काका देसायानी कंत्राटाचो खर्च वाडीव दाकवलानी हा..... खटपट मी क्येली नी फायदो तू एकल्यान खानार काय रे भटा..... मी तुका तसो सोडनार नाय तुजो शिलीपाट जाग्याक पेटवून द्येयन..... तू माका समाजलस काय?" बळी

हमरातुमरीवर आल्यावर रखमा बाहेर आली. बळी समोर उभी राहून ती म्हणाली, " ह्ये गरीब भटगडी गप आयकोन घेतत म्हणून कायव घमेंडी मारशा काय? पैशाची लय चरबी इली तुमका ? देवाच्या जा मिळालेला हा ह्या पुरत नाय म्हनून भाऊंच्या तोंडातलो घास काडून घेनार तुमी? आं येवडी चरबी वाडली तुमची?"

जरा दम खावून तिने परत तोंद सोडलं, " ही पापा खंय फेडशा.....दोन झील तुजे दारुडे निपाजले.....काय कामधंदो करीत नाय..... नुसती दारू खावन् नी रांडबाजी करून बापसाची कमाई उदाळतं हत तेंका आरेखता येयत नाय तुका. पैशासाटना तुज्या जावयान तुजा सोन्यासारक्या चेडू न नांदवता म्हायारी धाडलान..... तां आदी निस्तर..... नी कायरे? रस्त्याचा काम तू वाडवून दिलस भाऊंका ?तेंच्या फायद्यासाटी येवद्यो म्हारक्यो केलेस तू? जटाराकडसून मळ्यात जमिन घितलना तू तेतूस्सून रस्तो जावचो हा. रस्त्यासाटना तुजे धा वीस भांगे जातले म्हणून पावण्याक मदी घालून गुरव वाडीत्सून रस्तो न्हेवची तुजी मकलाशी जगदुनियेक नसली म्हायत तरी माका म्हायत हा ना..... ज्येका त्येका नाड नी जगदुनियेचे हपाप घी ..... येवडा कमवून जाताना मड्यार घालून किती न्हेशी तां बगीन ना मी..... आता ही हलकटपणा बास कर.... नेदान चांगल्याशी तरी चांगलो वाग रे हलकटा..... भाऊंच्या शिलीपाटाक तू हातच लाव.....नायतुका निजत्या हातरणावर जितो जाळलो तर माका सांग..... ही खोटेपणा आता बंद करा.... जा खालास ना ता पचात कसा ता आदी येवजा. तुमी जावा भाऊनु..... ह्यो तुमच्या केसाकव धको लाव शकणार नाय ... मे तेका असा करूक द्येनार नाय.... तुमी बिनघोर ऱ्हवा.... माज्या घोवान

पुन्नारुपी तुमका काय दमदाटी केलान तर माका सांगा.....” बळी खेटर मारल्या सारख़ा गप बसला.

जून अखेरीला झालेल्या कामाचा हप्ता मिळाला. लाकूड सामानाचेही बरे पैसे मिळाले म्हणून यावेळचा खर्च कसाबसा निभावला पण हातात काहीच उरलं नाही. काम पुरं होईतो सरकार कधीच बजेटच्या निम्मेपेक्षा जादा रक्कम सोडीत नाही. पुढचं दोन टप्प्यातलं काम झाल्यावर रस्ता पुरा झाली मग मात्र चांगला फायदा होणार होता. त्या आशेवर भाऊ खंबीर होते. दिवाळी झाली नी पुढच काम सुरू झालं , महिनाभरात रस्ता भाऊंच्या ठिकाणापर्यंत पोचला. बळी तात्पुरता गप्प बसलेला होता. रखमामुळे त्याला उघडपणे काही करणं शक्य नव्हतं. त्याला कोणीतरी चांगला गुरू भेटला. गुरव वाडीतून आलेला रस्ता पुढे व्हाळापर्यंत जावून मूळ प्लॅनमध्ये असलेल्या रस्त्याला मिळणार त्या फाड्यात झिलू सडेकराचे बारा दळे होते.

वाढीव प्लॅनप्रमाणे सर्व्हे झाला त्यावेळी इतर जमिन मालकां सोबत झिलूने नाहरकत पत्रावर सही केली होती. पण त्याला पुढे करून गवाणकर वकिलाना गाठून बळीने कोर्टात दरखास्त दिली. आपला अशिल अल्प भू धारक आहे, वादातीत जमिन वग़ाळता अन्य जमीन वरकस असून शेती योग्य नाही असा युक्तिवाद गवाणकरानी केल्यामुळे कोर्टाने तत्काळ स्टे ऑर्डर काढली नी अकस्मातपणे रस्त्याचे काम आहे त्या स्थितीत बंद ठेवायची लेखी नोटीस भाऊना बजावण्यात आली. काम बंद पडलेच पण आर्थिक नाड्या आवळल्यामुळे भाऊंच्या तोंडचं पाणी पळालं..... केस कधी निकाली निघेल ..... तो पर्यंत काहीच करता येणार नव्हतं. तरी साहेब चांगले

होते. त्यानी भाऊना गुलदस्त्यात न ठेवता या रस्त्याच्या कामाला आता भविष्य नसल्याचे स्पष्टच सांगून टाकले.

भाऊनी कामदाराना बोलावून या गोष्टीची स्पष्ट कल्पना दिली. जमलेला सिलीपाट विकून काय रक्कम येईल त्यातून भागेल तेवढी मजूरी मिळेल . उरलेली रक्कम जमेल तेव्हा जमेल तशी देईन. थोडा विलंब झाला तरी कोणाची एक पै ही बुडवणार नाही अशी खात्री दिली. दोन तीन महिने गेले. भाऊंची झोपच उडालेली होती. खूप विचार करून त्यानी मळ्यातली शेत जमीन विकायला काढली. बोलवा फुटल्यावर भाऊंना निकड आहे हे जगजाहीर असल्यामुळे येणारी गिऱ्हाईकं पडत्या भावाने बोली लावायचे. जोतो मातीमोल भावाने जमिन ती दुपिकी मळे जमीन बळकावयला टपला होता. ख&तर त्यावेळच्या बाजारभावाने व्यवहार झाला असता तर भाऊंची नड भागली असती. आता योग्य गिऱ्हाईक मिळेपर्य&त गप बसणं एवढंच त्यांच्या हातात होतं. गणेश चतुर्थीत गुरववाडीतला मिलिट्रीवाला सदा गुरव फंड घेवून गावी आला. सदा मिलिट्रीत सुभेदार होता. ब्रम्हदेशात युद्धावर असताना मांडीत गोळी लागली नी त्याची नोकरी संपली. पण त्याला फंड भरपूर मिळाला होता. तो पुढे दहा- बारा वर्ष पठाणी व्याजाने कर्ज देण्याचा धंदा करी. अशाच एका कर्जदाराला वसूलीसाठी गुंडांकरवी मारझोड करण्याच्या प्रकरणात ऋणको मेला. ते प्रकरण निस्तरण्यासाठी रहाती खोली विकून त्याने गाशा गुंडाळला नी तो गावी रहायला आलेला होता.

सदा गुरवाची फारशी शेती वाडी नव्हती म्हणून शेत जमिन घ्यायची असं ठरवूनच तो गावी आलेला होता. त्याला भाऊंची

मळे जमिन विकायची आहे ही वार्ता कळली. तो तत्काळ समक्ष भाऊना भेटला. त्याने भाऊंच्या अडचणीचा गैरफायदा न घेता वाजवी बोली केली. चार दिवसात रोख रक्कम मोजून त्याने व्यवहार पुरा केला. त्याच दिवशी बळीला ही बातमी लागल्यावर तो रातीच्या वेळी भाऊना भेटायला आला. सदाने दिली त्यापेक्षा जादा रक्कम द्यायची लालूच दाखवली. गावातल्या पैसेवाल्यांची ही ठरलेली नीती होती. एखाद्याची वस्तू वेकायची आहे हे कळल्यावर त्याला ती विकण्याची कितपत निकड आहे याची बित्तंबातमी काढून रुपयाची वस्तू दोन आण्यांपासून मागायला सुरुवात करायची. नाना भाकडं सांगून, त्या वस्तूत काहीना काही न्यून काढून त्याचा बुद्धिभेद करायचा शिकस्तीचा यत्न करायचा. चार खेपा घालून तो कितपत जेरीला आला आहे ? शेजाऱ्या पाजाऱ्याला वश करून घेवून कोण कोण गिऱ्हायकं येवून गेली, त्यानी काय आकडे फोडले या तसासावर रहायचं नी दरवेळी थोडी थोडी बोली वाढवायची. काहीजण तर मोठ्या जमिन व्यवहारांमध्येअशी माहिती काढण्यासाठी पैसे देऊन खबरे नेमीत.

काहीजण स्वत: मागणी करून आल्यावर आपल्या वगीतल्या दोन जणाना बनावट गिऱ्हाईकं बनवून पाठवीत . ते लोक अजून दर सांगत. बरीच गिऱ्हायक येवून कोणीच थराविक मर्यादेपलिकडे बोली करीत नाही म्हटल्यावर विकणारा जेरीला यायचा नी त्यातल्या त्यात चार पैसे देणाऱ्याशी व्यवहार करून मोकळा व्हायचा. जेंव्हा खूप मोठ्या व्यवहारात पैसे देवून खबरे सोडलेले असत ते मालकाचा नेत संपत आला याची खूण गाठ पटल्यावर आप्ल्या खरेदीदाराला सावध करीत . काही वेळा एखादा बोली करून व्यवहार

ठरवून सस्कार देवून गेला की हे खबऱ्ये आपल्या खरेदीदाराला सांगत. तो मग टाकोटाक रक्कम घेवून यायचा नी सस्कार देवून गेलेल्या माणसा पेक्षा थोडीशी जादा रक्कम देवून चोरावर मोर व्हायचा. निरक्षर... हातावर पोट असलेली, परिस्थितीने गांजलेली, किंवा हव्यासी- खऱ्या खोट्याची बूज नसेली , स्वार्थासाठी काही करायला तयार असलेल्या वृत्तीची माणसं जादा पैशासाठी दिलेला शब्द बिनदिक्कत मोडणं सोडा प्रसंगी इमान विकायला कचरत नसत. बळी सारखे हुमदांडगे सर्रास ही नीती वापरीत. काही वेळा याचाही पलिकडे जाऊन आंग जोरावर विकणाऱ्याला किंवा खरेदीदाराला , त्यातल्यात्यात जो नरम असेल त्याला धमवावून, दमदाटी करून झालीले व्यवहार मोडायला भाग पाडून व्यवहार आपल्या पदरात पाडून घेत.

भाऊंच्या व्यवहारात बळीने अशीच दोन बनावट गिऱ्हाइकं नी खबरे भाऊंच्या तल्लासावर सोडलेले होते. सदा मुंबईवाला, तिकडे वस्तू, नी त्यातल्या त्यात स्थावर मालमत्ता विक्रीची बातमी लागली तर लगेच वेळ न दवडता मोका साधण्याची पद्धत असायची. आजची वस्तू उद्याला मिळेलचा याची शाश्वती नसायची. तसेच शहर बाजारात प्रॉपर्टीच्या किमती सर्वसाधारण ठरलेल्या असतात. तिथे लोळत न रहाता झट की पट व्यवहार उरकून मोकळं व्हायचं ही नीती त्याच्या अंगी भिनलेली होती. तसेच जेव्हा त्याने चुलत्याकडे हा विषय काढला तेंव्हा चुलत्याने त्याला बजावून सांगितलेलं होतं की, जमीन मातब्बर आहे. भाऊ गरजू असले तरी मातीमोल भावाने कालत्रयी ही मोक्याची जमीन देणार नाहीत. गिऱ्हाईकं तर एकमेकाचा अंदाज घ्यायला अशी टपलेली आहेत की कोण कधी लग्गा

साधील पत्ताही लागणार नाही. तुला गावातच जमीन हवी आहे, पिकदाऊ नी आपल्या आवाक्यात हवी आहे. ही सोन्यासारखी सारखी संधी आहे. तू भाऊला भेटून अशी बोली कर की भाऊला नाही म्हणता येऊ नये. आतापर्यंत मागणारे केणीच या पलिकडे गेलेली नाहीत. जाशील तो बसल्या बैठकीत व्यावहार पुरा करूनच यायचं. सदा तासाभरातच रक्कम खिशात टाकून चुलत्याला नी मोठ्या भावाला सोबत घेवून भाऊंकडे गेला.

जुजबी बोलण झाल्यावर चुलत्याने आकडा सांगितला. आता पर्यंत एकानेही एवढा दर केलेला नव्हता. फार ताणून न धरता भाऊनी त्यांच्या बोली बाहेर अडीजशे रुपये जादा सांगितले नी तत्क्षणी व्यवहार ठरला. सदाने दोन हजार लगेच काढून दिले नी उरलेले दुसरे दिवशी राजापूरात जावून पोष्टातून काढून आणून देतो असं सांगितलं नी व्यवहार ठरला. खबरे तल्लासावरच होते. दुसरे दिवशी राजापुरातून आल्यावर सदा गुरवाने भाऊंचा व्यवहार पुरा केला. त्याने मग भावकीतल्या दोघाचौघाना ही बातमी दिली नी तासाभरात ती बळीच्या कानावर गेली. बळी लगेच नोटा बांधून सोबतीला चार झिलगे घेवून भाऊंच्या घरी आला. जुजबी बोलणं झाल्यावर नोटांची बंडलं समोर टाकून, " तुम्ही फक्त होय म्हणा.... सदाला व्याजासकट रक्कम परत देवा.... अगदीच आयकत नसलो तर तेका माज्यासामनी बोली लावूक सांगा....

तो बोली करीत तेच्या भायर हजार रुपये मोजून बसल्या बैठकीत मी कायव करून रोखीन येवार पुरो करीन.... तुमी ही रक्कम ठेवा." बळी बोलला. भाऊनी हात जोडून सांगितले, "तुम्ही

व्यावहार होण्यापूर्वी आले असतेत तर मी तुमच्याशी सौदा केला असता. मी बोलवा फोडून दोन महिने होवून गेले. किती लोक भेटून गेले. जो- तो पडत्या भावात सौदा करू पहात होता. पण सदा आला नी त्याने रितसर आकडा सांगितला..... आता कमी जास्त रकमेला व्यवहार होतात. पण त्याने जी रक्कम दिली ती आजच्या बाजार भावाप्रमाने रास्त आहे. मी हा व्यवहार करण्यापूर्वी बाबुराव देसाई , दादा खोत यांचाशी सल्ला मसलत केलेली आहे. सदाने व्यवहार पुरा केलेला आहे. माझा शब्द गेलेला आहे . मी दिला शब्द पैशासाठी मागे घेणार नाही. तुम्ही सदाच्या चौपट रक्कम दिलीत तरी आता काहीही उपयोग व्हायचा नाही. ठरलेला व्यवहार मी कालत्रयी मोडणार नाही..... जादा पैशाच्या लोभाने ठरलेला व्यवहार मोडायला मी शेण खाणारातला नाही..... तुम्ही पैसे उचला नी घरी जावा..... " बळी उमजला नी बंडलं उचलून निघून गेला. आलेल्या पैशातून गडी मजूरी आणि गाडांच्या दुकान बाकीसह सगळी देणी भागवून भाऊ ऋणातून मुक्त झाले.

मळा विकल्यावर मधली रास पूर्ण बंद झाली आणि मिलोच्या कण्या खावून दिवस काढायची विपन्नावस्था भाऊंवर आली.आता त्यांची हुन्नरच संपली होती. पुढची कायतरी तववीज करायची म्हणून सडावळीची बानघाटी जवळची जमिन बेणून तिथे त्यानी कलमं लावायची सुरुवात केली. ते आणि बायको डोकीवरून पाण्याचे डबे वाहून कलमांचं शिंपणं करीत. सुरेश सातवी पास झाल्यावर पुढच्या शिक्षणासाठी त्याला खारेपाटणला नेवून धाक्रस गुरुजींकडे देवपुजा करायच्या अटीवर शिक्षणासाठी ठेवला.

मळे जमीन विकल्यानंतर भाऊंचा अगदी पडता काळ सुरू झाला होता. कुठूनच आशेचा किरण दिसत नव्हता. रोहीणी सरत आल्या नी आडाळा पाऊस लागला. आता चार दिवस तरी कलमांच्या शिपण्यातून सुटका मिळणार म्हणून हायसं वाटल.गुरं सोडून आल्यावर भाऊ झोपाळ्यावर टेकले. सुपारी कातरून तोंडात टाकली आणि पानाला चुना लावीत असताना पाळंदीत कोणाचा तरी पायरव आला. इतक्या सकाळी कोण बरं आलं असेल? भाऊ विचारात पडले. तंबाखूची चिमूट घेऊन भाऊ पुढील दाराकडे येऊन बघायला लागले. बळीची बायको रखमा डोक्यावर जडशीळ मोटा घेतलेल्या दोन कुळवाडणी सोबत घेऊन येताना दिसली. काही हासभास नसताना तिला समोर बघून भाऊ चक्रावूनच गेले त्यांनी आपल्या बायकोला हाक मारली ती बाहेर आली. भाऊ तिला म्हणाले ही बळी भंडाऱ्याची दुसरी बायको रखमा. नवीन कापड नेसून सुपभर दागिने अंगावर वागवीत आलेली ती गोरीपान भंडारीण बघितल्यावर भाऊंची बायकोसुद्धा भांबावून गेली.

तिला ऐकून माहिती होती पण रखमा प्रत्यक्ष समोर उभी राहिल्यावर भाऊंची बायको तिच्या अंगावरचे दाग दागिने बघून थक्कच झाली. मग भानावर आल्यावर तिने आतून पाट आणून भिंतीच्या कडेला ठेवला आणि ती रखमाला म्हणाली," या पाटावर बसा. सकाळी सकाळी तुम्ही अगदी लक्ष्मीसारख्या माझ्या घरात आलात." रखमाच्या सोबत आलेल्या कुळवाडणीना बसायला पाटाच्या बाजूला कोपऱ्यातली डाळी पसरली. डोक्यावरच्या मोटा ओसरीवर ठेवून कुळवाडणी बसल्या. भटणीने केलेल्या स्वागतामुळे रखमा पुरती भारावून गेली. भाऊ

म्हणाले,"आज आमच्या गरीबाची कशी काय आठवण आली एवढं काय काम काढलंत?"

सोबत आलेल्या कुळवाडणीना ती म्हणाली," मी हाक मारी सर तुम्ही जरा बाजूक जावन थांबा, माका भाऊंशी नी तेंच्या बायकोशी खाजगी बात करू ची हा." त्यावर कुळ वाडणी उठून मागीलदारी गेल्या." मी ईलय म्हंज्ये तुमी मळ्यातली जमीन ईकलास....रस्त्याचा काम कोर्टान बंद पाडलान..... तुमचो खर्च मिळालो नाय..... त्ये पायी तुमच्यार ही आफत ईली..... डोळ्याला पदर लावीत रखमा पुढे म्हणाली,शेती ग्येली म्हनान डुकरी भरडून कणयो खावची आफत ईली तुमच्यावर.....हरी नळेकरान केस घतलान पन तेका माज्या घोवान आतसून हुसकावून घतलेलो हा..... मागे तुमच्ये सामनी तेका दनको दिलो हुतो तवा पासून माज्या सामनी तो तुमची वार्ता काडीत नाय पन तेनाच डूक धरून तुमका धडो शिकव साटी ही कारस्थानां चलवलेली हत.....

तेका कणयो घालून शेजाऱ्याचो कोंबड्यो झुजवूची वायट् खोड हा..... तुमच्ये बदली हेरी कोन आसतो तर खचोने.... म्हनून मी गप बसल आसतय.... तेच्या येवारात मी कदीच लक्ष घतलेलो नाय. पन बीन कारनी तुमच्या सारक्या देवमानसाक तरास देना बरोबर नाय. माजो बापूस तानू बारस्कर म्हंजे कर्दनकाळ हुतो.... पन भट माणूस समोर ईल्यावर रस्त्यात दुकू तो तेच्या पायार डोकां ठेवी....आमका तेची शिकवणी हुती काय भटाची जात ही गोडी.... आपून तेंच्या पाया पडॉन दुवो घ्येवचो, भटाच्या आगीधुगीत पडॉचा नाय नी तेच्ये विपळाक

कदीपन घेयाचे नाय..... नी ह्यो चा़ंडाळ तुमच्याशी दुस्मनी करून तुमच्या कुटंबाचे हपाप घ्येताहा.....

आता जग दुनियेत कितीजण सिलिपाट, खुटवळाचो धंदो करतंहत..... तुमच्या धंद्यामुळा ह्येच्या पोटार पाय ईलो अशातली पन गोष्ट नाय..... दोन कपाटांत चोंदून चोंदून नोटी भरलेल्यो हत..... पन ह्येची हाव कमी नाय होयत्.... तेना तुमच्या तोंडातलो घास काडून घितलान.... ह्येका बरां भोगनार नाय.... मी तुमच्या दोगवांच्या पाया पडतय...तेच्या पापात माका गोवू नुको नी आमका बायका पोरा़क शिव्यो शाप द्येव नुको. मी चुक मागतय.... ह्यो तांदुळाच्यो मोटी हत.....आनी हे पैशे हत..... तुमी घरात बसोन ऱ्हवो नुको...ह्या पैशात्सून कायतरी धंदो सुरू करा..... तुमका बरे दिवस ईले की मग्ये माज्ये पैशे परत करा. तुमका गाव देवाची आण..... आज तो सैतान फाटपटी उटोन शिरशात गेलेलो हा म्हनान मी ईलय." नी कडोसरीच्या पिशवीतून नोटांच पुडकं काढून भाऊं समोर टाकीत रखमा म्हणाली," ह्ये पाचशा हत.आता मिरग झालो की काटयो तोडूची सुरवाती होयत.तुमी आवंदू खरेदी करा. त्या धंद्यात बरे पैशे भेटतत." गंगा वहिनीने तिची खणा नारळाने ओटी भरली. लाह्याच्या पीठाचा लाडू खायला दिला. डब्यात घालून लोणचं नी खारातले आंबे दिले. मग भाऊ नी गंगा वहिनी दोघांच्याही पायावर डोकं ठेऊन रखमा उठली.

अकल्पितपणे कोंडी फुटली होती. रखमा खरोखरच लक्ष्मीच्या रूपानेच आली. पाचशे रुपये ही खूप मोठी रक्कम होती. एवढं भांडवल हातात आल्यमूळे भाऊना हुरूप आला.रस्त्याच्या कामात भाऊ़च्या सवत:च्या काठ्याही तोडायच्या राहिलेल्या होत्या.

मिरगाबरोबर आपल्या काठ्यांच तोडकाम धकल्याच्या लगामी लावून बाबल्याला सोबत घेऊन भाऊ काठ्यांच्या खरेदीला बाहेर पडले. उपळं, तारळ, कुंभवडं, नाणार, सागवे, शिरसे ह्या गावानी कठ्याची मोठ्या प्रमाणात तोडतोड सुरू होती. ऐन मोक्याच्या टायमाला रोखीने माल घेणारा भेटल्यामूळे घाऊक व्यापाऱ्यानी घासघीस न करता सौदे तोडले. आठवडभर तंगडतोड करून जवळ जवळ तीन ट्रकांची भरताड होईल एवढी खरेदी झाली. त्यात करूनही प्रत्यक्ष लोड भरताना गरज पडलीच तर किरकोळवाल्यांकडून माल घेऊन भर करता आली असती. नन्नाजी हातात असले की कुठचं काम अडत नाय.

आता शामरावाला गाठायला हवा होता. राजापूरातला संपूर्ण तालुक्याचा रेशन पोच करायचा मक्ता त्याच्याकडेच होता. राजापूरच्या गोडाऊन कीपरकडे हुकमी माहीती मिळली असती. दोन दिवस आराम करून सोमवारी सुरेशला सोबत घेऊन भाऊ राजापूरात गेले. गुरूवारी शामराव यायचा होता. त्याला रेशन उतरून झाल्यावर काठीचा लोड भरायला यायचा निरोप देऊन भाऊ बाजारात गेले. रमेशला गणवेशाचे दोन जोड आणि एक रंगीत पाटलोण -सद्रा आणि आपल्या साठी धोतजोडी नी शर्टाचे कापड घेऊन ढेकण्याकडे कपडे शिवायला टाकले. त्याला पहिल्यानेच गंजीफ्रॉकाची जोडीही घेऊन दिली. निमासाठी परकर पोलक्याचे कापड, बायको साठी दोन पातळं अशी घाऊक खरेदी झाली. घरी गेल्यावर गुरूवारी रात्री किंवा शुक्रवारी भिणभिणताना काठ्या भरायला जायची वर्दी धकल्याला देऊन भाऊ निर्धास्त झाले. गुरूवारी काळवं पडायच्या वेळेला दस्तुरी नाक्यावरून भाऊंच्या घरापर्यंतच्या नव्या रस्त्यावरून शामराव आला. तासाभरात

जेवणाचे डबे सोबत घेऊनच माल भरायला जायचं होतं. भरताड झाल्यावर भाऊ़च्या घरी परत येऊन झोप काढून दुसरे दिवशी कोल्हापूर असा बेत होता. तासाभरात डबे झाले नी पेट्रोमॅक्स घेऊन ट्रक सुटला. गडी तयारच होते. कुंभवड्यात चार ठिकाणी भरताड झाल्यावर भाकरी खाऊन ट्रक उपळ्यात गेला. उपळे प्रिंदावण दोन गावात लोड पुरा करून भाऊंच्या घरी जाईतो पहाट झाली

दुसरे दिवशी उशिरापर्यंत झोप काढून ड्रायव्हर नी दोन सोबत्यानी आंघोळी उरकल्या. आरामात जेवणं उरकून दुपार उलटून गेल्यावर ट्रक सुटला. शाहूपुरीत शामरावाच्या ओऴखीने दोन तीन व्यापाऱ्यांशी दराची चौकशी केली. त्यांच्यापैकी एकाने दर चांगला लावला.पण तो चार आणे व्यवहार रोखीने नी बाकीची रक्कम दिवाळीत भागवणार होता. शामरावाने त्याची हमी दिल्यावर भाऊनी हिशोबाच्या वहीत झालेल्या व्यवहाराची नोंद करून त्यावर व्यापाऱ्याचा नी साक्षिदार म्हणून शामरावाचा आंगठा घेतला.

रात्रभर तिथेच आराम करून सकाऴी शामराव वडणग्याला गेला नी भाऊ परतीच्या प्रवासाला सुटले.जुलै अखेर काठ्या भरवणाच काम पुरं झालं. तिसऱ्या ट्रीपला सागव्यात आगावू खरेदीच भरवण कमी पडलं. मग शिरशात ट्रक नेला तिथे किरकोळवाल्या चारपाच लोकांकडे खरेदी केली.हातच्या हातावर पैसे मिळणार म्हटल्यावर काहीही रखड न लागता भरवण पुरं झाल. आता ट्रका सोबत भाऊना कोल्हापूरला जावं लागत नसे. बयाण्याची रक्कम शामराव भागवी. रखमा येऊन रक्कम देऊन गेली आणि कोंडी फुटली. सगळा व्यवहार भागून सव्वाशे रुपये शिल्लक होते. दिवाळीत तीन ट्रीपचा पूरा

व्यवहार झाल्यावर रखमाने दिलेलं मुद्दल परत करून,वर्षभराचा खर्चवेत भागून पुढच्या सीझनला खरेदीसाठी चार पैसे हाताशी रहाणार होते. देवाने फार सत्वपरीक्षा घेतली नाही. सगळा ताळमेळ घेऊन नवीन ५० कलमं लावायचा बेत योजला. अकस्मात उठणाऱ्या वावटळी सारखं अरिष्ट आलं आणि शेत जमीन गडप करून गेलं खरं पण आपण शाबूत राहिलो. एका सीझनची तरी चिंता मिटली.

गेल्या वर्षी सुरेशला वार लावून जेवायला लागलं. पण यंदा त्याला खाणावळ लावून दिली. सहा महिन्याच्या खाणावळीच्या बीलाचे पैसे भाऊनी आगावू भरले. तीन चार सीझन दैवाने साथ दिली तर कलमांच शिपणं सुटल़ की, पुन्हा ऊर्जितावस्था येईल अस़ आशादायक चित्र भाऊना दिसू लागलं. सराई सुरू झाली. पाऊस उडाला नी गवतं सुकली. कलमां़च्या तळ्या करुन दक्षिण धरून प्रत्येक कलमाला उन्हाचा चटका बसू नये म्हणून आंजणीचे टाळ बांधून ़शिपणं सुरू झाल. गेल्या सिझनला भाऊ आणि गंगावहिनीने आपल्या डोक्यावरून डबे वाहीले. यंदा दैन्य फिटलं, चार पैसे हातात आले. धकल्या नी त्याचा भाऊ याना शिपणं देऊन भाऊ बिनघोर झाले. दिवाळी पूर्वी काठ्यांचा पूर्ण हिशोब शामरावाने गोडावून कीपरकडे देऊन ठेवला. त्याने दादा खोतांमार्फत रक्कम पाठवली. दादां़चा भेटून जा असा निरोप आला म्हणून भाऊ गेले. ते गेल्यावर दादानी व्यापाऱ्याचं पत्र आणि रक्कम समोर टाकली..... भाऊ चाटच झाले.

घरी गेल्यावर त्यानी रखमाचे पैसे बाजूला काढले. ते स्वत: जाऊन रखमाशी बोलू शकत नव्हते. काशी बाणी रखमाकडे कामाला जायची. महीना दोन महिन्यानी रखमा तिच्याकडे चारपाच कुडू

तांदूळ धाडायची. तिला भेटून बळी बाहेर जायचा असेल तेव्हा वर्दी दे, गंगा वहिनीला रखमाची भेट घ्यायची आहे असं सांगितलं. पाच सहा दिवसानी तशी संधी आली आणि रक्कम घेवून गंगावहिनी काशीबरोबर रखमाला भेटायला गेली.गंगावहिनीने रखमाला बाजूला घेवून रूपये दिले. "मी खरां म्हनशीतर परत घेवसाटना पैशे दिलेले नाय. माझ्या घोवामुळा तुमच्ये वनवास सुरू झाले.... तां पाप फेडूसाटी दिले."

त्यावर गंगा वहिनीने "काठ्यांचे तीन ट्रक घातले. त्याचे चांगले पैसे मिळाले.चार दिवसामागे सगळा हिशोब मिळाला.तुमचं मुद्दल देऊन खर्चवेत भागेल. तुम्ही येवून गेलात तेंव्हापासून तुमच्या पायगुणाने आमचे दिवस पालटले. चार घास सुखाचे मिळण्याएवढी आमदनी आहे. आता ईथून पुढे तांदूळ पण नका पाठवू. हे पैसे ठेवा.देव करो नी पुन्हा अशी वेळ न येवो, पण गरज पडली तर मी मोठ्या बहिणीच्या हक्काने तुमच्याकडून मागून घेईन" असं म्हटल्यावर तिला मिठी मारून रखमा रडली. "तू भटीण असोन माज्याशी भैनीचा नाता लावलं, आता मी तुका आक्का म्हनतय नी तू पन माका म्हायारच्या सखू ह्या नावान बोल. त्या नात्यान सांगतय. हे पैशे आता घोवाक पण दखल न देता तुज्याहारीच ठेव. माका येळ पडात तवा मी तुज्यारसून मागॉन घ्येयन." तीने मग जरीकाठी खण आणि पाच नारळानी गंगा वहीनीची ओटी भरली. ऊठता ऊठता गंगावहीनी म्हणाली, "सखू, एखद्याचो लय गैर फायदो घेणां ह्यां पाप हा. ह्यांका तर मुळीच आवाडणार नाय. तुका माजी शपथ हा.तू आमची नड भागवलंस. आता माका पैशे घ्येवची गळ नुको घालू. तू एकदा जेवक् माज्या घरी ये. बळी भावजींक आक्काकडे जातय असा सांगोन राजरोस ये."

सात वर्षं मागे पडली. केसचा निकाल लागला. निकाल हरीच्या बाजूने लागला. बळीच्या सांगण्यावरून सांगण्यावरून कोर्टात केस दाखल झाल्यावर जबानी देण्यासाठी हरी काष्टी लावून त्यावर अर्ध्या बाहीचं मुंडं घालून कोर्टात हजर झाला. काष्टी म्हणजे दोन हात औरस चौरस मांजरपटाचा तुकडा त्याचं एक टोक दोन कुल्ल्यांच्या फटीतून पाठच्या बाजूला आंबाड्याच्या तिपेडी करदोट्यात खोचून घेऊन गाठ मारायची. पुढच्या बाजूने संपूर्ण फडका करदोट्यातून वर ओढून रूंद करून उजव्या बाजूचे टोक गोलाकार फिरवून पाठच्या बाजूला शेवटेल त्या ठिकाणी करदोट्यात खोचायचं. यात पुढचा भाग मांड्यांपर्यंत झाकला जात असे मात्र मागील बाजूला फक्त अर्धा कुल्ला झाके आणि अर्धा उघडा राहत असे. हरी बापुडवाणा चेहरा करून जबानी द्यायला पिंजऱ्यात चढल्यावर त्याला बघून जज्ज साहेबांच्या मनात अपार करुणा दाटून आली. वकील आणि भगवत गीतेवर हात ठेवूनशपथ घ्यायला सांगितल्यावर कसनुसा चेहरा करीत हरी म्हणाला," पण मी न्हावन् ईलेलो नाय. पोतयेक हात लावलो तर आपड होयत ना?"

वकील- तुमचं पूर्ण नाव सांगा.

हरी बेलीफाकडे निर्देश करीत म्हणाला, त्या लाल डगले वाल्यांनी सांगितलानी तांच....

वकील- हे पहा, तुम्ही स्वतःच्या तोंडाने तुमचं संपूर्ण नाव सांगा

हरी -हरी नळेकार

वकील-अहो संपूर्ण नाव म्हणजे तुमचं नाव वडिलांच नाव आणि आडनाव असं सांगा.

हरी- हरी सखाराम नळेकर

वकील - तुम्ही मामलेदार समोर रस्त्याला जागा देणे तुम्हाला मान्य आहे म्हणून डाव्या हाताचा अंगठा निशाणी कशी काय दिलात ?

हरी- तवा काय झाला पोलीस पाटील, दादा खोत, मामलेदार, तेंचो पटेवालो आशी मोटीमोटी मानसा ईलेली.... नी आमी सगळे जमीनवाले. तीस चाळीस मानूस जमलेला.... तेनी सांगलानी काय जग दुनियेची सोय व्हनार हा तवा तुमी काय तक्रात करू नुको.... तवा किती जागा देवची नी काय माजी समज पडली नाय..... तवा माका काय सुदरला नाय.... येकादो भांगो असात म्हनू मी गप ऱ्हवलय. मगे कागदार कायतरी लिवोन आमका सांगलानी काय हय आंगटे करा..... बाकीच्या़वांगडा मी पन आंगटो दिलो

वकील - कागदावर आंगठा घेण्यापूर्वी काय लिहीलेलं आहे ते वाचून दाखवलं होतं ना?

हरी- ता एवडा माका आता आटवत नाय...जज्ज साहेबांकडे मोहरा वळवून हात जोडून डोकं झुकवीत हरी पुढे सा़गायला लागला..

मी अडानी मानुस.... आमी कुळवाड भाशा बोलनारे.....भटा बामनाची भाशा आयकोन माजी समज पडत नाय....

वकील - मग त्या वेळी तुम्हाला कळलं नाही तर तसं तुम्ही सांगायला पाहिजे होतं.

हरी- नाय म्हंजे तुमी म्हणतास तां बरोबर पन त्ये वक्ती मी भ्यांबारलं हुतय. माका तवां येवजलां नाय. ते ईच्यारनारे सायब् म्हंजे लय कडक नी बोलणां म्हंजे तरडावल्या सारका. तेंच्या सामनी बोलताना माका निस्ती कापरी भरली .....

वकिल-बरं मग आता आता तुमची काय तक्रार आहे?

हरी- आदी पैलो रस्तो हयसून नवतो. तो येगळया बाजून व्हतो. बानघाटीत्सून मळ्यात येवचो हुतो. थैच्या लोकानी तेंची जमीन वगऴू साटना काय काय खटपटी करून रस्तो फुडे न्हेवन् आमच्या घाटीत्सून खाली घाटे भाऊचा आगार मुळम वाडी नी आमच्ये वाडीत फिरवून मग्ये मळ्यात न्हेवचो येवजलानी.माजी तक्रात म्हनशा तर माज्ये सात भांगे जातत रस्त्यात..... म्हंज्ये ऱ्हवले फकस्त चार.... आता तुमीच बगा.... तेतू पिकनार काय नी आमी खाणार काय? ह्या जमनीर आमच्या कुटंबाचा प्वॉट अवलंबून हा. येक दोन भांगे आसते तर जावने मराने म्हटला आसता. सरकार सगळाच बळकाऊक बगता हा तसा़ कसां जमात? माका उपाशी मरोक लागात ना... म्हनू कायव झाला तरी माका रस्त्यासाटना जमीन द्येवची नाय.....

वकिलानी हरीची बाजू मांडताना आपला अशिल हा अत्यंत गरीब व अल्प भू धारक आहे, रस्त्यासाठी थोडी झीज सोसायला तयार

आहे. पण या व्यवहारात निम्मेपेक्षा जास्त क्षेत्र ऍक्विझिशन खाली येत आहे. ही जमीन रस्त्याखाली गेली तर त्याच्यासह कुटूंबीयांवर उपासमारीची वेळ येणार आहे. तेव्हा एकतर ऍक्विझिशन एवढी पर्यायी शेतजमीन सरकारने द्यावी ़किवा फेर सर्व्हे करून माझ्या अशिलाचे क्षेत्र वगळून लगतच्या अन्य क्षेत्रातून रस्ता न्यावा. मी आणखीहीएक बाब न्यायालयाच्या निदर्शनाला आणू ईच्छितो की सदरील रस्त्याच्या मूळ प्रस्तावात सरकारने अलिकडेच फेरबदल दुरूस्ती करून रस्त्याची लांबी वाढवून फेर बदल केलेला आहे. त्यामूळे माझ्या अशिलाची कैफियत न्यायसंगत आहे. हरीची चर्या बघून आधीच जज्ज साहेबाना त्याचा कळवळा आलेला होता. वकिलानी केलेलं ऑर्ग्यमेंट ऐकल्यावर साहेबानी सरकारचे ऍक्विझिशन बेकायदा ठरविले. निकाल झिलूच्या बाजूने लागला. आता रस्त्याचा प्रस्ताव पुरताच कचराकुंडीत गेला.

त्या दरम्यानेच कुंभवडे फाट्यावरून हरचलीत मांडापर्यंत रस्ता होवून वसतीची राजापूर हरचली गाडी सुरू झालेले होती. दोन वर्षानी दादा खोतांचा मुलगा प्रभाकर राजापूर पंचायत समितीचा अध्यक्ष झाला. त्याने सूत्र हाती घेतल्या घेतल्या हरचली मांडापासून बाणेवाडी मार्गे चिवारी चवाठा असा दोन गावांसाठी मिळून जोड रस्ता मंजूर करून घेतला . आता बऱ्याच सुधारणा झालेल्या होत्या. कामाचा मक्ता आतून प्रभाकर देसायानीच घेतलेला होता, मंजूर झालेल्या भागात फार मोठे चढ उतार नव्हते. त्यामुळे दीड महिन्यात रस्त्याचे काम पुरे झाले आणि राजापूरहून हरचलीला येणारी गाडी चिवारी मांडापर्यंत यायला लागली. मे अखेरीला राजापूरहून दुपारची चिवारी गाडीही सुरू झाली. गुरव वाडी, मुळम वाडी हा भाग

चिवारीतला भाग मात्र दुर्लक्षितच राहिलेला होता. सिलीपाट आणि खुटवळाच्या धंद्याला उतरती कळा लागली होती, कोळशाचा धंदा तर बंदच पडलेला होता. पावसाळी चिव्याच्या काठ्या भरायचा धंदा अजूनही सुरू होता. तसेच सार्वत्रिक जोरदार कलम लागवड झाल्यामुळे आंबा व्यापार तेजीत आलेला होता.

गुरवांच्या काट्यात कलम लावण्यासाठी त्यांच्या भावकीन सोळा एकर प्लॉट मधला खुटवळ काढला. ईद्रूस रडी करून पाडून मागायला लागला म्हणून गुरव बळीकडे गेले. भरवण गुरवानी करून द्यायचं या अटीवर सौदा ठरला. पंधरा दिवसानी वर्दी आली. बळी स्वत: ट्रका सोबत आलेला होता. निम्मे भरताड झाल्यावर ड्रायव्हर नी बळी भाकरी खायला बसले. बळीने इंग्लिश दारवेची बाटली खोलली. पाव बाटलली ड्रायव्हराला देऊन उरलेली स्वत:प्याली. आता बऴी तालात आलेला होता. जेवताना आपल्या मोठेपणाची त्याने भाकडं सुरू केलिन. आपली मळ्यातली जमीन वाचवण्या साठी मंत्रालयातून हुकूम कसा काढला? भाऊला डबऱ्यात बसवण्यासाठी हरीला पुढे करून कोर्टाचा हुकूम घेऊन काम बंद कसं पाडलं हे रंगवून सांगितलं. “तेका धडो शिकव साटना आजपावत दोन हज्जार रुपाये खरचले”.” ड्रायव्हर नवीन होता. बळीच्या बाता ऐकून तो अजाब करीत म्हणाला,” बळी शेट तुमचं म्हंजे लय भारी काम हाय की राव....” बऴीने पिशवीतून हातभर लांब सुरा काढला. “ ही वस्तू कायम आपल्या जवळ आस्ता. दुनयाभर माज्ये वादी दुस्मन हत. कोन कदी सामनी येत तां कळनार नाय.”

ट्रक लोड करून झाला नी गडी वाटेला लागले. ट्रक मुळम वाडीत चिंचेकडे नेऊन वऴवून आणायचा होता. बऴी अजून सुरा

हातात वागवीत बसला होता. इंग्लिश दारू ड्रायव्हरच्या अंगावर आलेली होती. ट्रक भाऊंच्या आगरा जवळून पुढे गेला. मुळम वाडीच्या अलिकडे मोठं वळण घेऊन एकदम घसारी सुरू व्हायची. ड्रायव्हरला काय सुधरलं नाही. वळणात मोडणावर ट्रक सरळ पुढेच गेला . तिथे रस्याच्या कडेबाहेर जात ट्रक उलटला. ट्रक कडेला गेल्यावर खाली कोसळणार हे लक्षात येवून क्लीनरने बाहेर उडी मरलीन. ट्क दोन घोलांट्या मारून पंधरा फूट खोल जाऊन मोठ्या आंब्याच्या झाडावर धडकला . झाड जुनाट नी खूप मोठं होतं म्हणून ट्रक तिथेच थोपला. छातीवर स्टेअरिंग आदळून ड्रायव्हर बेशुध्द पडला. क्लीनरने ़किचाळी मारीत ट्रक बाहेर उडी मारल्यावर बऴी दाराकडे झेपावला. ट्रक पलटी झाल्यावर तो बाहेर फेकला गेला नी त्याच्या हातातला सुरा खच्चकन् मांडीत घुसून खोल रुतून बसला.

बळी आणि क्लीनर यांच्या किंकाऴ्या ऐकल्यावर मुळम वाडीतले झिलगे धावले. ट्रक आगराजवऴून पुढे गेला तेंव्हा भाऊ झोपाळ्यावर बसलेले होते काही वेळातच ़किकाळ्या ऐकल्यावर काहीतरी गडबड आहे हे ओळखून भाऊ बॅटरी घेऊन बाहेर पडले. मुऴम वाडकऱाचा गलका नी कुकारे ऐकून त्या रोखने पुढे गेल्यावर बळीच्या किंकाळ्या ऐकू आल्या. बॅटरीच्या झोतात आडवा पडलेला बऴी दिसला. डाव्या मांडीत सुरा घुसल्यामुळे धोतर रक्ताने भरलेले होते. यशाच स्थितीत त्याला उचलून भाऊंच्या घरी ओसरीवर ठेवले. त्यानी बायकोला हाक मारून पाणी आणायला सा़ंगितले. दोघेजण भाऊंजवळ थांबले नी बाकीचे बत्ती पेटवून घेवून ट्रक उलटला होता तिकडे गेले. दोघानी बळीचे हातपाय धरल्यावर भाऊनी त्याच्या मांडी घुसलेला सुरा उपसून

काढला.ओल्या फडक्याच्या पिळ्याने रकत पुसून जुने गाईचे तूप जखमेवर ओतून त्यावर कापसाचा बोळा दाबीत तूप ओतून बोटाने जखमेत भरला. कोणीतरी गुरव वाडीतल्या वैद्याला घेऊन आला. बळीचे धोतर सोडून त्याला धुवून पुसून भाऊंकडचा पंचा गुठाळून घोंगडीवर ठेवले. दारवेचा अंमल असल्यामूळे बऴीला झोपेची झापड आली नी त्याची कण्ह कुथ बंद झाली.

क्लीनरला फारसं लागलेलं नव्हतं. ड्रायव्हर मात्र स्टेअरींग वर पालथा पडून थ़ंड झाला होता. त्याच प्रेत मोकळ्या जागेवर आणून ठेऊन लोक रात्रभर तिथे राखण करीत बसले. सकाळी पोलिसपाटिल राजापूर पोलिसाना वर्दी द्यायला रवाना झाला. बळीला डोळीत घालून घरी नेलेनी. मध्यान उलटल्यावर पोलिस आले. अपघात कसा झाला याची माहिती क्लिनर आणि बळी हे दोघेच सांगू शकत होते. अपघात झालेलं ठिकाण बघितल्यावर सगळेच आश्चर्य करीत होते. वळण अवघड नव्हत नी तिथे बाजूला सप्पय जागा होती. क्लिनर म्हणाला की, “ डायवराला दारवेचा नाद नवता. कालच्या टायमाला ते पैल्यानंच प्यालं हुतं. म्या टरक चालिवतो. ते झिंगल्यालं म्हताना म्यां त्याला झोपाय सांगटलो पर त्ये आयकना झालं की.... त्येला ह्ये वळान उमागलं नाय काय की..... टरक रस्ता सोडून जातय बगिटल्यावर म्या घाबरून भायर उडी मारलो की. फुडं कस्काय झालं त्ये मला न्हाई म्हायती.” पोलिसानी पंचनाम्याचे सोपस्कार उरकले. पोलिस बळीची जबानी घ्यायला गेले .पण त्यावेळी तो काहीच सांगण्याच्या अवस्थेतच नव्हता. सकाऴी दारवेचा अंमल उतरल्यावर त्याची जखम खूप दुखत

होती. म्हणून त्याला पेज भरवल्यावर वैद्यानेच त्याला दारू पाजून निजवला होता. पोलिस ड्रायवहरचे मढे घेऊन राजापूरला परत गेले.

हप्ताभरा नंतर गाडीचा मालक आला. गावातले लोक ट्रक वर काढायला मदतीला आले. मुसलमान वाड्यातून कप्प्या नी मोठे राजू-वाले आणून विरडभरात ट्रक मोकळ्या पेडात ओढून घेतला. स्टार्टर मारल्यावर ट्रक सुरू झाला. मग ईकडे तिकडे थोडिशी खणती करून रस्ता काढल्यावर ट्रक वळणाच्या पुढच्या बाजूने न्हेऊन मुख्य रस्त्यावर आला. गाववाल्यानी एक पै ही मोबदला घेतला नाही. जुन्या गाईचे तूप जखम साधण्यावर एक नंबर प्रभावी असते. त्यामूऴे बळीची जखम आब्रावली नाही. दिवसातून दोनदा इंग्लिश दारवेची पाव बाटली मारून भाकरी खाऊन तो पासल मारून राही. महिना भरात जखम भरून आली नी बळी हऴू हऴू हिंडा फिरायला लागला. ज्या भाऊना रखेत बसवण्यासाठी हरीला पुढे करून रसत्याचे काम बंद पाडलेस त्याच भाऊनी तुझी जखम पुसली. त्यांनी योजून गाईच्या जुन्या तुपाचा उपचार करून तुला वाचवला. असं रखमा त्याला जापवीत राहिलेली होती. बऴी एक शब्दही न बोलता खाली मान घालून गप ऐकून घ्यायचा. तो मनोमन भलताच खटावलेला होता. पण त्याची भंडार ईशीम आडवी आल्यामूळे त्याचा ताठा कमी झालेला नव्हता. महत्वाची बाब म्हणजे हयातभर हम करेसो कायदा न्यायाने मूत जाळणारा बऴी.....नमणं हे त्यच्या वृत्तीतच नव्हतं. पण भाऊंना निष्कारण त्रास दिला ते पाप उलट फिरून आलं असं रखमा सतत ठोकीत राहिल्यामूऴे बळीही मनोमन उमजलेला होता. त्या नंतर पुढच्या काळात मात्र कधिही भाऊंचा दुस्वास करणं सोडाच तो त्यांच्या वार्तेलाही गेला नाही. रखमा आता अधून मधून राजरोस

भाऊंकडे जायची. त्या बद्दल तिच्या माघारीही त्याने नाराजीचा शब्दही कधी काढला नाही. भाऊंची मुलं मावशी मावशी करीत काही अपूर्वाईची खाणेवस्तू वगैर घेऊन जायची तेव्हा बऴीला ते मोठेपण वाटायचं. रुपया दोन रुपये त्यांच्या हातावर घालायचा. त्या काळी ही रक्कम खूपच मोठी होती. मराठी शाळा

मास्तराना त्याकाळी पाच रुपये पगार मिळे.

उन्हाळी हापूस आंबा काढणी सुरू झाली की मुंबईला आंबा पेट्या नेणारे व्यापारी सीझनमध्ये आंबा पार्सल न्यायला दस्तुरी नाक्यावरून गुरववाडीपर्यंत ट्रक नेत असत. भाऊनी बांधलेला रस्ता अद्यापी सुस्थितीत होता. सुरेश मॅट्रिक झाला. त्यानंतर रत्नागिरीत संस्कृत पाठशाळेत राहून बी.कॉम. झाला. परीक्षा देवून गावी आल्यावर चार दिवसानी तो रखमाला भेटायला गेला होता. तेव्हा तिचा मुंबई पोलिसमध्ये असलेला भाऊ रामभाऊ बारस्कर आलेला होता. हा घाटे भाऊंचा मुलगा, म्हणून बळीने त्याची ओळख करून दिली. सुरेश रखमाला माहेरच्या नावाने आणि मावशीचं नातं लावून बोलत होता. म्हणून तिचा भाऊ बुचकळ्यात पडलेला होता. तो गेल्यावर त्याने बहिणीला विचारल्यावर तिने घाट्यांशी आपली सवगव कां नी कशी झाली हे सांगितल्यावर तो थक्कच झाला. रखमाने सुरेशला मुंबईत चांगली नोकरी मिळवून द्यायची भावाला गळ घातली. ब्राह्मण कुटूंबात तिचे इतके जिव्हाळ्याचे संबंध आहेत या गोष्टीचा मोठा अभिमान त्याला वाटला. सुरेशला आपल्या बरोबर मूंबईला नेवून त्याला पुढे शिकवून मार्गी लावून द्यायचा निर्धार त्याने बोलून दाखवला. संध्याकाळी

रखमा त्याला आणि भावजयीला घेवून भाऊंच्या घरी गेली. गंगावहिनीने रखमा आणि तिच्या भावजयीला माजघरात नेवून पाटावर बसवलं.

तो काळ असा होता की इतरेजनाना ब्राह्मणांच्या घरात प्रवेश मिळत नसे. पण भाऊंकडे झालेल्या आगत स्वागतामुळे रामभाऊ बारस्कर पुरता भारावून गेलेला होता. सुरेश फस्ट क्लास करियरचा आहे हे कळल्यावर हा मुलगा आपलं नाव काढील अशी त्याची खात्रीच झाली. तो भाऊना म्हणाला, " ह्याची जबाबदारी आमच्या सखून माज्यावर सोपवलेली हाए. नोकरी म्हणशाल तर तेला आत्ता भेटेल. पन तो आजून फुडे शिकला तर लय मोटा साहेब होईल. माजी माटुंग्यात मोटी जागा हाए. मी तेला माज्याकडे सांबाळतो. तो आजून फुडे शिकूने . तेचा जिम्मा तुमी माज्यावर सोडा. मी माज्या कडे तेला सांबाळीन. तेला सवतंत्र रूम द्येईन मी. माजी चार मुला हाएत. त्यानला बी जरा शिस्त लागेल. मी ज्याम त्याम झोपन्या पुरता घरात आसतो. येकेकदा दोन दोन दिवस पण डुटी आसली की मला घरी यायला बी भेटत नाय. मी नसलो काय पोरा आवशिला जुमानीत नाय. मुंबयला शेजार पाजारी पण सगळी बारबंड वसती. माजी मुला वायट संगतीला जावून तेंची बरबादी व्हईल ह्येची मला लय धास्ती वाटते. सुरेश माज्या घरी ऱ्हवला तर मुलाना बी धाक राहील. तुमी माला पाच पैशे पण देव नुको. मी माजो सख्खो भाचो समजून सांबाळीन. तेच्यासाटना भटाकडसून जेवनाचो डबो मागवीन मी . आता तुमी नाय म्हणायचाच नाय. मी धा रोजान मुंबयला वापस जानार तवा तेला माज्याबरोबर घेवन् जानार मी."

सुरेश रामभाऊ बारस्करांसोबत मुंबईला गेला. बी.कॉम.चा रिझल्ट लागला.सुरेशला फर्स्ट क्लास मिळाला. त्याने बी.

कॉमला युनिव्हर्सिटीतच ॲडमिशन घेतली. रोज माटुंगा ते बोरीबंदर ट्रामने अप डाऊन करावे लागे. परत यायला संध्याकाळ होई. संध्याकाळी तो चारही मुलांचा अभ्यास घेई. तिन्हीसांजेला रामरक्षा, मारुती स्तोत्र शिकवी. तो रहायला गेल्या पासून रामभाऊनी तो घरात असताना मांसाहार रांधणे बंदच केलेले होते. बुधवार, रविवार सगळी हॉटेलात जावून मांसाहार करीत. रामभाऊ ड्युटी नसली की इंग्लिश दारू घ्यायचे. अधून मधून मित्र मंडळी जमवून घरी पार्टी व्हायची. पण सुरेश रहायला आला नी त्यानी तो नाद पूर्ण बंद केला. कुठेतरी पार्ट टाईम जॉब करायचा सुरेशचा विचार होता. पण रामभाऊ आणि मामीनी विरोध केला. त्याने एकमार्गी एम. कॉम. पूर्ण करावे करावे, ते केल्यावर चांगल्या नोकऱ्या चालत येतील . असा रास्त सल्ला त्यानी दिला. दोन वर्षात त्याला आपल्याकडचे पाच पैसेही रामभाऊनी खर्च करू दिले नाहीत. सुरेश सकाळी आंघोळ उरकल्यावर अथर्वशीर्ष, महिम्न, त्रिसूपर्ण म्हणत असे. सुरुवातीला तो अगदी हळू आवाजात म्हणताना ऐकल्यावर बारस्कर म्हणाले, "द्येवाचे मंतर मोट्यान म्हण ..... आमका काय शाट सुदा येयत नाय पण द्येवाचा नाव कानार पडॉने आमच्या पन." मग तो मोठ्याने म्हणू लागला. रामभाऊ घरात असले की सुरेशचं म्हणणं संपेतो ते भक्तिभावाने डोळे मिटून हात जोडून ऐकत असत.

सुरेशने गुरूवारी संध्याकाळी आरत्या करायचा प्रघात सुरू केला. शेजारच्या बिऱ्हाडांमध्ये देवगड, मालवण, वेंगुर्ला अशा कोकणातल्या गावांमधली माणसं रहायची. दोन तीन रविवार गेल्यावर हळू हळू शेजारची मंडळी जमायला लागली. मग कोण कोण योजून पेढे, बर्फी प्रसादाला आणू लागली. बारस्करांकडची गुरूवारची आरती हा एक

समारंभच बनला. मामी कौतुकाने म्हणायची सुरेश इलो नी आमच्या घराचा देवाळ झाला. पुढे सचिवालयात नोकरीला लागल्यावर सुरेश स्वतंत्र बिऱ्हाड करून वेगळा रहायला लागल्यावरही आरतींची प्रथा सुरूच राहिली. सुरेश नी त्याची बायको दर गुरूवारी आवर्जून आरतीला हजर रहात. एकदा रामभाऊ रात्रीच्या बंदोबस्तावरून जाग्रणाचे येवून दिवाणखान्यात झोपले. त्या दिवशी आंघोळ करून आल्यावर त्यांची झोपमोड होवू नये म्हणून सुरेश मनातल्या मनात म्हणत होता.

त्याचा पायरव लागल्यावर बारस्कर उठून बसले. सुरेशला म्हणाले, " तू आज मंतर नाय म्हणत?" त्यावर सुरेश बोलला. तुमची झोपमोड होईल म्हणून मी मनातल्या मनात म्हणतोय. त्यावर ते हसत बोलले, " तरीच.... असा नुको करू, झोपोन मानसाचा अर्धा आयुक्ष्य गेला..... आमची पोलिसाची नोकरी. आमी कायम पापच करतंव, तुज्या निमित्तान देवाचा नाव कानार पडता. माका तेवडाच बरां वाटता. ह्या फुडे कदीव तू माज्या झोपेची काळजी करू नुको नी कदीपण तुजो प्रघात मोडू नुको. "

सुरेश दरमहा संकष्टीचा उपास करी. त्याचे बघून बारस्कर पती पत्नी मग त्यांची मुलंही संकष्टीचा उपास धरायला लागले. शेजार पाजारी घरात मासे मटण केलेलं असलं की सवगवीच्या कुटूंबात द्यायची पद्धत पाळीत असत. मसुऱ्याची सावतीण बारस्करणीकडे माशाची आमट द्यायला आली. तीने आणलेलं भगुलं उघडून बघितल्यावर मामी म्हणाली," अग्ये बाय माज्ये, म्हावऱ्याचा कालाण? तसाच ढाकून वापीस घेवन् जा ग्ये बाय . आमचो भाचो इल्यापास्नां आमी घरात माशे, मटान , म्हावरां रांदूचा बंद केलेला हा. आम्ही खावचाच झाला तर भायर

हाटेलात जावन खातंव. तो भट हा ना..... तेका चलाचा नाय.....” त्यावर अजाब करीत सावतीण म्हणाली “ पन तुमी भंडाऱ्या असास ना गो, नी भाचो भट ह्यां कसा काय?” त्यावर बारस्करीण म्हणाली, “तेचा काय हा, सुरेशची आवस ही भटीन, ती माज्या घोवाची मानलेली भैण.....

आमी गावाक ग्येलाव काय सवताच्या घरासारी सुरेसाच्या घरां जावन् ऱ्हवतंव. शिकाच्या निमतान भाचो हय आसा. उद्या नोकरी धंद्याक लागलो की लगीन न्हाय पावत हय ऱ्हवणार. तंवसर येवडा बंदन पाळायचा आमी ठरवलंव. आता आमच्ये बापये म्हणशी तर घरी आसले काय कायम घेणारे, पण भाचो इल्या पास्ना ह्येनी घरात घेवची दुकू बंद केल्यानी. कदी तलफ़ इलीच तर डुटी सपल्यार भायरच्या भायर पियोन दोस्त मंडळीकडे ढकालतात नी सकाळी घरां येतत.... भाचो आमच्याकडे असा पावत आसला काय मटान म्हावरां असात तां कायपन माका हानून द्येव नुको ग्ये बाय, तुज्या पाया पडतंय्.... ”

दोन वर्षे कधी मागे पडली समजलेसुद्धा नाही. परीक्षा झाली आणि अर्ज मुलाखती प्रयत्न सुरू झाले. त्याने प्रायव्हेट कंपनीत इंटर्नल ऑडिटर म्हणून जॉब पत्करला. रिझल्ट लागला, सुरेशने एम. कॉम. ला फर्स्ट क्लास मिळवला. चारपाच महिन्यानी सचिवालयात सिनीयर अकौंटंट च्या पोस्टसाठी त्याचा इंटरव्ह्यू झाला. रामभाऊंचे जोरदार प्रयत्न होते नी सुरेशही व्यवस्थित तयारी करून गेलेला होता. अपेक्षेप्रमाणे सुरेशची निवड झाली. सुरेशने आपल्या ऑफिसमधल्या गुजराती मुलीशी सूत जमवलं. मुलग़ी घरंदाज आणि कमावती होती. रामभाऊ आणि मामी यानी भाऊंच मन वळवलं. भाऊनी जनापवाद टाळण्यासाठी रजिस्टर लग्न करायचा सल्ला दिला. रामभाऊंच्या

बिऱ्हाडा पासून जवळच नवीन बांधकाम झालेलं होतं त्या बिल्डिंगमध्ये सुरेशसाठी दोन रूमची जागा भाड्याने घेतली.

पागडीची रक्कम मोठी होती. पण भाऊ ही आता चार पैसे बाळगून होते. सुरेश मुंबईला गेला त्या वर्षा पासून कलमांचं चांगलं उत्पन्न सुरू झालं होतं . सुरेशला खोलीची पागडी भरायला चार हजार रुपये लागले . दोन हजार भाऊनी दिले . रामभाऊंनी निम्मी रक्कम भरली. रूम ताब्यात आल्यावर सुरेशचं रजिस्टर लग्न लागलं. आणि रामभाऊ नव्या जोड्याला आपल्या गाडीतून गावी घेवून गेले. भाऊनी नवीन जोडप्याच्या हस्ते सत्यनारायणाची पूजा करून गावाला जिलबीचं जेवण घातलं. नवरा बायको दोघं नोकरी करीत असल्यामुळे चार पाच वर्षात सुरेश वधारला. भाऊनी सड्यावरच्या कलमाच्या प्लॉटला दगडी बंधारा घातला. त्यावेळी प्लॉट पासून बेतवार चालीच्या अंतरावर रस्त्याच्या वेळी फोडलेल्या दगड धोंड्यांचे तीन डेपो मारलेले होते ते शाबूत होते. भाऊनी ते राजरोसपणे आणून ठिकाणाचा बंधारा घालायला वापरले.

धाकू थकला होता पण बाबल्या अजून दगडाची कामं करीत होता. त्याने बेताबाताच्या मजूरीत सात एकर प्लॉटचा बंधारा पुरा करून दिला. सुरेशला लग्नानंतर जरा उशीराने मुलगा झाला नी मूल बाळगायचा प्रश्न निर्माण झाला. भाऊनी तत्काळ गंगा वहिनीला मुंबईला पाठवून दिली. पुढे वर्षभरातच बागेची व्यवस्था धाकूच्या हाती सोपवून घर बंद करून तेही मुंबईला मुलाकडे रहायला गेले. वर्षं मागे पडत राहिली. भाऊ निवर्तले त्या वर्षी राजापूर मतदार संघातून हातणकर वकिल निवडून आले. त्यांच्याशी सुरेशचे चांगले संबंध

जुळले. ते मंत्री झाल्यावर एकदा सहज बोलता बोलता नावळे दस्तुरी नाका ते गुरववाडी व्हाळापर्यंत रस्ता होवूनही गाविक राजकारणामुळे गुरव वाडी, येरम वाडी, मुळम वाडी नी कुंभार वाडी या भागातल्या लोकाना गाडीसाठी पाऊण तास तंगडतोड करून चिवारी चवाठ्या पर्यंत जावे लागत असे.

चवाठा ते गुरव वाडी हा पॅच त्यांच्या निधीतून पुरा करायचा विषय सुरेशने त्यांच्या कानी घातला. नावळे दस्तुरीनाका ते गुरववाडी रस्ता झालेला असूनही गेली चाळीस वर्षं पड आहे ही गोष्ट हातणकराना माहिती नव्हती. त्यानी राजापूरच्या ओव्हरसियरला घेवून स्वत: पहाणी केली. रस्ता उत्तम स्थितीत होता. शोध चौकशी केल्यावर कागदोपत्री माहिती मिळाली. हरी नळेकराच्या जमिनीऐवजी जरा वळसा मारून पुढे व्हाळावर मोरी बांधून जुन्या सर्व्हे प्रमाणे मंजूर असलेल्या रस्त्याने मांडापर्यंत साडे तीन किलोमीटर जोड रस्त्याचे काम मंत्री कोट्यातून करायचे होते. जुन्या जाणत्याना त्या रस्त्यापायी भाऊंची बरबादी झाली ही गोष्ट माहिती होती.

हातणकर साहेबाना हा सर्व इतिहास कळल्यावर त्यानी काहीही करून हा रस्ता पुरा करून त्याला भाऊ घाट्यांचे नाव द्यायचे असा निर्धारच केला. त्यानी मुंबईला गेल्यावर सुरेशची भेट घेऊन भाऊंची चौकशी केली . पण भाऊ हयात नव्हते. मंत्री महोदयानी स्वत: लक्ष घालून स्वत:च्या निधीतूनच खर्च करून गुरव वाडी ते चिवारी चवाठा हा साडेतीन किलो मीटरचा जोड रस्ता पुरा केला. रस्त्याचं उदघाटन झालं नी रस्त्याला 'अनंत उर्फ़ भाऊ घाटे स्मृती पथ ' असं नाव देण्यात आलं. आता राजापूर ते शिरसे सागवे जाणाऱ्या आणि

त्या गावांमधून राजापुरला परतणाऱ्या एस्टी गाड्या नावळे दस्तुरी ते चिवारी चवाठा भाऊ घाटे मार्गाने ये जा करतात. प्रदीर्घ काळाने भाऊंच्या माघारी कां होईना त्यांच्या त्यागाची दखल घेतली जावून त्यांचे चिरंतन स्मारक उभे राहिले.



०५. नाडे घोरिप

कसरतीची कामं करीत गावोगाव फिरणाऱ्या डोंबारी/कोल्हाटी ह्यांना कोकणात नाडे घोरीप म्हणतात. त्यांच्या खेळात अधांतरी ताणलेल्या दोरीवर कसरती करणं हा अनिवार्य भाग असायचा. ही दोरी ताणण्यासाठी आठदहा फुटी बांबूचे दोन तुकडे मध्ये तीन चार हात अंतर सोडून फतरके रोवून माथ्यापासून दोन हात अंतरावर ते एकमेकाना बांधीत. अशी दोन फतकाटणी उभी करून त्यावरून ताणलेली दोरी जमिनीत ठोकलेल्या खुंटीला बांधलेली असे. त्याला नाडा म्हणत. साधारणपणे दसरा झाल्यानंतर त्यांची फिरती सुरू व्हायची. त्यांच्या फिरतीचा मार्ग नी मुक्कामाचे गाव ठरलेले असत. प्रत्येक गावात मध्यवर्ती मैदानात, चावडी जवळ खेळ करायच्या त्यांच्या जागाही ठरलेल्या असत. अशी बरीच कु टुंबं फिरतीवर सुटलेली असली तरी एका गावात एकामागून एक दोन तीन कु टुंबं आली असं कधीच झालं नाही. बहुधा त्यानी आपापसात समजुतीने कोणी कुठच्या गावात जायचं ते ठरलेलं असावं. सगळ्याच गावानी त्यांची वार्षिक नसे. काही गावात दोन किंवा तीन वर्षांनंतर ते पुन्हा जायचे. गावात मुक्काम असेतो दुवक्त डोंबाऱ्याचे कुटुंबीय आसपासच्या वाड्यांमध्ये घरोघर फिरून अन्न मागून आणत असत, नी गावातले लोक त्याना काही ना काही अन्न घालीत.

आमच्या गावात भावकादेवीच्या मंदिरा मागे शेतमळ्यांमध्ये त्यांचे खेळ होत. मी राजापूर तालुक्यात नाणार गावात नोकरीला असताना तिथे

चिंचेच्या महाकाय वृक्षाजवळ नाडे घोरपी खेळ करीत म्हणून त्या चिंचेला घोरीप चिंच म्हणत. नाडे घोरपी गावात आले की ढोलकं वाजवीत गावभर फिरून खेळाची वर्दी देत. त्यांचा खेळ होत त्याला घोरपी असं म्हणत. लोकं 'उद्या घोरपी हा' किंवा 'दोपारी कोलाटी इलेहत' अशी बातमी एकमेकाना सांगत असत.

गावच्या उत्सवात कीर्तनामध्ये एकदा कामतेकर बुवानी लाख्या कोल्हाट्याच्या मुलीवर फिदा झालेल्या राजपुत्राची गोष्ट सांगितली होती. एका डोंबारणीचा खेळ पहाताना त्या राज्यातला राजपुत्र तिच्या सौंदर्यावर फिदा होतो. तो तिच्या बापाकडे तिला मागणी घालतो. पण तिचा बाप लाख्या दूरदर्शीपणाने राजपुत्राच्या सत्ता संपत्तीच्या मोहाला बळी न पडता त्याला उपजिवीकेचं साधन असलेली आपली 'घोरीप' विद्या अवगत केलीस तरच मी तुला माझी मुलगी देईन अशी अट घालतो. कामातुर झालेला राजपुत्र मागचा पुढचा विचार न करता लाख्याचं आव्हान स्विकारतो. पुढे तो मोठ्या जिद्दिने घोरीप विद्या शिकतो. लोकांसमोर खेळ सादर करून आपलं कसब प्रमाणितही करतो. पण अट पुरी केल्यावर मात्र त्याला उपरती होते.आपण एका य:कश्चित डोंबारणीच्या प्राप्तीसाठी हे दु:साहस करून मोठी चूक केली असा पश्चात्ताप होतो नी डोंबारणीचा त्याग करून तो निघून जातो, अशी ती कथा असते.

त्यावेळी मराठी शाळा दुवक्त भरत. गावात घोरीप असेल त्या दिवशी अडीज वाजता दुपारची शाळा भरली की हजेरी घेतल्यावर लगेच शाळा सोडीत असत. मग आनंदाने आरोळ्या मारीत आम्ही नाडे घोरीप होई त्या ठिकाणी जात असू. तीन वाजेतो लोकं जमत असत नी गर्दीचा अंदाज घेवून ढोलकं वाजवीत खेळ सुरू व्हायचा. एका डोंबारी कुटुंबात नवरा बायको

त्यांची मुलं क्वचित एखादा तरूण भाऊ नी म्हातारा म्हातारी असत.आरंभी लहान पोरांचे खेळ होत, छत्रीच्या जुन्या कापडाला वरच्या टोकाला शिंगचोच्या- धनेशाची चोच बांधून त्यामागे डोक्या सारखा चपट आकार करून त्यावर चुन्याने डोळे रेखलेले असत. दोन बाजूना शिंगचोच्याची पिसं शिवलेली असत. ती खोळ पांघरून एक पोरगी गरूड होई (कोकणातले लोक शिंगचोच्याला गरूड म्हणतात) त्याचं नी दुसऱ्या पोराचं भांडण होई नी मग दोघांची कुस्ती चांगलीच रंगत असे. त्यावेळी गरूड झालेली पोरगी गरूडा सारखे प्यांऽऽक प्यांऽऽक असे आवाज काढून दाखवी. कुस्ती खेळताना गरूड घायाळ झाला की डोंबारी मध्ये पडत "ह्यां काम लई वंगाळ क्येलास.... पुन्नारुपी गडुराला मारशील तर मी तुला मारील " म्हणून दटावी. त्याची नजर चुकवीत पोरगा पुन्हा पुन्हा गरुडाला झट्या मारीत राही नी गरूड मोठमोठ्याने ओरडत मेल्याचे सोंग करी.

मग वेगळा खेळ सुरू होई. एक पोर वीतभर फळकुटाचा तुकडा रशीने गळ्यात टांगून छातीवर थोपवीत, हवेत उंच उडवून पडणारा दगड त्यावर झेलून फोडून दाखवीत असे. त्याला चिडवीत घोरीपवाला म्हणे, "ह्यां काम लय सलप्या (सोपं) ह्या तुज्या कामावर कोन मुतणार पण नाय....दुसरा कायतरी चांगला ख्येळ करून दाकव." पोरगा हवेत कोलांट्या उड्या मारी, माना हालवीत डोंबारी म्हणे "ह्याबी काम सलप्या" मग एकजण हातात लोखंडी कडं धरून राही नी पोरगा धावत येऊन त्या कड्यातून सूर मारी नी लोकं टाळ्या वाजवीत. आता डोंबारी ढोलकी वाजवून "हां ह्या ब्येस" म्हणे. पोरगा मग पेटत्या कड्यातून सूर मारी. लोखंडी कडं घालून पोरगा ओणवा राही नी राहिलेल्या चिंचोळ्या फटीतून दुसरा मुलगा किंवा मुलगी शिकस्तीचे प्रयत्न करून आरपार जाई.

काही वेळा एक बोकड आणून दोन पायावर चालवून दाखवीत. समोरून धावत येणाऱ्या बोकडाच्या दिशेने मोठा दगड फेकता की बोकड त्याला टक्कर मारून तो दगड फोडी. बोटाएवढ्या जाड सळीच्या एका टोकाला दुधारी फण केलेला असे. डोंबाऱ्याची बायको किंवा भाऊ त्या सळीच टोक जमिनीला टेकवून फणाच्या पात्याचं टोक गळ्याला टेकवून जोर देवून सळी वाकवून दाखवीत.डोंबारीण एका लांबकाठी खांद्यावर उभी करी नी पोरगा त्यावर चढून दाखवी. मग ती काठी हनुवटीवर तोलून, कधी कपाळपट्टीवर तोलून धरी नी मुलगा त्यावर चढे. काठी हातापायाच्या पंज्यात पकडून शरीराची कमान करून दाखवी. बघ्यांच्या काळजाचा ठोका चुकेल अशा अनेक शानती दाखवल्या जात.

काही वेळा थक्क झालेले प्रेक्षक भाना हरपून टाळ्या वाजवायचंही विसरत, अशावेळी डोंबारी उड्या मारीत टाळ्या वाजवी नी मग भानावर आलेले प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करीत. या कसरतींना हमखास बक्षीस मिळत असे. नी नोट देणाराना त्यांचं नाव विचारून त्यांच्या नावाची पुकारणी डोंबारी करायचा. यात मोठेपणा वाटणारे लोक एकाची पुकारणी सरू असताना नोट पुढे ना करता जरा वेळ थांबून डोंबाऱ्याला खुण करून जवळ बोलावून घेत. अधून मधून प्रेक्षक एखाद्या खेळावर खुष होवून रुपया दोन रुपये पुढे करीत.

डोंबारी नोट घेवून त्याला नावा विचारी नी नोट हवेत फडकावीत लक्षुमण घाडी लक्षुमण घाडी असा त्या माणसाच्या नावाचा पुकारा करीत हातातली थाटली थडाथडा छाती पोटावर आदळीत उड्या मारून दाखवी. आता नाड्यावरचा खेळ सुरू होई. डोंबारीण किंवा तिची मुलगी दोरावर चढून हातात तोल सावरण्यासाठी हलकी पोकळ काठी घेवून चालून

दाखवी. पायाचे आंगठे नी बोट यात दोर घट्ट पकडून हेलकावे घेवून दाखवी. त्यावेळी ढोल वाजवायची गत अंगावर काटा उभा राहील अशी भीषण असे. या खेळाच्या वेळी डोंबारी चार पाच वर्षापाठी आपली पोरगी किंवा बहीण खाली पडून कशी दगावली हे सांगून बिक्षसी मागायचा. क्वचित कोणी पोरगा किंवा डोंबारीण दोरीवर उलट सुलट कमान उड्या मारून दाखवायचे. काहीवेळा दोरीवर स्टूल ठेवून त्यावर वेगवेगळ्या अवघड कसरती करून दाखवायचे. काहीवेळा ॲल्युमिनीयमची थाटली दोरीवर ठेवून त्यात बसून घसरून दाखवीत असत .



सगळ्या खेळात ढोलकं वाजवणं नी कोलांट्या उड्या मारीत बघ्याना हसव्णं या खेरीज मुख्य डोंबाऱ्याने कोणताही कसरतीचा खेळ दाखवलेला नसायचा. त्याचा एकच पण सर्वात वरकडी थरारक खेळ अगदी शेवटी असे. त्याच्या पाला जवळ असलेल्या आकाशावेरी उंच गेलेल्या चिंचेच्या

नाहीतर अष्टाच्या झाडाला अगदी शेंड्यात दोरी बांधून दुसरं टोक जमिनीवर खुंटी ठोकून तिला ताणून बांधलेलं असायच. तिकडे निर्देश करीत डोंबारी म्हणे, "मायबाप, आता हा शेवटचा ख्येळ बगा. आता मी ह्या झाडावर चडनार आनी ह्ये रशीवर पालथा ऱ्हावून विमानावाणी खाली येनार. हा खेळ लई धोकेबाज.....ह्यातून जगलो तर खुशी म्हनून शेला पागोटं बांधा.... नी नाही जगलो तर हात सोडून शेर मापटं माज्या पोराबाळांच्या पदरात घाला नी त्येंना जगवा."

आता त्याची बाईल ढोलकं वाजवू लागे नी डोंबारी खुंटीला बांधलेली दोरी सोडवून ती पुन्हा नीट ताणून बांधी. मग ॲल्युमिनीयमची थाटली घेऊन डोंबारी झाडावर चढे. दोरीच्या शेवटाला पोचल्यावर थाळी वाजवीत बघ्याना साद घाली, "मायबाप, एकडाव माज्यासाटी जोरदार टाळ्या वाजवा. आता माजा कसब नीट बगित ऱ्हावा, ह्ये रशीवरून माजा विमान खाली येनार..... देवान वाचवला तर धरणीवर नाहीतर वर इंद्रदेवाच्या पायाशी सगात....." मग हातातली थाटली दोरीवर ठेवून ती पोटाखाली येईल अशी दक्षता घेत पालथा झोपे. जय बजरंग बली....जय खंडेराया असा गजर रशीवर कापड्याची घडी ठेवून एका हाताने पुढच्या बाजूला नी दुसरा हात मागे नेवून मागच्या बाजूला रशीवर पकड घेई नी इशारत करी. आता ढोलक्याचा अंगावर शहारे आणणारा तो विशिष्ट आवाज सुरू होई नी डोंबारी घसरत जमिनीकडे येऊ लागे. बघे श्वास रोखून डोळ्यात प्राण आणून एकटक बघीत असत. डोंबारी वाव दोन दोन वाव मंद गतीने येई नी अकस्मात जय खंडेराय म्हणत प्रचंड वेगाने घसरू लागे. निमिषाधात जमिनीपासून वाव दोन वाव अंतर उरल्यावर छलांग मारून जमिनीवर उभा

रहात असे. हे सगळं असं काय विद्युत् वेगाने होई की प्रेक्षक चकित होऊन आ वाशीत बघतच रहात.

कमरेत झुकून सलाम करीत डोंबाऱ्याने टाळ्या वाजवल्या की मग मात्र भानावर आलेले बघ्ये टाळ्यांचा कडकडाट करीत असत . आता खिशांतला पै पैसा अखेर पर्यंत राखून ठेवलेले लोक खिशात हात घालून तो बाहेर काढीत नी डोंबाऱ्याच्या थाळीत टाकीत. दुसरे दिवशी डोंबाऱ्याचे कुटुंबीय वाडी वाडीवार फिरून पै पैसा, शेर मापटं लोक खुशीने काय देतील ते पदरात घेई. गावचे सरपंच, खोत, धनिक, तालेवार यांच्या घरी डोबारी स्वतः जात असे. हे लोक हात सोडून पैशाच्या नाहीतर धान्याच्या रूपाने बक्षिसी करीत. गाव फिरून तळावर वापस आल्यावर काचकी बोचकी गुंडाळून नाडेघोरपी पुढच्या मुक्कामाकडे कूच करी.

मी हायस्कूलला मुख्याध्यापक असताना त्या गावात नाडे घोरीप आलं. मी त्यांचे खेळ बघण्यासाठी शाळा लौकर सोडली. तसेच आम्हा स्टाफ ने १०१ रुपयांचं पाकीटही बक्षिसादाखल घेवून आम्ही सव्व स्टाफ मेंबर खेळ बघायला गेलो. मी सर्व संस्था पदाधिकाऱ्यांनाही आग्रहपूर्वक यायचा निरोप दिला होता. खेळ व्हायचा होता त्या मैदाना जवळ आमचे एक मेंबर रहायचे. त्यांनी आम्हाला बसण्यासाठी एका बाजूला बाकडी, खुर्च्या मांडून घेतल्या होत्या. खेळ संपले आणि डोंबाऱ्याला द्यायचं बक्षिसाचं पाकीट अध्यक्षांकडे दिलं. त्यांनी आणि अन्य संस्थामेंबर्सनी त्यात आणखी भर घातली. आमच्या सारख्या उच्चभ्रू माणसांनी त्याच्या कलेची कदर केली म्हणून तो अगदी भारावून गेला होता. घरी परत जाताना स्टाफमेंबर्सपैकी कोणीतरीदत्तदास घाग बुवांच्या “लाखा कोलाटी” आख्यानावर आलेल्या कॅसेटचा संदर्भ दिला.

त्यांच्या संग्रही ती कॅसेट होती. मला तत्क्षणी मी पूर्वी ऐकलेलं कीर्तन आठवलं. ती कथा माझ्या मनात कायम घर करूनच राहिलेली होती. लाखा आणि राजपुत्र यांच्या संदर्भात काही प्रश्न माझ्या मनात रुंजी घालीत राहिलेले होते. कदाचित घाग बुवांच्या आख्यानात मला काही वेगळा अन्वयार्थ सापडेल म्हणून मी त्याच पावली त्यांच्या कडून ती कॅसेट मागून घेतली. घरी गेल्यावर मी घाग बुवांच्या कीर्तनाचे कॅसेट लक्षपूर्वक ऐकली. मी पूर्वी ऐकलेल्या कीर्तनात, कामतेकर बुवांनी सांगितली होती त्यापेक्षा जरा वेगळ्या धाटणीने घाग बुवांच्या आख्यानात कथेची मांडणी होती. पण घाग बुवांच्या कीर्तनातही मला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं मिळाली नाहीत.

राजपुत्राने लाख्याच्या मुलीला मागणी घातल्यावर लाख्याने त्या राजपुत्राला घोरपी विद्या शिकायची विचित्र अट कां बरं घातली असेल? सामर्थ्यशाली राजपुत्राने सत्ताबळाने किंवा डोंबाऱ्याला धनलोभ दाखवून त्याच्या कन्येची प्राप्ती करणं शक्य असूनही ते न करता जीवावर उदार होवून डोंबाऱ्याच्या अटीला बळी कां पडावं? अत्यंत निधाराने घोरपी विद्या अवगत करून ती अवघड अट पुरी केल्यावर मात्र राजपुत्राला आपण चूक केली असं कां वाटलं? राजपुत्राला उपरती झाल्यावर लाख्याच्या कन्येचा मोह सोडून निघून जाण्याच निर्णय त्याने का घेतला? तो निघून जात असता त्याला अडवून आपल्या कन्येचा स्वीकार करायला भाग पाडणं लाख्याला शक्य होतं नी ते रास्तही होतं. त्यात डोंबाऱ्याच्या मुलीचं हितच होतं. कोणत्याही पित्याने तेच केलं असतं. पण लाख्या निर्विकल्पपणे राजपुत्राला कां जाऊ देतो? बुवांच्या कथेत मला या कथांची सयुक्तिक उत्तरं मिळाली नव्हती. पुढे खूप वर्षांनी जी.ए. कुळकर्णींची विदुषक कथा मी वाचली. ही कथा वाचायची ती काही पहिलीच वेळ नव्हती. मी असंख्यवेळा ती

वाचलेली होती. पण यावेळेला ती वाचल्यावर मात्र परिणाम स्वरूप लक्ष दिव्यांचा झगमाट व्हावा तद्वत अकस्मातपणे लाख्या नी राजपुत्र यांच्या निर्णयामागची कारण मीमांसा माझी मलाच आपोआप उलगडत गेली.

मी विचार करायला लागलो की, राज्याचा वारसदार असलेल्या राजपुत्राची राणी होवून आपली लेक ऐश्वर्यात लोळणार हे त्या लाख्याला कसे काय सुचले नाही? सर्वसामान्य लोक तर वैभव, सत्ता, संपत्तीच्या मोहापायी पाचवे- सहावेपणावरही आपल्या लेकी बाळी राजाला देत असत. असा तो काळ. राजा म्हातारा असला तरी आपली चिमुकली राजस-बाळीसुद्धा त्याला अगदी बिनदिक्कत देत. इथे तर तरणाबांड राजपुत्र मागणी घालायला आलेला असतो. पण साकल्याने विचार करता समाज चक्राचा एक घटक या नात्याने आपली पारंपरिक कला कौशल्य, घोरपी विद्या टिकवणं, संवर्धन करणं हे आपलं आद्य कर्तव्य आहे. याचं भान लाख्या कोल्हाट्याला होतं. आपली ज्ञाती विद्या आत्मसात केलेली आपली कन्या वैभवाच्या, सत्तेच्या लालसेने राजपुत्राला दिली तर महान समाज परंपरेचा, संकेताचा भंग आपल्याकडून होईल हे त्याच्या लक्षात आलेलं होतं. सत्ता संपत्तीच्या मोहापायी घोरीप विद्या शिकलेली कन्या राजपुत्राला देवून तिने आत्मसात केलेल्या कसबाचा ऱ्हास होवू देणं अयोग्य आहे. असा पायंडा निदान आपण तरी पाडायचा नाही हाही लाख्याचा हेतू होता.

सौंदर्याच्या बळावर एक डोंबारीण सम्राज्ञी पदापर्यंत पोहोचलीच तरी साम्राज्ञी पदाच्या जबाबदाऱ्या सांभाळण्यात ती कितपत यशस्वी होईल याची शाश्वती दुनियादारी केलेल्या लाख्याला वाटत नव्हती. सौंदर्याच्या क्षणिक मोहाला बळी पडून ज्ञाती- कुल कशाचाही विचार न करता राजपुत्र डोंबारणीचा स्वीकार करू इच्छित होता. पण त्याची इच्छापूर्ती झाल्यावर,

सौंदर्यवतीच्या प्राप्तीचा उन्माद ओसरल्यावर राजपुत्राला ती नकोशी वाटू शकते, नी तसं झालं तर कन्येच्या आयुष्याची क्षणात राख रांगोळी होवू शकते, नी ही भवितव्यता आपण बदलू शकणार नाही आणि स्वीकारूही शकणार नाही हे तो पुरते ओळखून होता. म्हणून लेकीला राणी बनविण्याऐवजी तिचं भविष्य सुरक्षित राखण्यासाठी राजपुत्रालाच डोंबारी बनवायचा व्यवहार्य पर्याय त्याने मोठ्या धूर्तपणे निवडला. मात्र हे करतानाही कदाचित आपली ही शंका खोटी ठरेल. कारण राजपद प्राप्त झाल्यावर, ते अंगवळणी पडलं की त्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्या निभवण्यात निसर्ग क्रमाने ती निष्णात होईलही.....

ते काही फार अवघड होतं असं नाही. कारण पाण्यात पडल्यावर पोहोता येणं, हा निसर्गनियम आहे. सत्ता आली की त्या व्यक्तीचं कर्तृत्व आपोआप बहरू लागतं. असं असता कन्येचं भवितव्य बदलून टाकणारी, डोंबारी ज्ञातीच्या पाचवीला पुजलेली वणवण आणि दैन्य क्षणात दूर करणारी, एका य:कश्चित डोंबारणीला वैभवाच्या शिखरावर,राज्ञीपदावर नेणारी, ही दैवदुर्लभ सुवर्ण संधी नको त्या दळभद्री शंकेच्या आहारी जावून घालवून बसणं हा आपला करंटेपणा आहे. कन्येला तिच्या सौंदर्य सामर्थ्याच्या स्वबळावर राजवैभवाची प्राप्ती होवू घातलेली असताना भलत्याच शंका कुशंका काढून आपण तिच्यावर अन्याय करत आहोत असा एक विचारही लाख्याच्या मनाला स्पर्शून गेला.

अशी द्विधा अवस्था निर्माण झाल्यावर धूर्त राजकारणी मुत्सद्दीपणे निर्णय प्रलंबित ठेवून सखोल विचार करायला थोडा अवधी घेतात. राजकुमाराला अट घालण्यात लाख्याचाही तोच कुटिल हेतू होता. कदाचित सुखांगी राजपुत्र अटीला घाबरून त्याने माघार घेतली तर सुंठी वाचून

खोकला गेला असता. कदाचित त्याने ही अट पूर्ण करण्याची तयारी दर्शवली असती तरीही हे कार्य त्याची सत्वपरीक्षा घेणारे आहे याची लाख्याला पूर्ण कल्पना होती. त्याच्या ज्ञातीत मूल अगदी लहान असल्यापासून ही विद्या शिकवली जाते कारण बालवयात विविध अवयव वळविण्याची, ना कळतेपणी जीवावर उदार होवून वाटेल ते दु:साहस बेदरकारपणे करण्याची सवय जडवणे सोपे असते. या ठिकाणी राजपुत्र पूर्ण वाढ झालेला निबर, शिवाय कष्टाची, अंगमेहनतीची सवय नसणारा. तो कालत्रयी घोरपी विद्या शिकू शकणार नाही. विशिष्ट मुदतीत अट पुरी झाली नाही तर त्याचा अडसर आपोआप दूर होईल असा दूरदर्शी विचार लाख्याने केलेला होता. त्याच बरोबर राजकुमाराची मागणी ही एक प्रकारची आपत्ती आहे असेच लाख्याला वाटत होते. हा भविष्यात तो आपल्या कह्यात राहणार नाही हे लाख्या ओळखून होता. म्हणून राजवैभवाचा मोह त्याला भुरळ पाडू शकला नाही. फक्त थेट नकार देऊन राजक्षोभाला बळी पडू नये यासाठी त्याने घातलेली अट ही एक कुटील खेळी होती.

एक जबाबदार सुसंस्कारी राजपुत्र जिगरबाजपणे डोंबाऱ्याची अट हे आव्हान समजून घोरीप विद्या अवगत करतो. आपली कला- कसब डोंबाऱ्याला दाखवीत असताना जीवावर बेतणारा एक क्षण येतो. राजपुत्र आपल्या कसबाने त्यातून सुरक्षित बाहेर पडल्यावर मात्र राजपुत्राला उपरती होते. एका क्षूद्र य:कश्चित डोंबारणीसाठी आपल्या सारख्या वैभवसंपन्न राजपुत्राने जीवाची बाजी लावावी हे कितपत योग्य? असा प्रश्न त्याला पडतो. सौंदर्याच्या मोहाने, कामातुर होवून आपल्या सारख्या सुसंस्कारीत राजपुत्राने सारासार विवेक बुद्धीही गहाण टाकावी याचा त्याला पश्चात्ताप

होतो. त्याक्षणी आपल्याला अट घालण्यामागचा लाख्याचा धूर्त कावा त्याला पुरता उमगतो. नाड्यावरून खाली उतरल्यावर तो बाणेदारपणे डोंबाऱ्याला सांगतो की, "तु घातलेली अट मी पूर्ण केली आहे. क्षणिक मोहाला बळी पडून माझी बुद्धी भ्रष्ट झाली होती. पण आता मी ताळ्यावर आलो आहे... तुझ्या मुलीबद्दलची मला वाटणारी ओढ आता संपली... तू आपल्या लेकीसाठी घोरपी विद्येत निष्णात असलेला एखादा स्वजातीय तरुण शोध. मी ईष्येला बळी पडून कसबी डोंबारी बनून दाखवलं. पण तुझी मुलगी माझी अर्धांगिनी बनून मी ज्या साम्राज्याचा स्वामी बनणार आहे, तो राजशकट चालवण्याच्या कामी मला साथ देण्यात कितपत समर्थ ठरेल याबद्दल माझ्या मनात संदेह आहे.

तू आपल्या मनातला संदेह दूर करण्यासाठी माझी कठोर अग्नि परीक्षाच घेतलीस. पण मी ते करणार नाही. माझ्या मनातला संदेह दूर करण्यासाठी मी तिची परीक्षा घेवून तिला त्रास देणार नाही. कदाचित ती आपला वकुब सिद्ध करू शकली नाही तर कायम भळभळणारी जखम तिला आयुष्यभरासाठी दिल्याचं दुःख मला सलत राहील. तू दिलेले अशक्य वाटणारे आव्हान स्वीकारून मी त्यावर मात केली. कारण राज्यकर्त्याला

उपजत प्राप्त होणारे कोणतेही आव्हान स्वीकारण्याचे धाडस निसर्गत:च मला लाभलेले आहे. तुझी अट मी निर्धाराने स्वीकारली नी विजिगीषू महत्त्वाकांक्षेने अपार कष्ट सोसून ती पूर्णही केली. राजघराण्यात जन्माला आलेल्या कुणालाही त्यात काही मोठेसे अप्रूप वाटणार नाही. कारण राजभोग हा केवळ ऐश्वर्य आणि सुखविलासी जीवनक्रम नाही. उपभोगाच्या प्रत्येक क्षणी असीम त्यागासाठी आणि प्राणाची बाजी लावायला सिद्ध राहण्याचा निरीच्छपणा राजपुरुषाकडे असावाच लागतो.

इच्छा प्रबल असेल तर सामर्थ्यवान माणूस कोणतेही आव्हान पेलू शकतो. या न्यायाने तुझे आव्हान मी स्वीकारले. त्यामागे एका सौंदर्यवतीची प्राप्ती ही प्रेरणाहोती.तुझ्या कन्येच्या मनात मात्र राजपुत्राची प्राप्ती ही इच्छा असणेही संभवत नाही. माझा स्वीकार ती सत्ता, वैभव, ऐश्वर्य किंवा कदाचित अपरिहार्यता म्हणून करीलही. पण या गोष्टी विजिगीषू प्रेरणा नाही बनू शकत. तात्पर्य मला माझी अर्धांगिनी म्हणून एखाद्या राजकुलातली उपजत राजस गुण प्राप्त असणारी सुसंस्कारी राजकन्याच मिळविली पाहिजे. दुसरे म्हणजे तुझी घोरीप विद्या मी शिकलो असलो तरी मला उपजीविकेसाठी नाडे घोरपाचे खेळ करीत गावोगाव भटकंती करण्याची जरुरी नाही. कदाचित मला घोरीप विद्या अवगत करण्याची अट घालताना ती प्राप्त केल्यावर तिचीच साधना करून तुझ्या अंकित राहून मी उर्वरित आयुष्य कंठीन अशी तुझी सुप्त इच्छा असेल तर ती मी कालत्रयी पूर्ण करणार नाही. भविष्यात माझ्या हाती अनिर्बंध सत्ता संपती आली तरीही माझा श्वशुर म्हणून तुझ्या चरितार्थाची तरतूद हे माझे आद्य कर्तव्य म्हणून मी स्वीकारणार नाही. तशी रुढी किंवा धर्मसंकेतही नाही. किंबहुना

कन्यादान केल्यावर कन्येवरचा तुझा हक्कच संपला. मी घोरीप विद्या आत्मसात केली याचा अर्थ तुझी जीवनशैली स्वीकारली असा नाही.

आव्हान संपल्यावर त्यातला फोलपणा माझ्या पूर्णपणे ध्यानात आला आहे. आता मी पूर्णपणे भानावर आलो आहे. तुझ्या कन्येचे सौंदर्य हे एकमेवाद्वितीय आहे असे नाही आणि तिचे सौंदर्य हा काही सुंदरतेचा एकमेव मापदंड नाही. हे उशिराने कां असेना? मला उमजले आहे. एका वैभव संपन्न राजघराण्याचा वारस म्हणून अभिषिक्त सम्राट होऊन राज सिंहासनावर विराजमान होणं हे माझं आद्य कर्तव्य आहे. स्त्री सौंदर्याच्या मोहापायी मला माझ्या निहित कर्तव्याचा विसर पडला होता." राजपुत्राची स्पष्टोक्ती ऐकल्यावर पुढे काही बोलण्यासारखे उरलेच नव्हते. आपण त्याला पारखण्यात उणे पडलो याची खात्री पटून लाख्या कोल्हाट्याची नजर शरमेने खाली झुकली.

नाडे घोरपाचा खेळ ही शिव-शक्तीची लीला आहे असेही मानणारा एक मतप्रवाह आहे. अशा आशयाची काही गीते लाख्या कोल्हाट्याचे चरित्र मांडताना कीर्तनकार गाऊन दाखवतात. डोंबारी नी त्याची पत्नी ही शिव आणि शक्ती यांची रूपे असून दोघेही अवघड कसरत करताना परस्परांसाठी प्रेरणा स्रोत बनत असतात. तसेच जीवावर बेतणारा अवघड कला विष्कार यशस्वीपणे साकार करण्यासाठी अवधानावर चित्त केंद्रित करण्यासाठी एकाग्रता टिकवून धरायला ढोलकीचा प्रोत्साहनपर नादध्वनी साथीदार निर्माण करीत असतो. त्या दृष्टीने विचार करता नाडे घोरीप हा शिव आणि शक्तीचा संगम आहे ही उपपत्ती मला अधिक सयुश्क्तिक वाटते.

०६. चाकरमानी

१९६०/७० च्या दशकात एकत्र कुटुंब पद्धती होती. कुटुंबं मोठी असायची. माझ्या काही मित्रांना दहा-अकरा तर काहींना चौदा भावंडं असत. सख्खे चुलत भाऊ एकत्र असत त्या एकेका कुटुंबात मोठी माणसं आणि पोरं धरून तीस-चाळीस पर्यंत माणसं असायची. प्रत्येक कुटुंबातील किमान एक तरी बाप्या मुंबईत नोकरीला असायचा. त्याला चाकरमानी म्हणत. हे चाकरमानी मुंबईला सूत गिरणीत, हॉटेलांमध्ये वेटर, एखाद्या कंपनीत हेल्पर / ऑफिस बॉय, पारशी-गुजराती कुटुंबांमध्ये घरगडी अशा छोट्या-मोठ्या नोकऱ्या करीत. काही लोक गोदीत, कोणी पोलिसात तर कोणी म्युनिसिपालिटीत नोकरी करीत. हॉटेल किंवा कंपनीत असलेले नोकरदार तिथेच निवास करीत. मोठ्या शेठ लोकांकडे कामाला असणाऱ्या नोकरांसाठी आऊट हाऊसमध्ये एखादी रूम असे. त्यात ऑफिस बॉय, घरगडी, वॉचमन एकत्र राहत. काही लोक पाच-सहा जणांचा ग्रुप करून एकत्रात लहानशी भाड्याची खोली घेऊन राहत. जेवण स्वतः रांधून खात. अत्यंत काटकसरीने राहून दरमहाच्या मिळकतीतून जास्तीत जास्त रक्कम गावी घरखर्चासाठी पाठवीत.

चाकरमान्यांचे लग्न झालेले असले तरी मुंबईत बिऱ्हाड करण्याइतपत आमदनी नसल्यामुळे त्यांच्या बायका गावी एकत्र कुटुंबातच राहत असत. चाकरमानी वर्ष-सहा महिन्यांनी गणेश चतुर्थी, शिमगा अशा सणासुदीला किंवा पावसाळ्यात मृगाच्या टायमाला शेतीभातीच्या कामात

मदतीला म्हणून महिना-पाऊण महिना रजा घेऊन गावी येत असत. अर्थात नोकरीत जातु (कायम) झाल्याशिवाय रजाचे लाभ मिळत नसत. हे चाकरमानी कुटुंबाचे पोशिंदे असल्यामुळे कुटुंबातले लोक त्यांना आदर-सन्मानाने वागवीत असत. जे लोक नववी-दहावी मॅट्रिक (जुनी ११ वी) शिकलेले असत त्यांना त्यातल्या त्यात बऱ्यापैकी पगारमिळे. शिकलेले लोक हॉटेलं, दुकानं वगैरे व्यावसायिकांकडे गल्ल्यावर बसत असत. काही लोक कारकून म्हणून ऑफिसमध्ये, युनिव्हर्सिटीत, बँकांमध्ये नोकरीला असत.

असे लोक चाळींमध्ये दोन खोल्या भाड्याने घेऊन बायको-बिऱ्हाड करून राहत. त्यातल्या त्यात बरी कमाई असणारे लोक चौघा-पाचजणांत मिळून बेताच्या दोन खोल्या भाड्याने घेत. सगळेजण आळीपाळीने आपापल्या बायकोला सहा-सहा महिने मुंबईत आणून बाळगीत असत. ती सर्वांना दुवक्त जेवण रांधून घालीत असे. अशा तत्त्वावरही कित्येक लोक राहायचे. गिरणीत काम करणाराना काही वर्षानंतर हमखास टीबी होत असे. रहाण्या जेवण्याची कमालीची आबाळ असलेले, सतत अवजड काम करणारे, गलिच्छ झोपडपट्टीत रहाणारे अशा कामगाराना सतत आजारपण यायला लागले, अन्नावरची वासना उडाली की मग हे लोक वर्ष सहा महिने विश्रांती साठी गावी येऊन रहायचे.

मुंबईत हलाखीचं जीवन जगणारे, कायम रात्रपाळी करणारे नोकरदार अशक्त होवून मरायला डेंगले की मग तब्बेत सुधारायला म्हणून पाचसहा महिने गावाकडे येत. त्यावेळी तब्बेत सुधारायला हुकमी उपाय म्हणजे पोत घेणे. हा एक अघोरी उपाय होता. गावातले वैदगिरी करणारे पोत देत असत. यात रुग्णाच्या दोन्ही मांड्यांवर ढोपराच्या वरती वीतभर

अंतरावर आतल्या बाजूला ढब्बू पैशाएवढ्या भागाची चामडी पेटत्या विडीने धगवून ती सोलून काढली जाई.त्या जित्या जखमेवर हळकुंडाचा चिंचोक्या एवढा तुकडा वरची साल काढून तो ठेवीत. त्यावर तांब्याचा ढबू पैसा ठेवून फडक्याच्या धांदीने घट्ट बांधीत. दोन्ही मांड्यावर आणि दोन्ही दंडांवर तर काही जणाना दोन्ही पोटऱ्यांवर अशा दोन पोती देत. काही जण दोन मांड्यांवर दोन आणि दोन्ही दंडांवर दोन अशा चार पोती घेत.

काहीजण दोन पोती घेत. पोत घेतली की रोजच्या जेवणात वातुळ पदार्थ खायला घालीत. त्यामुळे पोतीच्या जखमेतून हिवळ वास मारणारे पाणी वहात राही. ते शोषून घेवून जखमेवर दाबलेला हळकुंदाचा तुकडा आंग़ठ्या सारखा टरटरून फुगे. सुरुवातीच्या काळात जखमेवरचा हळकुंडाचा सकाळ संध्याकाळ बदलीत असत. मग जखम वहाणं कमी झालं की रोज सकाळी जखम सोडून जुना हळकुंडाचा तुकडा बदलावा लागे. जवळ जवळ तीनेक महिन्यानंतर जखमेतून येणारा स्त्राव हळू हळू कमी होत जाई . मग पट्टी बांधणे बंद करीत. पोतकरी पोत घेतलेल्या तीनेक महिन्याच्या काळात कमरेला फडका गुठाळून फिरत असे. पोत बंद केली

की, चार पाच दिवसात जखम आळून नवीन चामडी येई.या काळात मरायला डेंगलेला गडी तंदुरुस्त झालेला असे. आता त्याला कडकडावून भुक लागत असे. खाल्लेले पचत असे नी तब्बेत हुषार झालेली असे. आमच्या वाडीतले कितीतरी लोक तीन चार महिने पोत घेवून गावी राहून तंदुरुस्त होवून मुंबईला गेलेले माझ्या आठवणीत आहेत.

असेच एक गृहस्थ हरिभाऊ दांडेकर दादरला आदर्श दुग्धालयात कॅशियर होते. त्या मालकाचं गिरगाव कांदेवाडीत दुसरं हॉटेल असल्यामुळे इथला संपूर्ण कारभार हरिभाऊंवरच सोपवलेला होता. त्यांनी आपल्या गावाकडून जानशी-कुवेशीतून पाच-सहा नोकर आणून आपल्या हॉटेलात कामाला ठेवलेले होते. त्यांच्यापैकी एकेक जण आळीपाळीने दुपारी नी रात्री धुणी-भांडी अशी घरकामं करायला शेठच्या (हॉटेलचा खरा मालक क्वचित कधीतरी खेप करायचा. नोकर हरिभाऊंनाच शेठ समजत असत)हॉटेलचा व्याप वाढत चालल्यावर आपल्या मदती साठी गावाकडून आपल्या भाच्याला दामूलाच मुंबईला आणले. बाहेरची डिलिव्हरी, हॉटेलसाठी सामान खरेदी करी. दुपारी हरिभाऊ जेवायला घरी जात आणि जेवल्यावर दीड-दोन तास आराम करून मग परत येत. त्यावेळेत तो गल्ल्यावर बसे. हरिभाऊंनी हॉटेलसन्निध चाळीत तीन खोल्या घेऊन बिऱ्हाड थाटलेलं होतं. दामू त्यांच्याकडेच राही. हरिभाऊंच्या बिऱ्हाडाचं वाणसामानही हॉटेलच्या खरेदी सोबतच केलं जाई. त्यांची बायको येसूताई हॉटेलातून घरकामाला येणारे गडी भिकू, बाबजी किंवा भाचा दामू यांच्याकडे सामानाची यादी देई. मग वाण्याकडून हॉटेलाच्या खात्यावरून सामान खरेदी करून ते घरपोच होत असे.

त्याकाळी बरीचशी सुखवस्तू कुटुंबं घरदार बंद करून, गाव सोडून मुंबईत स्थायिक झालेली होती. त्याकाळी ब्राह्मण कुटुंबात नित्यपूजेत पंचायतन (गणपती-मूर्ती किंवा नर्मदेतला खडा, शिवलिंग, शाळिग्राम, अन्नपूर्णा, सूर्य) असे. गाव सोडून येताना हे देव त्यांनी सोबत आणलेले असत. सधन लोक एखाद्या ब्राह्मणाला महिना पन्नास ते साठ रुपये देऊन पूजेचा मक्ता देत. हरिभाऊंच्या चाळीत तळमजल्यावर लिमये राहत. त्यांचा मुलगा दिल्लीला फॉरेन कंपनीत मोठ्या हुद्यावर नोकरीला होता. हरिभाऊ प्रथम मुंबईत गेले तेव्हापासून लिमयांच्या देवांची पूजा ते करीत. पुढे दामू येईपर्यंत हा प्रघात होता. तो आल्यावर मात्र लिमयांकडची पूजा हरिभाऊंनी त्याच्यावर सोपवली. दामूच्या घरी कदन्न परिस्थिती होती पण दामू मुंबईत आला नी कुटुंबाला बरे दिवस आले. दामूचे लग्न लागले. त्याने लग्नपत्रिका लिमये काकांना दिल्यावर त्यांना फार आनंद झाला. त्यांनी शंभर रुपये आहेर दिला. शिवाय लग्न झाल्यावर बायकोला घेऊन आपल्याच बिऱ्हाडात संसार थाटायचा देकार दिला. त्यांचा मुलगा दोन-दोन वर्षात सुद्धा फेरी

मारीत नसे. लिमये उभयतांचे वय झालेले. त्यांना अनायासे संगत-सोबत झाली असती नी दामूची बायको राहायला आली तर दोन वेळच्या अन्नाचाही प्रश्न सुटला असता. दामूने लग्न झाल्यावर त्यांच्याकडे बिऱ्हाड थाटले. चार-पाच वर्षांनी लिमये काकू नी त्यांच्या माघारी वर्षभराने काकाही गेले. दामू नी त्याच्या बायकोने त्यांची आई-वडिलांसारखी सेवा केली. लिमयांनी आपल्या पश्चात बिऱ्हाडाची जागा दामूच्या नावावर करायचा कागद केलेला होता.त्याकाळी मोठमोठ्या पगारदारांना दादरसारख्या ठिकाणी स्वतःची जागा हे स्वप्न सुद्धा पडत नसे.

प्रिंदावणचा भास्कर बापट असाच कोणाकोणाच्या ओळखीने मुंबई गाठायच्या प्रयत्नात होता. त्याच्या वाडीतला अनाजी गुरव मंत्रालयात शिपाई होता. व्ही.टी. ला सरदारगृहात कोकणी पद्धतीचे जेवण करणारा चांगला स्वयंपाकी हवा होता. भास्करने त्याच्याकडे चौकशी केल्यावर अनाजी त्याला घेऊन मुंबईला आला. गावी भिक्षुकी करताना सत्यनारायणाचा प्रसाद,समाराधनेला पंधरा-वीस माणसांचे जेवण करण्याचा भास्करला अनुभव होता. मुख्य खानसाम्याच्या हाताखाली महिनाभरातच भास्कर चांगला वहिवाटला.भल्या पहाटे उठून आंघोळ नी देवदेवतार्चन करून मग तो कामाला लागे. अतिशय नीटनेटकेपणाने, स्वच्छ राही. इतर नोकर त्याच्याशी वचकून राहत.प्रामाणिक, विश्वासू म्हणून मालकाचीही त्याच्यावर मर्जी होती. भास्कर भोळसट होता म्हणून गुरवाने त्याचं बँकेत खातं उघडून दिलं होतं. दरमहा पगार झाल्यावर गरजेपुरते दहा-वीस रुपये आपल्याजवळ ठेवून बाकीची रक्कम बँक खात्यात शिल्लक टाकायचा दंडक घालून दिलेला होता. दोन-अडीच वर्षांनी भास्करचा पुतण्या अनंता मॅट्रिक पास झाला. रत्नागिरीला राहून कॉलेज

शिक्षण करण्याएवढी आमदनी नव्हती म्हणून तो मुंबईला चुलत्याकडे आला.

मालकाची भास्करवर मर्जी होती. दिवसा कॉलेज करून संध्याकाळच्या शिफ्टमध्ये साडेपाच ते रात्री बारा अतिथीगृहाचा काउंटर सांभाळण्याच्या अटीवर त्याने अनंताची महिना शंभर रुपये वेतनावर राहण्या-जेवण्याची सोय केली. अतिथीगृहात येणाऱ्यांची नोंद करणे यापेक्षा काउंटरवर मोठं काम नसे. अनंता अभ्यासाचं पुस्तक घेऊन वाचन करी. तो कॉमर्स साईडला होता. हॉटेल आणि अतिथीगृहाच्या हिशोबाचं काम मालकाने त्याच्याकडे दिलं. त्या कामाचे पैसे तो अलाहिदा देई. एस.वाय. ला गेल्यावर तो हळूहळू जवळपासच्या लहान-मोठ्या धंदेवाल्यांचे हिशोब ठेवायची कामं करून तो कमाई करायला लागला. तो सेकंड क्लास मिळवून बी.कॉम. झाला. मंत्रालयातल्या शिपायाने कोणाकोणाच्या ओळखी नी मध्यस्थ्या घालून त्याला स्टेट बँकेत चिकटवला. त्याला नशिबाने ग्रँट रोडच्या ब्रँचमध्येच पोस्टिंग मिळाली. बँकेची ड्युटी सांभाळून अतिथीगृहातला काउंटरही सांभाळायचा. कन्फर्मेशनसाठी डिपार्टमेंटल परीक्षा देण्याची अट होती. त्याप्रमाणे दीड वर्षाच्या भरीलाच तो डिपार्टमेंटल परीक्षेत पास झाला. कन्फर्म झाल्यावर स्टाफ क्वार्टर मिळाली. आता त्याची चिंता मिटली होती.

कोकणातली माणसं हुशार, कष्टाळू आणि प्रामाणिक म्हणून मुंबईत ख्याती असल्यामुळे मोठे मोठे धनदांडगे गुजराती, मारवाडी नी पारशी त्यांना आश्रय देत. मुंबईत स्थिरस्थावर झालेले कोकणातले लोक आपल्या नात्या-गोत्यातल्या, परिचयातल्या,गाववाल्या होतकरू मुलांना वाल्हाळीत असत. नाना लटपटी-खटपटी करून प्रसंगी पदरमोड करूनही त्यांना मदतीचा हात देत आणि पोटापाण्याला लावून देत असत. कोकणातली

बहुसंख्य मुलं कोणाकोणाची काष्टी धरून मुंबई गाठीत. मिळेल तिथे मिळेल त्याच्या आसऱ्याला राहत.कसलेही छंद-फंद न करता, लांड्या-लबाड्या न करता मालकाचा विश्वास संपादन करीत आणि स्वत:ही ऊर्जितावस्थेला येत.

मसुऱ्यातला सुरेश वायंगणकर अकरावीला इंग्रजी, गणित विषयांनी दगा दिला म्हणून नापास झाला. गावात राहून मुतात माश्या मारीत बसण्यापेक्षा मुंबई गाठून काहीतरी कामधंदा मिळवायचा सल्ला त्याच्या विधवा आईने दिला. त्याकाळी गणेश चतुर्थीला चाकरमानी गावी येत. त्यांच्या वाडीतला हाबुकाका परब आलेला होता. तो वांद्रे येथे बिऱ्हाड करून राहायचा. त्याला गळ घालून वायंगणकरणीने सुरेशला त्याच्या लगामी लावले. आईने जीव म्हणून साठवलेले पंचवीस रुपये घेऊन सुरेश मुंबईला गेला.

हाबुकाका रेक्लमेशन सोसायटीत सिक्युरिटी गार्ड होता. सोसायटीच्या कंपाऊंड वॉल जवळच्या वस्तीत पत्र्याच्या टपरीत तो राहायचा. रात्री सोसायटीच्या स्टोअर रूम बाहेर जिन्याखाली सुरेश झोपे. सकाळी दूध केंद्रावरून बाटल्या आणून द्यायच्या, सोसायटीतल्या साहेब लोकांचे इस्त्रीचे कपडे, कोणाचं किराणा सामान आणून द्यायचं, कोणाच्या मुलांना स्कूल बसमध्ये बसवून द्यायचे नी संध्याकाळी उतरवून घेऊन बिऱ्हाडी पोचवायचं अशी छोटी-मोठी कामं हाबुकाकाच्या ओळखीने मिळायला लागली. हाबुकाकाची पत होती. लोक हात सोडून पैसे द्यायची. दोन-तीन महिन्यांनी ड्राईव्ह इन थिएटरमध्ये डोअरकीपरचं काम करणारा हाबुकाकाच्या पाहुणेपणातला जगू पाडावे आलेला होता. त्या थिएटरमध्ये रोजचा कचरा उचलून टाकायचं तासाभराचं काम होतं. त्याचा हप्त्याला

पन्नास रुपये मोबदला मिळत असे. पूर्वी ते काम करणारी पोरगी लग्न होऊन गेली म्हणून नवीन कामगार पाहिजे होता.

सकाळी दूध बाटल्या पोचवून झाल्यावर सुरेशला मोकळीकच होती. त्याने हौशीने ते काम पत्करले. पहिल्या दिवशी साफसफाईचे काम करताना बिअरच्या बाटल्या, सोडा आणि इतर कोल्ड्रिंकच्या बाटल्या, रम, व्हिस्कीच्या बाटल्या असा गोणीभर ऐवज मिळाला. बिअर आणि कोल्ड्रिंकच्या बाटल्यांना नगाला दहा पैसे, पंधरा पैसे मिळत. तो सफाई करून बाटल्यांची गोणी घेऊन बाहेर पडला तेव्हा नेहमीचे बाटल्यांचं भंगार घेणारा आलेलाच होता. प्रतवारीप्रमाणे किंमत करून रोजचे पाच-सहा रुपये वरकड कमाई व्हायला लागली. सुरेशने महिना पन्नास रुपये फी देऊन इंग्रजी-गणितचा क्लास सुरु केला. तिथे क्लासचे शिक्षक व्यवस्थित तयारी करून घेत. दर आठवड्यात शिकवलेल्या भागाची परीक्षा घेतली जाई. सुरेशने बाहेरून फॉर्म भरला. दोन्हीही विषयांत पन्नास टक्क्यांच्या आसपास मार्क मिळवून तो पास झाला. सोसायटीतल्या चार-पाच बिऱ्हाडकरूंना ही वार्ता कळल्यावर लोकांनी त्याचं कौतुक करून त्याला पन्नास-शंभर रुपये बक्षीस दिलं.

ड्राईव्ह इनच्या मालकवर्गापैकी डाह्याभाई यांचं सगळ्या कामकाजावर बारीक लक्ष असे. सुरेश कामाला राहिल्यावर सगळा परिसर चकाचक असे ही बाब त्यांनी मार्क केली होती. सुरेश थिएटरमधल्या स्टाफला पास झाल्याचे पेढे द्यायला गेला. त्यावेळी डाह्याभाई आलेले होते. सुरेशने त्यांना पेढे देऊन नमस्कार केल्यावर त्यांनी त्याला बसवून घेतले आणि तो कोण कुठला, कुठे राहतो याची खडयानखडा माहिती विचारून घेतली. त्यांनी त्याला दोनशे रुपये बक्षीस दिले आणि संध्याकाळपर्यंत त्याचे

पालक हाबुकाका यांना सोबत घेऊन भेटीला यायला सांगितले. तीन वाजता हाबुकाकांना घेऊन सुरेश त्यांना भेटला. ते महिन्यातून दोन-तीन वेळा थिएटरवर येत असत. सगळा व्यवहार शर्मा नावाचे कुणी व्यवस्थापक पाहत असत. ते तिकीटविक्रीपासून तो सगळ्या व्यवहारात जबरदस्त खावडी काढीत असत. डाह्याभाईंच्या नजरेतून ही गोष्ट सुटलेली नव्हती. पण त्यांच्या गैरव्यवहाराची नेमकी माहिती नी तपशील त्यांच्या हाती लागत नव्हता. ते काम करण्यासाठी त्यांना शिकलेला, विश्वासू, चाणाक्ष मनुष्य पाहिजे होता. सुरेशची राहण्या-जेवण्यासह सोय करून मासिक तीनशे रुपये इतका भक्कम पगार त्यांनी देऊ केला. सोसायटीमध्ये त्याच्या बदली माणसाची व्यवस्था करून त्याला आठवड्याभरात कामावर हजर करायला त्यांनी सांगितले.

चार दिवसांनी चंबूगबाळं घेऊन सुरेश थिएटरवर आला. प्रोसिजरप्रमाणे सॉल्वन्सी बाँडसह रीतसर कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन सिनियर क्लार्क म्हणून त्याची नियुक्ती करण्यात आली. त्याला मस्टरवर घेतलेला होता. त्याला ऑफिसजवळ कंपनीच्या गेस्ट रूममधला एक-दोन खोल्यांचा फ्लॅट देण्यात आलेला होता.व्यवस्थापकांसह सगळ्याच लोकांच्या नजरेत तो खुपत होता. त्याला कोणकोणती कामं द्यायची याची लेखी ऑर्डरच डाह्याभाईंनी कंपनी सॉलिसिटरमार्फत दिलेली होती. आठवडाभर कंपनीच्या हिशोब तपासनीसांकरवी त्याच्यावर सोपवलेल्या हिशोबविषयक कामकाजाचं ट्रेनिंग देण्यात आलं. त्यांचा अकाउंटंट येऊन त्याने त्याच्या अखत्यारीत येणाऱ्या रेकॉर्ड्सचा चार्ज सुरेशकडे सुपूर्द केला. रोज सिनेमा शोच्या वेळी तिकीट विक्री करणं आणि डेली कलेक्शन त्याच्या अंडर होतं. शर्मांची मेजर कमाई त्यावर होत असे. त्यांनी पॅरलल चॅनेल

चालवलेला होता. थिएटरच्या ओरिजिनल तिकीटांसारखी पुस्तकं छापून घेतलेली होती. सुरेशने चार्ज घेतला त्याच दिवशी व्यवस्थापक शर्मांना पहिला दणका मिळाला.

त्यांनी सुरेशला भेटून रोज निम्मे डुप्लिकेट आणि निम्मे ओरिजिनल तिकीटं विकायचा प्रस्ताव दिला. यासाठी निम्मे भागीदारी देऊ केली. पण या गोष्टीला त्याने साफ नकार दिला. तो प्रलोभनाला बळी पडत नाही म्हटल्यावर अगदी खालच्या पातळीवर जाऊन त्यांनी धमक्या दिल्या. पण सुरेश बधला नाही. आता डेली कलेक्शन वाढायला लागलं. डाह्याभाईंनी पुरती मोर्चेबांधणी केलेली होती. दुसरे दिवशी कॅश भरणा झाल्यावर बँकर्सनी डाह्याभाईंना फोन करून फिगर सांगितली. शर्मांनी काही वेडीवाकडी पावलं टाकली तर सुरेशला धोका होऊ नये म्हणून त्यांनी पोलीस उपायुक्तांना फोन करून थिएटरवर चोवीस तास बंदोबस्तासाठी दोन पोलीस तैनात करायला सांगितले. ड्युटीवरच्या पोलिसांनी सुरेशशी संपर्क ठेवून राहायची सूचना दिलेली होती. त्याप्रमाणे गस्तीचे पोलीस आल्यावर त्यांनी सुरेशशी ओळख काढली. त्यांच्यातला एक जण वेंगुर्ल्याचा होता. गस्तीचं काहीच काम नसल्यामुळे ते कायम सुरेशच्या टेबलजवळच बसून राहायचे. त्यामुळे शर्मांची चांगलीच गोची झाली.

सिनेमाचा शो सुरू असताना सुरेश पोलिसांनी ून सोबत घेऊन रुबाबात फेरी मारायचा. येणारे लोक मोठमोठ्या इम्पोर्टेड गाड्या घेऊन आलेले असत. सिनेमा पाहण्यापेक्षा त्यांचे इतर फंदच चालायचे. त्यांना स्नॅक्स, कोल्ड्रिंक्स, लंच वगैरे पुरवायला हायफाय हॉटेल ग्रुप्सच्या ताफ्यातली माणसं सर्विस देत असत. त्यातही शर्मांचं परसेंटेज असे.कोल्ड्रिंक्स, अन्य खाद्य वस्तू पुरवण्यासाठीही त्या परिसरातले

दुकानदार आपली पोरं ठेवीत असत त्यांना पासेस दिलेले असत. या फेरीवाल्यांमध्ये शर्मांची पोरं असत. ती डुप्लिकेट वस्तू आणून धंदा करीत. काही उच्चभ्रू गिऱ्हाईकं याबद्दल तक्रारी करीत. शर्मा त्याकडे कानाडोळा करीत. पण सुरेशकडे अशी तक्रार आली तर तो संबंधिताला बोलावून खातरजमा करीत असे नी तंबी देत असे. असा डुप्लिकेट माल आणून खपवणाऱ्या दोघा-तिघांचे पासेस सुरेशने काढून घेतले. महिनाभराने मॅनेजमेंटची मीटिंग झाली नी शर्मांना डिच्चू मिळाला. त्या पोस्टवर सुरेशची नेमणूक झाली.

सुरेशकडे ताफ्यातल्या थिएटरचा चार्ज आला नी सुरेशने पूर्ण सिस्टिम बदलली. शर्मांच्या पुठ्ठ्यातले कामगार काढून टाकले. शोच्या वेळी क्वालिटी माल नी खाद्यवस्तू पुरविण्यासाठी त्याने डाह्याभाईंना सांगून गावाकडची चार पोरं आणून ठेवली. विक्रीला ठेवलेल्या खाद्य पदार्थांची क्वालिटी तो जातीनिशी पडताळीत असे. चार-पाच वर्षांच्या काळात थिएटरचा टर्नओव्हर बेफाट वाढला. सुरेशच्या लग्नात डाह्याभाईंनी त्या काळी लाखभर रुपये खर्च केले. ज्या रेक्लमेशन सोसायटीत सुरेश लहान-सहान कामं करी त्याच सोसायटीत डाह्याभाईंनी त्याला टू रूम फ्लॅट घेऊन दिला. त्याच्या दिमतीला ड्रायव्हरसह एसी कार आली. पुढे डाह्याभाई वारले त्या दरम्यान ड्राईव्ह इन बंद करून मल्टिप्लेक्समध्ये रूपांतर करण्यात आलं. त्याची संपूर्ण कार्यवाही सुरेशनेच केली. आज मल्टिप्लेक्समधल्या नोकरवर्गा पैकी ऐंशी टक्क्यांहून अधिक लोक कोकणातले आहेत.

०७.मुजोर संस्थाचालक

त्यावेळी पुऱ्या कोकणात काही ठराविक तालुक्याच्या ठिकाणी हायस्कूलं असत. बहुसंख्य गावांत चौथीपर्यंत किंवा सातवीपर्यंत शाळा असत. सर्वसामान्यांची मुलं चौथी किंवा सातवीपर्यंत शिकून शाळा सोडायची. गावातल्या पाच-दहा पांढरपेशी खात्यापित्या कुटुंबांतली मुलं चार ते आठ मैलांपर्यंत तंगडतोड करून हायस्कूलात जायची. त्यातही सातवी नंतर शिकणाऱ्यांमध्ये मुलींचे प्रमाण अगदी नगण्य असे. एकत्र कुटुंब पद्धती असल्यामुळे क्वचित एखाद्या घरातली सख्खी-चुलत तीन-चार भावंडं हायस्कूलात जाणारी असतील, अशा घरातल्या मुली मात्र हायस्कूलात जात. १९६५ मध्ये बडकस पे कमिशन आल्यानंतर पुढच्या तीन-चार वर्षांमध्ये त्यातल्या त्यात सधन असलेल्या गावांमध्ये पंचक्रोशी शिक्षण मंडळ नावाने संस्था रजिस्टर करून हायस्कूलं सुरू झाली.

बडकस कमिशन येण्याचा आणि हायस्कूलं सुरू होण्याशी अर्थाअर्थी सुतराम संबंध नव्हता. पण ते कमिशन आल्यावर प्रत्येक तालुक्यात-जिल्ह्यात हायस्कूलांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली हे मात्र सत्य आहे. त्यावेळी आठवी ते अकरावी - मॅट्रिकपर्यंत वर्ग असत. कोकणात सगळ्याच गावांतून घराघरांतला एखादा मनुष्य तरी नोकरी-धंद्यासाठी मुंबईत असायचा. हे मुंबईवाले शहाणेसुरते, चार पैसे हातात असलेले म्हणून संस्थेत त्यांचा भरणा बहुसंख्येने असायचा. संस्थेच्या घटना उपविधीमध्ये नियामक मंडळात सगळेच पदाधिकारी मुंबईवाले असत आणि स्थानिक शाळा समितीत गावातली मंडळी असे. त्यावेळी उच्चपदस्थांपर्यंत सचिवालयात नोकरवर्गामध्ये शिपायापासून तो कोकणी लोकांचा भरणा असल्यामुळे हायस्कूलांना मान्यता मिळवण्यात काहीच अडचणी येत नसत. संस्थेची

घटना उपविधी मुंबईतले लोकच ठरवीत असल्यामुळे संस्थेत नियमन करण्याचे अंतिम अधिकार मुंबई मंडळाकडे असत. मुंबईवाले वर्गणी रूपाने आणि देणगी रूपाने निधी गोळा करून खर्चाची तोंडमिळवणी करीत.

त्यावेळी हायस्कूल कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी सॅलरी ग्रॅण्ट आणि इतर खर्चासाठी मेन्टेनन्स ग्रॅण्ट शिक्षण विभागाकडून संस्थांना देण्यात येत असे. सरकारमान्य वेतन श्रेणीप्रमाणे वेतन आणि स्टेशनरी वगैरे खर्च संस्थेने आगाऊ करावयाचा आणि हिशोब वर्ष पूर्ण झाल्यावर शिक्षण विभाग संस्थांचे ताळेबंद तपासून नंतर अनुदान-ग्रॅण्ट वितरण करीत असे. खर्च करण्यासाठी एस. एस. कोडमधील मार्गदर्शक तरतुदी प्रमाणभूत मानल्या जात; किंबहुना एकूणच शाळेचा कारभार एस. एस. कोडमधील विधी उपविधींप्रमाणे चालविला जात असे. त्यातही नियमन आणि संचालन करण्यासाठी राज्यस्तरावर शिक्षण मंत्री काही काही तरतुदी, मूळ विधी उपविधींमध्ये बदल-दुरुस्त्या करीत असे. त्यांची माहिती शिक्षण विभागामार्फत परिपत्रके (सर्क्युलर्स) काढून शिक्षण संस्थांना कळविण्याची पद्धत होती. शिक्षण मंत्री कितपत तत्पर आणि दक्ष असेल त्यावर अनुदानाचे वितरण वक्तशीर किंवा विलंबाने होणे अवलंबून असे. कर्मचाऱ्यांचे वेतन ही मोठीच खर्चाची बाब असल्यामुळे त्याची तोंडमिळवणी हे मोठे आव्हानच संस्थांपुढे असे. त्यामुळे दरमहा नियमित वेतन न होणे, शाळेसाठी लागणारी स्टेशनरी व इतर साहित्य पुरविणाऱ्या व्यापाऱ्यांची बिले तटणे हे प्रकार पाचवीलाच पुजलेले होते. घाटावरच्या काही संस्था धाक दपटशाहीने दरमहाच्या वेतन पत्रकावर कर्मचाऱ्यांच्या सह्या घेऊन आर्थिक बाबी नियमित असल्याचा कागदी देखावा करीत. पण प्रत्यक्षात मात्र वेतन अनुदान आल्यावरही तटलेले वेतन पूर्णांशाने न देणे, मुळात शिक्षक वा अन्य कर्मचाऱ्याची नियुक्ती करतानाच मान्य श्रेणीपेक्षा कमी वेतन देण्याची अट घालणे हे प्रकार सर्रास चालत असत.

कोकणात मात्र आरंभीच्या काळात तरी हे प्रकार रूढ झालेले नव्हते. शाळेसाठी इमारत बांधणे ही मोठीच खर्चाची बाब असे. त्यासाठी मुंबईवाले सधन उद्योगपती गाठून शाळेला नाव देण्याच्या अटीवर देणगी मिळवीत. काही गावांमध्ये जिथे गाविक देवस्थाने वा अन्य कारणांमुळे गावकऱ्यांमध्ये तट किंवा दुफळी नसे, अशा गावांमध्ये ग्रामस्थ इमारती लाकूड दान म्हणून देत. ज्या गावांत चिरेखाणीचा व्यवसाय चाले तिथले लोक वाडीवार श्रमदानाने मोफत चिरे काढीत. पाया खणणे, भर घालणे वगैरे कामे घराघरांतला एकेक पुरुष-महिला श्रमदानाने विनाखर्चात अशी कामे करीत. स्टेशनरी, वाचनालयाची पुस्तके, विज्ञान प्रयोग व क्रीडा साहित्य त्याकाळी कोल्हापूरहून व क्वचित मुंबईवरून खरेदी करून आणले जाई. असे साहित्य विक्री करणारे गबरगंड व्यापारी कोल्हापूरमध्ये मोठ्या संख्येने असत. नवीन शाळा सुरू केल्यावर सरकारी मान्यता मिळालेल्या पत्राची (रेकग्निशन लेटर) प्रत त्यांना दाखवल्यावर ते उधारीवर साहित्य पुरवीत. यातही संभाव्य विलंबाची शक्यता गृहीत धरून उधारीची रक्कम दीडपटीने वसूल होईल अशा चढ्या भावाने बिलांची आकारणी केली जात असे. शाळांचे नियमन करणारी जिल्हा शिक्षण विभाग, उपसंचालक, संचालक स्तरापर्यंत या व्यापारी लोकांचे लागेबांधे असत. एखाद्या शाळेचे अनुदान मंजूर झाले की त्यांना अचूक माहिती मिळत असे. मग त्यांचे प्रतिनिधी संस्थाचालकांना भेटून आपली बिले वसूल करीत असत. हायस्कूल सुरू झाल्यावर आरंभीचा पाच-सहा वर्षांचा परखड काळ संपला की मग संस्थांची मनमानी सुरू होई.

आमच्या शिवडाव हायस्कूलच्या स्थानिक समितीत गावातल्या मराठी शाळेतले ठाकूर मास्तर चेअरमन होते. ते काँग्रेसचे कार्यकर्ते होते. पंचायत समितीचे-जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, आमच्या भागातले आमदार अशा लोकांची त्यांच्याकडे उठबस असायची. पूर्वी सकाळी प्रार्थना झाली की मस्टरवर सही करून ठाकूर मास्तर रेशन कमिटीत नाहीतर ग्रामपंचायतीत जाऊन बसत. दुपारी अडीचची शाळा असली तरी ठाकूर मास्तर तीन

वाजेपर्यंत उगवत. त्यावेळी शाळेत चहाची वेळ झालेली असे. मास्तर मस्टरवर सही करून चहा पिऊन बाहेर पडत नी कमिटीत नाहीतर किराणा दुकानदाराकडे जाऊन बसत. आरंभकाळी मराठी शाळेच्या वर्गखोल्यांमध्ये हायस्कूल भरे. पुढे दोन-तीन वर्षांनी गावकऱ्यांनी श्रमदानाने सहा वर्गखोल्या बांधल्या. वर्गखोल्यांचे काम सुरू असतानाच जीजीभाई शहा या गुजराती कारखानदाराने पत्नीच्या नावे पन्नास हजाराची मोठी देणगी दिली. जीजीभाईंनी देणगी दिल्यावर महिनाभराने त्यांची शिवडावला खेप झाली. संस्थेने इतक्या तत्परतेने काम सुरू केल्याचे पाहून ते भलतेच खूश झाले. परत गेल्यावर त्यांनी एक्झिक्युटिव्ह चेअर, मोठी टेबले, लोखंडी सेफ असे ट्रकभर सामान पाठवून दिले. त्याच दरम्यान मुंबई मंडळाचे अध्यक्ष गंगाराम शेठ गुरव वारले नी त्यांचा सचिवालयात शिपाई असलेला त्यांचा पुतण्या यशवंत त्यांच्या जागी आला. ठाकूर मास्तरांनी त्याच्याशी संधान साधून मिळालेल्या देणगीवर कसा डल्ला मारता येईल ह्या दृष्टीने पावले उचलायची सुरुवात केली.

त्यावेळी संस्थेने बांधलेल्या वर्गखोल्यांचे व्हॅल्युएशन करून त्यावर इमारत भाडे रूपाने अनुदान मिळत असे. श्रमदानाने बांधलेल्या खोल्यांच्या खर्चाची खोटी बिले लावून जीजी भाईकडून मिळालेल्या देणगीतून तेवढ्या रकमेची उचल करण्यात आली. त्यातला मोठा वाटा अध्यक्षांनी उचलला नी काही रक्कम ठाकूर मास्तरांना मिळाली. जीजीभाईंनी पाठवलेले फर्निचरही कोल्हापुरातून खोटी बिले आणून शाळेच्या खर्चात टाकण्यात आले. मार्च अखेरीला फर्निचरची बिले शाळेच्या खर्चात टाकायचा विषय पुढे आल्यावर त्यावेळचे हेडमास्तर कामत सर भडकले. त्यांनी या गोष्टीची गावभर बोंब केली. ठराविक जाणत्या लोकांनी ठाकूर मास्तरांना भेटून विचारणा केल्यावर त्यांनी पद्धतशीर दिशाभूल केली. "सरकारकडून या खर्चावर संस्थेला अनुदान मिळेल ते का सोडायचे? संस्थेचा निधी वाढला तर कितीतरी विधायक गोष्टी करता येतील. कामत माथेफिरू आहे. त्याला पगार मिळवण्याशी मतलब. मुळात तो बाहेरगावचा. त्याच्या स्वतःच्या

गावात हायस्कूल नाही. म्हणून तो आमच्या गावावर खार खातो. संस्थेला दूरदृष्टीने विचार करावा लागतो." अशा भुलथापा सांगून कामतांचा बार फुसका केला. लोकांना ठाकूर मास्तरांचे बोलणे पटले. त्यांना विश्वासात घेऊन ठाकूर मास्तरांनी कामतांना त्रास द्यायला सुरुवात केली. घरमालकाने त्यांना ताबडतोब बिऱ्हाडाची जागा खाली करायला सांगितली.

यशवंत गुरवांनी सचिवालयातून शिक्षणाधिकाऱ्यांना सांगून त्यांच्याकरवीही त्रास द्यायला सुरुवात केली. साहेबांची व्हिजिट झाली त्यावेळी शाळेचे हिशोब अपुरे होते. आणखीही काही कागदोपत्री त्रुटी काढून त्यांनी कामतांना नोटीस दिली. ठाकूर मास्तर रोज हायस्कूलची प्रार्थना व्हायच्या वेळी शाळेत येत नी हेडमास्तरांच्या खुर्चीत डिंबी देऊन बसत. वार्षिक हिशोब तपासणीत ऑडिटरनी काही बिलं नामंजूर केली. मुंबई मंडळाने या गोष्टीबद्दल कामतांवरच ठपका ठेवला. नेमक्या त्याच वेळी कामतांनी कोणातरी विद्यार्थ्याला वर्गात गडबड करताना पकडून छड्या मारल्या. ठाकूर मास्तरांनी त्याच्या बापाला घेऊन पोलीस केस केली. चार दिवसांत मुंबई मंडळाचे पदाधिकारी गावात येऊन त्यांनी ग्रामस्थांची सभा घेऊन कामतांवर जाहीर आरोप ठेवले. गाविक सभेत वातावरण चांगलेच तापलेले होते. एकूण रागरंग पाहून त्याच दिवशी रजिस्टर पोस्टाने राजीनामा पाठवून कामत गाव सोडून निघून गेले. स्टाफवरील सीनियर दळवी बाई, ढोके सर, रानडे सर, पोकळे बाई यांनी एकंदरीत विचार करून मुख्याध्यापक पद स्वीकारायला नकार दिला. खाशाबा माकु धनगर हा ज्युनियर शिक्षक हेडमास्तर झाला. आता ठाकूर मास्तरांना रानच मोकळं झालं.

देणगीदार जीजीभाईंच्या शिफारशीने त्यांच्या सगेवाल्यांपैकी किंजलबेन फाउंडेशनतर्फे शाळेतल्या गरीब मुलांसाठी वस्तुरूप सहाय्य यायला लागलं. त्यात जवळजवळ दोनशे मुलांसाठी गणवेशाचे कापड, पुस्तक संच, त्यावेळच्या दर्जेदार 'रजत' नी 'गुडलक' ब्रँडच्या वह्या,

कॅमलच्या रंगपेट्या, कंपास पेट्या असं साहित्य असे. ठाकूर मास्तर नी गुरव प्रेसिडेंटनी शाळेचं वस्तू भांडार सुरू केलं. प्रेसिडेंट मुरलेला होता. देसायांवर आणि शाळेच्या दैनंदिन कारभारावर नजर राहावी, इथली खडा न् खडा माहिती आपल्याला मिळावी यासाठी आपला चुलत भाऊ दत्ताराम याला स्कूल कमिटीत घेऊन रोज सकाळ-संध्याकाळ शाळेत येऊन बसायला सांगितले. शाळेच्या वस्तू भांडाराची व्यवस्थापिका आणि अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून त्याच्याच बायकोची नियुक्ती करून तिला संस्थेकडून मासिक वेतन मंजूर केलं. किंजलबेन फाउंडेशनकडून गरीब मुलांना भेट म्हणून येणाऱ्या वस्तू बाजारभावापेक्षा रुपयाभर कमी मूल्य घेऊन भांडारात विक्रीसाठी ठेवीत.

कापडाचे तागे गावातल्या दुकानदाराला विकले जात. वीस-पंचवीस मुलांना मोफत वस्तू वाटप करून लाभार्थी मुलांची बोगस यादी फाउंडेशनला पाठवीत. गणवेशाच्या शिलाईची खोटी बिले पाठवून तो पैसाही हडप केला जाई. दत्ताराम गुरव आणि त्याची बायको शाळेत बसायला लागल्यावर ठाकूर मास्तरांचा चरू बंद झाला. नवीन नेमण्यात आलेल्या खा. मा. धनगरांची अवस्था तर कुंभाराच्या ओझेवाहू गाढवासारखी झालेली होती. केबिनमध्ये एक्झिक्युटिव्ह चेअरवर ठाकूर मास्तर बसत. तिथेच बाजूला दुसरी खुर्ची टाकून दत्ताराम शेठ बसत. धनगर मास्तर बापडा कधी सीनियर कारकून मोर्वेकरांच्या समोर तर कधी वस्तू भांडारात सविता मॅडमच्या टेबलासमोर खुर्चीत बसे. बँकेमार्फत पगार सुरू होईपर्यंत धनगर मास्तराला हेडमास्तरांच्या वेतनश्रेणीप्रमाणे वेतन संस्थेने दिले नाही. नवीन येणाऱ्या शिक्षकांना मासिक वेतनातली ठराविक रक्कम संस्थेला देण्याच्या अटीवर नियुक्ती दिली जायची. शिक्षकाची क्षमता नी लायकी न बघता सरसहा नियुक्त्या केल्या जात. पुढे बँकेमार्फत वेतन सुरू झाल्यावर कट पेमेंटची प्रथा आपोआपच बंद झाली. पण संस्थानी शक्कल लढवली. मोठ्या रक्कमा डोनेशनपोटी घेऊन नेमणुका करायची पद्धत सुरू झाली.

तालुक्याच्या गावी सौ. निर्मला श्रीपाद मोतीवाले गाडगीळ माध्यमिक विद्यालय ही जिल्ह्यातल्या नामांकित शाळांमध्ये गणली जायची. आजूबाजूच्या दहा-बारा गावांत माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती. पाचवी ते सातवीपर्यंत दोन-दोन तुकड्या आणि आठवी ते दहावीपर्यंत चार-चार तुकड्या होत्या. पुढे हायर सेकेंडरी सुरू झाल्यावर विज्ञान, वाणिज्य, कला तिन्ही शाखा असलेल्या ज्युनियर कॉलेजच्या वर्गांनाही मान्यता मिळाली. शाळेच्या संचालक मंडळात मोतीवाल्या गाडगीळांचे पाहुणे भाऊ केळकर त्यांचे प्रतिनिधी म्हणून असायचे. पुढे तेच संस्थेचे अध्यक्ष झाले. त्यांचा शालेय कामकाजात बिलकूल हस्तक्षेप नसल्यामुळे शाळा गुणवत्ता सांभाळून होती. गावातले किराणा दुकानदार हेगशेट्ये यांचा मुलगा डोनेशन भरून एम.बी.बी.एस. पदवी घेऊन आला. त्यांनी शाळेजवळच टोलेजंग हॉस्पिटल बांधलं. डॉक्टरांकडे वैद्यकीय ज्ञान यथातथाच होतं पण सगळी अद्ययावत सामग्री उपलब्ध होती. कोल्हापूरच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे वार लावलेले होते. स्थानिक लेले बाई गायनॅकॉलॉजिस्ट होत्या. पण स्वतःचं प्रसूतीगृह काढण्याइतकी आर्थिक कुवत नसल्यामुळे त्या पन्नास टक्के कलेक्शन देण्याच्या अटीवर हेगशेट्येंच्या हॉस्पिटलमध्येच प्रॅक्टिस करीत. हेगशेट्ये डॉक्टर फुलसूट घालून स्टेथास्कोप अडकवून फिरणं आणि अव्वाच्या सव्वा बिलं लावणं ही कामं करण्यात मात्र तरबेज होते. डॉक्टरांचे वडील बापूराव हेगशेट्ये स्कूल कमिटीचे चेअरमन होते. त्यांनी आपल्या ऐवजी डॉक्टरना घ्यायला सुचवलं. पहिल्याच सभेचं निमंत्रण आलं आणि डॉक्टर साहेब रुबाबात हायस्कूलमध्ये आले. मीटिंग संस्थेच्या ऑफिसमध्ये होती. डॉक्टर त्याच शाळेचे माजी विद्यार्थी. वाटेत हायस्कूलच्या स्टाफरूममध्ये ते डोकावले. त्यांच्या वेळचे शिक्षक बांदकर, गुळवणी, भाट, लुकतुके ही सीनियर शिक्षक मंडळी कौतुकाने उठून पुढे आली म्हटल्यावर सगळेच स्टाफ मेंबर्स उठून उभे राहिले. गुरुजनांना वंदन करून डॉक्टर मीटिंग रूममध्ये गेले. मीटिंग संपल्यावर चहापाणी झालं नी मेंबर लोक बाहेर पडले.

डॉक्टरांनी कमिटी सदस्य तेलींकडे हायर सेकंडरी विभागात फेरी मारून येण्याची पृच्छा केली.दोघेही कॉरिडॉरमध्ये राउंड मारून हायर सेकंडरीच्या स्टाफरूममध्ये शिरले. तेलींना ओळखणाऱ्या एक-दोन प्राध्यापकांनी हसून "आज मीटिंगला आला होता वाटतं....." अशी चौकशी केली. त्यावर "हो, डॉक्टरसाहेबांना ज्युनियर कॉलेज बघायचं होतं म्हणून फिरवून आणलं....." असे तेली बोलले. यापरती त्यांची दखल कोणीच घेतली नाही. डॉक्टरांना ही गोष्ट चांगलीच खटकली.परत जाताना प्रिन्सिपॉल खामकरांना भेटून डॉक्टरांनी आपली खदखद व्यक्त केली. "संस्था पदाधिकारी आल्यावर त्यांचा मान राखण्यासाठी उठून उभं राहायचा हा साधा शिष्टाचारही हे लोक पाळत नाहीत. संस्था पदाधिकाऱ्यांच्या हातात यांच्या नाड्या आहेत. तुम्ही ह्या उर्मट लोकांना कडक शब्दांत वॉर्निंग द्या." खामकर सौम्य शब्दांत म्हणाले, "यापूर्वी कोणत्याही संस्था पदाधिकाऱ्याने असा प्रेस्टिज इश्यू केलेला नाही. आदराने उभं राहणं हे ज्याच्या-त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे. हा काही प्रोटोकॉल नाही. अशी जाहीर सूचना देणं मला प्रस्तुत वाटत नाही." डॉक्टर जळफळत निघून गेले.

त्यानंतर महिनाभराने हायर सेकेंडरी विभागाचं गॅदरिंग झालं. सगळ्या उपस्थित संस्था पदाधिकाऱ्यांनी लहान-मोठी भाषणं केली. भाऊ केळकर आणि खामकर या दोघांचेच भाषण करतानाचे फोटो काढले गेले. कार्यक्रमाच्या बातमीत खामकर आणि चेअरमन साहेबांच्या भाषणाचा गोषवारा दिलेला होता. डॉक्टरांचा फक्त उपस्थितांच्या नामावळीत उल्लेख झाला होता. वार्षिक अंकातही क्षणचित्रांमध्ये फक्त एका ग्रुप फोटोत डॉक्टर होते. या बाबीही त्यांना चांगल्याच झोंबल्या होत्या. पुढच्या दोन दिवसांनी भाऊ केळकरांना पॅरालिसिसचा अटॅक आला. भाऊंनी उपाध्यक्षांकडे चार्ज दिला. संस्थेच्या मीटिंगमध्ये असे ठरले की, आणखी सहा महिन्यांनी मॅनेजमेंटची मुदत संपणार आहे, त्यावेळी पर्यायी चेअरमन निवडू, तोपर्यंत व्हाईस चेअरमन यांच्यामार्फत काम चालवून घ्यायचे. आता

डॉक्टर कामाला लागले. त्यांनी या संधीचा फायदा घ्यायचे ठरविले. बहुमताच्या जोरावर संस्था ताब्यात घेण्यासाठी त्यांनी आपले चेलेचपेटे सभासद करून घ्यायची सुरुवात केली. आपले निकटवर्ती पाहुणे-सोयरे, तायशेट्ये, संसारे, मलुष्टे, तानवडे, पारकर, बंड, कोकाटे असे पंचक्रोशीतले ज्ञाती बांधव मिळून दोनशे नवीन सभासद नोंदून घेतले. त्यांची ही चाल कोणाच्याच लक्षात आलेली नव्हती. निर्धारित मुदतीनंतर जनरल मीटिंग लागली. डॉक्टरांचे सगळे मेंबर्स हजर होते. भाऊंनी आपल्या पदाचा राजीनामाच दिलेला होता. चेअरमन म्हणून डॉक्टर निवडून आले. मोतीवाल्या गाडगीळांचे प्रतिनिधी म्हणून भाऊ केळकरांचा मुलगा वगळता जुन्या कमिटीतल्या बहुसंख्य मेंबर्सना डिच्चू देऊन डॉक्टरांनी योजल्याप्रमाणे त्यांच्या मर्जीतले पदाधिकारी बहुसंख्येच्या बळावर विजयी झाले नी संस्था एकहाती डॉक्टरांच्या हातात आली. पूर्वी भाऊ केळकरांच्या अधिपत्याखाली गुण्यागोविंदाने काम करणाऱ्या सभासदांना खूप उशिराने डॉक्टरांची खेळी उमगली, पण आता वेळ निघून गेलेली होती.

नवीन मॅनेजिंग बॉडीने लगतच्याच रविवारी संस्थेच्या सेवेतील सर्व कर्मचाऱ्यांसाठीस्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. स्नेहभोजनापूर्वी छोटीशी सभा झाली. डॉक्टरांनी नवीन पदाधिकाऱ्यांचा परिचय करून दिला. मग आपण हायर सेकंडरीच्या स्टाफरूममध्ये गेल्यावर आपला कसा उपमर्द झाला ते सांगून यापुढे संस्था पदाधिकाऱ्यांचा असा उपमर्द सहन केला जाणार नाही,ज्यांनी हे गैरकृत्य केले आहे त्यांना त्यांच्या उद्धटपणाबद्दल योग्य जरब बसेल असे जाहीरपणे सांगितले. संस्थेच्या जीवावर तुम्ही हा मानमरातब भोगीत अहात. पण ज्या संस्थाचालकांमुळे तुम्हाला जन्मभराची भाकरी मिळाली त्यांच्याबद्दल कृतज्ञता सोडाच त्याना उर्मटपणे फाट्यावर मारीपर्यंत तुमची मजल गेली असेल तर संस्थेला आपले अधिकार वापरावे हागतील. यापुढे कोणाचीही आगळीक संस्था खपवून घेणार नाही असा सज्जड दम भरला.

सोमवारी हायर सेकंडरीचे सेशन सुरू झाले. स्टाफरूममध्ये प्रवेश केल्यावर कर्मचारी अवाक झाले. फक्त पर्यवेक्षकांची खुर्ची वगळता इतरत्र एकही खुर्ची नव्हती. स्टाफचे टॉयलेट्स सुद्धा लॉक केलेले होते. चौकशी केल्यावर शिपाई म्हणाले की, "स्टाफ रूम आणि वर्गातल्या सगळीकडच्या खुर्च्या साहेबांनी स्टोअररूममध्ये नेऊन ठेवायला सांगितल्या आहेत. प्रायमरी किंवा सेकंडरी मधून एकही खुर्ची हलवायची नाही अशीही सक्त ताकीद साहेबांनी दिली आहे." मग सुपरवायझरनी आणखी एक सूचना दिली की, "टॉयलेट्स चोकअप झाल्यामुळे तूर्त बंद केलेली असून स्टाफने काही दिवस विद्यार्थ्यांसाठीच्या कॉमन टॉयलेट्सचा वापर करावा. हायर सेकंडरीच्या स्टाफने कोणत्याही कारणास्तव प्रायमरी / सेकंडरीच्या स्टाफरूममध्ये जाऊन चकाट्या पिटीत बसू नये. काही काम असेल तर संबंधिताला प्राचार्य कक्षात बोलावून संपर्क करावा, अशी चेअरमन साहेबांची ओरल ऑर्डर आहे." स्टाफ काय समजायचे ते समजला. तासाभराने चेअरमन साहेबांची स्वारी आली. कॉरिडॉरमधून जाताना ते स्टाफरूममध्ये आले. सुपरवायझर खाडकन उभे राहिले. त्यांच्याशी स्मित करून स्टाफरूममध्ये खिडक्यांपाशी जाऊन बाहेर डोकावून पाहून साहेब

सुहास्य मुद्रेने बोलले, “नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही अशी म्हण आहे.....संस्था प्रमुखांचा आदर कां करायचा? ते वेळ आल्याशिवाय कळत नाही.....” अन् माघारी वळताना सर्व स्टाफकडे कटाक्ष टाकीत ते बाहेर पडून गेले. त्यांनी प्राचार्यांना बोलावून घेऊन तीनही शाखांमधल्या एकाही चोराने रजा मागितली तर आमच्या कानावर घातल्याशिवाय परस्पर मंजुरी देऊ नये, अशी सक्त ताकीद दिली.

स्टाफमध्ये काही लोकांचे वरपर्यंत हात पोहोचलेले होते. त्यांनी या गोष्टीला पेपरमधून वाचा फोडण्यासाठी प्रयत्न केले. त्या लोकांनी तालुका-जिल्हा स्तरावरच्या सर्व पत्रकारांना संस्थेने केलेल्या गळचेपीचे वृत्त पेपरमध्ये छापायची विनंती केली. पण चेअरमन साहेबांनी आधीच फील्डिंग लावून ठेवलेली असल्यामुळे पत्रकारानी चक्क कानावर हात ठेवले. प्रथम सत्र संपण्यापूर्वी कमिटी व्हिजिट झाली. कमिटी मेंबर्स प्रिमायसेस मध्ये स्ट्रॉल घेतील तेव्हा संस्थेची ही आगळीक त्यांच्या कानी घालायची म्हणून लोक वाट बघत होते. पण या लोकांनाही डॉक्टरांनी मॅनेज केलेले होते.त्यांनी दोन-तीन तासांत इन्स्पेक्शन गुंडाळलं. शेवटी झालेली सहविचार सभा डॉक्टरांनी योजूनच असेंब्ली हॉलच्या दुरुस्तीचे कारण देऊन प्रायमरी सेक्शनमध्ये सहावीच्या वर्गात ठेवलेली होती. लहान मुलांच्या छोट्या-छोट्या बेंचवर प्राध्यापक मंडळी अवघडून बसलेली होती. सभेच्या सुरुवातीला डॉक्टरांनी कमिटी मेंबर्सचे स्वागत केले. मग मोठ्या मानभावीपणाने ऐन वेळी असेंब्ली हॉलच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्यामुळे प्राध्यापक मंडळींना नाईलाजाने छोट्या-छोट्या बेंचेसवर अवघडून बसावे लागत आहे त्याबद्दल अगदी सौम्य शब्दात दिलगिरी व्यक्त केली.

प्रा. श्रीराम काळे यांची ग्रंथसंपदा

'सात मैल चार फर्लांग स्स्ता' कथासंग्रहावरील सुजाण वाचकाची प्रतिक्रिया

कथासंग्रह संपूर्ण वाचून झाला. मला आवडला. अर्थवाही शब्दात केलेले तपशीलवार वर्णन हे लेखकाची विषयातील जाणकारी दाखवते. त्याची मांडणीही सुबोध्य असल्याने वाचनीय झाली आहे. घटना आणि घटीते यांना या पध्दतीच्या लेखनात गौण महत्व असते, फक्त संबंधितांवर एकंदर परीणाम काय झाला हे सांगीतला रीतीने दिलेले असते. ललित लेख आणि कथा यांची एकत्रित सरमिसळ जेव्हा अशा रीतीने समोर येते, तेव्हा ज्ञान / माहिती आणि रंजकता यांचा मनोज्ञ संगम वाचनीयच होतो. आत्मकथनापेक्षा दोष फक्तच्याही असे म्हणावेसे वाटते की या प्रकारचे दर्जेदार लेखन वाचण्यासाठी वाचकाची अभिरुची थोडी वरच्या दर्जाची असायला हवी, अन्यथा लेखन दर्जेदार असूनही उपेक्षित राहण्याची शक्यता असते. त्यामुळे अर्थातच लेखकाला अजिबातच उपेक्षणा येत नाही. हे अर्थातच माझे वैयक्तिक मत आहे . माझ्याशिवाय सांगायचं तर खरोखरच फारच उच्च दर्जाचा कथासंग्रह वाचायला मिळाला, एकदं मात्र नक्की .

श्री. विनायक उकिडवे. 9869314865













ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान अठरा वर्षाचे होत आहे.
प्रा. श्रीराम काळे यांचे हे ई साहित्यवरील दहावे पुस्तक.

प्रा. श्रीराम काळे हे एक सिद्धहस्त प्रतिभाशाली लेखक आहेत. देवगड येथील बी. एड्. विद्यालयात त्यांनी नवीन पिढ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांच्या पिढ्या घडवल्या. गेली चाळीसेक वर्षे ते लेखन करत आहेत व अनेक नामवंत नियतकालिकांतून त्यांच्या कथांना प्रसिद्धी लाभली आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक लाभ घेण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फे वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. ते मानतात की ई पुस्तके हे दिवसेंदिवस वाढत जाणारे भविष्यकाळाचे माध्यम आहे व ते मराठीतही वाढायला हवे.

प्रा. श्रीराम काळे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर (४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (६१ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), डॉ. वृषाली जोशी-जागतिक वाङ्मय अनुवाद (६१ पुस्तके), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९),

CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, प्राचार्य शशिकांत कर्डेकर(१४ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१०), वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडॅ, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।